
# गुरु महिमा


## दिवाळी अंक २०१६

## कन्यागत महापर्वकाल विशेषांक

मुल्य रु. ७५/-







# संपादकीय

**महर्षी** नारद मुनींनी निर्माण केलेल्या श्रीदत्त संप्रदायात श्रीकृष्णा माईला अपार महत्व आहे. प्रभू दत्तात्रेयांचा पहिला अवतार श्रीपादश्रीवल्लभ यांनी कुरवपूरला श्रीकृष्णेच्या काठी वास्तव्य केले आणि पुढील श्रीनृसिंहसरस्वती अवतारात श्रीनृसिंहवाटीकेत श्रीकृष्णावेणी-पंचगंगा संगमतीरी औदुंबर वृक्षाखाली बारा वर्षे तपश्चर्या केली. साक्षात श्रीशिवशंकरांच्या पवित्र महाबळेश्वर क्षेत्री उगम पावणाऱ्या श्रीकृष्णा माईच्या काठावर अनंत पवित्र तीर्थक्षेत्रे आहेत. म्हणूनच तिच्या या आध्यात्मिक प्रवाहाचा काठ श्रीगुरुंनी तपाचरण करण्यासाठी निवडला. तिच्या अति पवित्र गुणधर्मांमुळे प्रभू रामचंद्रांनी समर्थ रामदास स्वामींना ''कृष्णातीरी जाऊन कार्य संपन्न करावे'' असा आदेश दिला होता. आसक्ती आणि विरक्ती यात फरक न करता सारखीच उन्नती करण्याची अजब किमया श्रीकृष्णा माता साधते. म्हणूनच समर्थ रामदास स्वामी म्हणतात,

सुखसरिते गुणभरिते दूरिते निवारी। नि:संगा भवगंगा चिदगंगा तारी।।

श्रीकृष्णे अवतार जल्लोषधारी। जलमय देई निर्मण साक्षात हरी।।

निष्काम कर्मयोगाची सर्व मानव जातीला शिकवण देणारे भगवान श्रीकृष्ण सर्वत्र नांदत असतात. त्याचप्रमाणे श्रीकृष्णामाता सारख्याच कर्तव्य योगाची प्रसारक आहे. म्हणूनच ती केवळ जलप्रवाह नसून मानवाचे खऱ्या अर्थाने जीवन आहे. भगवान श्रीकृष्ण जसे पवित्र, निर्मळ आहेत तशी श्रीकृष्णा माताही आहे. त्यामुळेच तिला निर्मळ भगवंताचा जलमय देह स्वरुपातील अवतार मानले आहे.

जसे हरिहर हे एकच आहेत त्याचप्रमाणे श्रीकृष्णा आणि वेण्णा ह्या दोघीही एकच आहेत. कारण श्रीकृष्णा ही विष्णूस्वरुपिणी तर वेण्णा शिवस्वरुपिणी! दोघीही एकस्वरुप होऊन वाहतात. त्यामुळे श्रीकृष्णावेणी असे नामाभिधान होऊन सर्व प्राणीमात्रांना सुखी करतात. अशा या हरिहरांच्या प्रेम मिलनात पंचगंगा समरस झाल्यामुळे श्रीनृसिंहवाडीला प्रेमबंधनाचे अनन्य महत्व प्राप्त झाले आहे. त्याशिवाय श्रीगुरुंच्या आणि अनेक तपस्व्यांच्या तपश्चर्येने गुरु-शिष्यांचा ऋणानुबंधही श्रीनृसिंहवाडीतच निर्माण झाला आहे. अशा पवित्र तीर्थक्षेत्रात बारावर्षांतून येणारी कन्यागत महापर्वकाळ पर्वणी म्हणजे भक्तांच्या जीवनातला महान योगच आहे. या पर्वणीचा योग साधून आपल्या जेष्ठ बहिणीस श्रीकृष्णावेणीला गंगा माता भेटायला येते आणि पूर्णवर्षभर राहून मानव जातीचा उध्दार करते.

म्हणूनच कन्यागतातील या उत्सवाची महती अपार आहे.

सन २००४, ऑगस्ट महिन्यातील २८ तारखेला ही पर्वणी झाली. तेव्हा सद्‌गुरु भाऊ महाराजांसोबत अभ्यंग स्नानाचे भाग्य शेकडो भक्त-शिष्य मंडळींनी प्राप्त करुन घेतले होते. यंदाच्या अर्थात बारा वर्षांनी आलेल्या या पर्वणीचे, गुरुवर्य काकाश्रींसोबत अभ्यंग स्नानाचे भाग्य सर्वांना मिळाले. जीवनातील आध्यात्मिक प्रवास सुखमय झाला.

या आध्यात्मिक आनंदी प्रवासाची सुखद कहाणी शब्द माध्यमाद्वारे सर्वांच्या वाचनात यावी आणि पुन्हा तो आनंद घेता यावा यासाठी ''गुरुमहिमा'' हा दिपावली अंक ''कन्यागत महापर्वकाळ विशेषांक'' म्हणून प्रसिध्द करीत आहोत.

या पवित्र पर्वणीत दिपावलीचा उत्सव येत आहे. हे खरे आपले ''महाभाग्य'' होय.

सर्व गुरुबंधू-भगिनींना कन्यागत महापर्वकाळातील दिपावलीच्या कोटी कोटी शुभेच्छा!!!!

## प्रभू दत्तात्रेय - श्रीकृष्णावेणी ऐक्य

श्रीगुरुदेव दत्त! हे नाम उच्चारताच आपल्यासमोर अत्रिसूत, अनसुया नंदन अशी दोन नावे उभी राहतात. किंबहुना अत्रि-अनसुया या दोन नावातच दत्तप्रभूंचे जन्म रहस्य दडलेले आहे. अ-त्रि म्हणजे त्रिगुणातीत नसलेला अर्थात त्रिगुणाच्या पलिकडे असलेला! आणि जिच्या ठायी कोणत्याही प्रकारची असूया नाही ती अनसुया! येथे एक विचार येतो तो असा की, नारद मुनी सती अनसुयेस माता मानीत होते. तिचे शुध्द आचरणही त्यांनी पाहिले होते. तिच्या चरणी सदैव नम्र होत असायचे. मग आपल्याच आईबद्दल त्यांनी तिन्ही देवींच्या मनात द्वेषभावना का निर्माण केली? त्यांना कुणाच्या खोडी काढून आनंद घेण्यात रस होता का? की निव्वळ एकमेकांच्या एकमेकांना चहाडी करुन त्यांना आपसात झुंजवून मजा बघत राहण्याचा त्यांचा उद्योग होता?

मुनींनी जे काही केले ते त्रिदेवांचे ऐक्य घडवून आणण्यासाठी! त्याकरीता त्यांनी सावित्री-उमा-लक्ष्मी या तीन मातांचा रोष पत्कारुन घेतला होता. मोठ्या कल्पक बुध्दीने त्यांनी महान खेळी खेळली आणि त्रैमूर्तींना एकत्र आणून जगाच्या कल्याणाचा मार्ग मोकळा केला. आज प्रभू दत्तात्रेयांचे स्मरण करताच भक्तांवर कृपा होते, ती फक्त महर्षी नारद मुनींचीच देणगी आहे.

बरे दत्तावतार होण्यासाठी वा घडावा म्हणून त्यावेळी असूर, दैत्य अथवा दानव इत्यादिंकडून मानवास कोणतेही महान संकटही ओढावले नव्हते, तर नाना संप्रदायाचे स्तोम फोफावले होते. एकीकडे वैष्णवांनी तीव्र, कडवा शिवद्वेष मनात बाळगून आपल्या कर्मकांडांचे अवास्तव स्तोम माजवून धुडगूस घातला होता तर दुसरीकडे शैवांनी स्वत:ची उन्नती व भोगांची अभिलाषा मनी बाळगून नितीबाह्य वर्तन सुरु ठेवले होते. ह्या दोन्ही पंथांचे अधिराज्य चालू असतानाच शक्तीच्या म्हणजे देवीच्या नावाखाली निर्माण झालेल्या तंत्रमार्गियांनी पंचमकारांच्या नावाने सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण केले होते. थोडक्यात कोणाचा कोणाला मेळ नव्हता. सामान्य जणांची कुणालाच फिकीर नव्हती. सर्वत्र भयावह स्थिती निर्माण झाली होती. हे कुठेतरी थांबणे गरजेचे होते. म्हणूनच शैव-वैष्णव व शाक्त या सर्वांचा समन्वय जोडून एक उपयुक्त पंथ वा संप्रदाय आणि त्याचे आराध्य दैवत याची निर्मिती होणे ही त्याकाळातील गरज होती.

त्यानुसार नारदमुनींच्या सुयोग्य योजनेने त्रिदेव एकत्र आले. साहजिकच त्यांच्या पत्नींचाही आपसूक झाला सहभाग आणि शैव-वैष्णव, शाक्त आणि ज्ञानी लोकांसाठी सुलभ ठरणारे परमेश्वराचे गोजिरे रुप निर्माण झाले, 'श्रीगुरुदेव दत्त'! देव-दानव-मानवांचे सद्‌गुरु त्रैलोक्यपती श्रीदत्तात्रेय!

पुढे मुनीवरांनी शैव-वैष्णव आणि शाक्त या तीन पंथातील उत्कृष्ट गोष्टी, तत्वे घेऊन त्यात आणखीही काही उत्तमोत्तम तत्वांची जोड देऊन एक स्वतंत्र पंथ वा संप्रदाय निर्माण केला तोच 'दत्तसंप्रदाय' होय.

जे जे ब्रह्मांडात आहे ते ते सूक्ष्मपणे पिंडात (मानवी देहात) आहे. ब्रह्मा-विष्णू-महेश या तिन्ही शक्ती मानवी देहात तीन ग्रंथीच्या स्वरुपात नांदत असतात. या ग्रंथीवरच मानवाचा श्वासोच्छवास व देहाचे सारे कार्य अवलंबून असते. या तिन्ही शक्ती ज्यांच्या सदैव जागृत आहेत ते '' त्रिगुणात्मक त्रैमूर्ती श्रीगुरुदेव दत्त '' होय.

जेथपर्यँत ही सकल सृष्टी आहे, तेथपर्यंत जीव, मानव हे जन्म घेतच राहणार! अविद्या, अज्ञान हे राहणारच! ती नाहीशी करण्यासाठी सद्‌गुरुंचे कार्य सदैव चालूच राहणार! म्हणूनच प्रभू दत्तात्रेयांचे हे कार्य सतत चालूच आहे. पुढेही ते निरंतर तसेच चालू राहणार आहे. इतर अवतारांप्रमाणे श्रीगुरु निजधामासही गेले नाहीत वा अवतारही समाप्त केला नाही. म्हणूनच श्रीगुलाब महाराज म्हणतात,

नाना अवतार होऊनिया गेले । दत्तत्व संचले जैसे तैसे ।।

प्रभूंचा अवतार हा सकल मानवाचे अज्ञान नाहीसे करण्यासाठी, संसारतापाने पोळलेल्यांचा उध्दार करण्यासाठी ''दत्तत्व'' म्हणजे गुरुतत्व आपल्या शांत, सदय, निरंकारी भक्तांमध्ये पेरुन मानवाला मार्गदर्शन करीत त्याला मोक्षाच्या वाटेवर सोडण्याचे कार्य अविरत करीत आहेत. हे त्यांचे कार्य युगानुयुगे चालू आहे. इतकेच काय, प्रभूंचे अस्तित्व सर्वत्र नांदत आहे आणि सदा सर्वदा तो अनुभव कुणाला ना कुणाला येतही असतो. म्हणूनच प्रभूंना स्वैरविहारी, सुभोगी, दिगंबर, परमहंस, अवधूत, विरक्त व विश्वाचे गुरु संबोधले जाते. ज्याने सर्व संसारबंधने संकल्प-विकल्प नष्ट केलेली आहेत, त्यांस ''अवधूत'' म्हणतात. अशा स्थितीत श्रीदत्तगुरुंचे वावरणे असते.

दत्तभक्तीचा मार्ग सर्वांनाच प्राप्त होतो असेही नाही. त्यासाठी मागील मागील संचित कर्मांची जोड असावी लागते तेव्हा कुठे तरी सद्‌गुरुंची भेट होऊन, कृपा प्राप्त होते. त्या कृपाप्रसादाने पुढील जीवन

त्याच सद्गुरुंच्या पुर्नभेटीने उजळून दत्तभक्तीची उर्मी निर्माण होऊन दत्तप्रभूंचे ध्यान हृदयी बिंबू लागते, तेव्हा तो प्रत्यय येऊ लागतो. भेटी लागे जीवा । लागलीसे आस।।

ही आस असते गुरुतत्वाची! सद्गुरुंची ! मानवाच्या कासावीस जीवाला तडफड लागते ती सद्गुरु चरणांच्या दर्शनाची! कधी एकदा सद्गुरुंच्या चरणांवर नतमस्तक होतो, ही स्थिती तेव्हा प्राप्त होते जेव्हा शिष्य सद्गुरुंशी पूर्ण समरस होतो. ही समरसता म्हणजेच जीवा-शिवाचं मिलन होय.

तरीही श्रीसमर्थ रामदास स्वामींसारखे अवतारी पुरुष म्हणतात, मी सद्गुरुंचे वर्णन करण्याबाबतीत पूर्ण अज्ञानी आहे. मग सामान्य जणांचा तेथे काय पाड?

श्री अनंतसूत उर्फ कावडीबाबा म्हणतात, श्रीदत्तप्रभू हे सर्वसाक्षी, सर्वज्ञ आणि सर्वगत आहेत. ते जन्ममरणाहून वेगळे आहेत. ते विकाररहित असून विदेही आहेत. ते जरी गुप्त झाले, तरी सर्वात्मकांत प्रकट असतात, म्हणून त्यांची लीला कुणालाही समजत नाही. जसे लोणी दूधातच असते. परंतु जो सक्रियांनी दूधाला घुसळतो अर्थात दूध तापविणे, विरजण घालणे, तयार झालेल्या दह्याला घुसळविणे, अशा प्रक्रियांनी लोणी त्याला प्राप्त होते. तद्वत श्रीदत्तप्रभू आहेत. त्यांना खरा भक्तिभाव व प्रेम हवे असते. कायावाचामने त्यांचा दास व्हावे लागते. त्यासाठी पूर्ण निष्ठा, सात्विक प्रेम व नि:स्वार्थ भक्ति ह्या तीन गोष्टी जतन कराव्या लागतात. म्हणूनच आध्यात्मिक गुरुंच्या आश्रयास राहून त्यांची कृपा प्राप्त करुन घेणे हे मानवी जीवनाचे मुख्य उद्दिष्ट होय.

आपल्या भारत देशात दत्तसांप्रदायी, दत्तभक्त अनंत आहेत. महर्षी नारदांनी निर्माण केलेला ‘‘ दत्तसंप्रदाय ’’ हा सर्वांत पुरातन व लोकप्रिय संप्रदाय आहे. श्रीदत्तप्रभू या संप्रदायाचे ‘आराध्यदैवत’ असून ते ‘योगनाथ’ असल्यामुळे योगाला या संप्रदायात उच्च स्थान प्राप्त झाले आहे. म्हणून या मार्गाचे सुलभ ज्ञान प्राप्त होण्यासाठी ‘‘सद्गुरुंची’’ नितांत गरज असते. श्रीदत्तप्रभू स्वत: ‘‘विश्वाचे गुरु’’ असल्यामुळे भक्ताला योग्य वेळी ‘‘सद्गुरुंची’’ भेट घडवून आणण्याचे कार्य गुप्तपणे करीत असतात. हा आजवरचा अनेक भक्तांचा अनुभव आहे. म्हणून सर्व संप्रदायात समन्वय साधणारा असा ‘‘दत्तसंप्रदायच’’ आहे.

भारतात अनेक ठिकाणी विविध संप्रदायात संघर्ष झाले. परंतु महाराष्ट्रात तसे संघर्ष घडले नाहीत.

कारण महाराष्ट्राने कोणतीहि अंधभक्ती स्वीकारली नाही वा केली नाही. मग अविवेकाचा स्पर्श तरी कसा होईल? वारकरी, नाथ, चैतन्य, आनंद, महानुभाव या सर्व पंथांनी, संप्रदायांनी, त्या त्या सत्पुरुषांनी, संतांनी श्रीदत्तप्रभूंची अत्यंत भक्तिभावाने स्तुती केलेली आहे.

वास्तविक वरील सर्व संप्रदायातील संतांचे, सत्पुरुषांचे दैवत वेगवेगळे! परंतु श्रीदत्तप्रभूंचे सद्‌गुरु रुपातील मार्गदर्शन या सर्वांना साधणारा दुवा होय. म्हणूनच दत्तउपासनेची महती महाराष्ट्रात आणि सकल भारतात पसरली.

तसे पाहता श्रीगुरुंचे अमुक एक ठिकाण, अमुक एक रुप असे काही ठरलेले नसते. गुरु हे देह नसून ते एक तत्व होय. मूलत: ''गुरु'' या शब्दाचा अर्थ ज्ञान शक्ती आहे. अंध:काराचे निवारण करुन ज्ञान देतात ते श्रीगुरु! दुसऱ्या अर्थाने पाहता कळून येते ''ज्ञान शक्ती'' ज्या माध्यमातून प्रकट होते ते माध्यम म्हणजे श्रीगुरु होत.

ही गुरु महती खऱ्या अर्थाने सर्वत्र रुजवली तो श्रीदत्तप्रभूंचा दुसरा अवतार श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराज होत. म्हणूनच त्यांना दत्तसंप्रदायाचे आद्य प्रवर्तक मानले गेले.

सत्युगापासून श्रीगुरु दत्तप्रभू अवतार धारण करीत ''विष्णूदत्त'' नाम धारण करुन आपले कार्य अखंडित करीत असता एके दिवशी माध्यान्ह समयी मद्रास प्रांतातील पिठापूर गावी आपळराज ब्राह्मणाच्या घरी भिक्षेसाठी गेले. त्यादिवशी त्यांच्या घरी श्राध्दकर्म होते. परंतु आपळराजाची पत्नी सुमती हीने सर्वशास्त्र नियम बाजूला ठेवून दारी आलेल्या अतिथीला अपार भक्तीभावाने भिक्षा वाढली. तिचा तो उत्कट श्रध्दाभाव पाहून दत्तप्रभूंनी आपले निजरुप प्रगट करुन सुमतीचा हात हाती घेऊन प्रेमाने म्हटले, ''माते, तुझ्या मनात काय असेल ते माग''! सुमतीने प्रभूंच्या वाक्यातील ''माते'' हा शब्द पकडून तोच खरा करुन दाखविण्याची विनम्रभावे इच्छा प्रगट केली.

सुमतीची प्रार्थना प्रभूंनी तात्काळ मान्य केली आणि आशिर्वाद दिला. प्रभूंच्या आशिर्वादाने पुढे सुमतीला वंशवृध्दारक, दैन्यहारक, भक्तांचे सदैव मंगल करणाऱ्या दैदिप्यमान पुत्राची प्राप्ती झाली ते म्हणजे ''श्रीपादश्रीवल्लभ''!

श्रीगुरुचरित्रामध्ये श्रीपादप्रभूंचे अगदी अल्प चरित्र वाचण्यास मिळते. त्यांचा कालखंड तीस वर्षांचा

मानला जातो. आपल्या आई-वडिलांजवळ अर्थात पिठापूरी ते १६ वर्षे राहिले. त्यापुढील १४ वर्षे कुरवपुरात राहून या अल्प काळात त्यांनी किती तरी दु:खी, पिडीतांचे दु:ख, संकटे दूर करुन त्यांच्यावर कृपा केली. अनेकांना ज्ञानामृत पाजून त्यांचा उध्दार केला. अंबिका नामे ब्राह्मणीस उपदेश करुन तिला आत्महत्येपासून परावृत्त करुन तिच्या मूढ मुलास ज्ञानी केले. इतकेच नव्हे तर तिने श्रीपादप्रभूंची प्रार्थना करुन ''पुढल्या जन्मी आपल्यासारखा ब्रह्मज्ञानी व सर्वांना पूज्य ठरणारा पुत्र प्राप्त होऊ दे '' ह्या तिच्या आराधनेस प्रसन्नता पूर्वक मान्य करुन तिला ''शनिप्रदोष समयी श्रीशंकराची उपासना '' करण्याचे व्रत सांगून, ''तुझी मनोकामना पूर्ण होईल'' असा आशिर्वाद दिला.

श्रीपाद प्रभूंचा ह्या आशिर्वादामागे एक रहस्य दडलेलं होतं. अर्थात त्यांनाच पुढे ''श्रीनृसिंहसरस्वती'' नावाने अवतार घ्यायचा होता. त्यासाठी प्रभूंनीच ही पार्श्वभूमी तयार करुन ठेवली होती. नियतीची ह्या अवताराशी आणखी एक लीला जोडली गेलेली होती.

कुरवपुरातच एक म्हातारा धोबी राहात होता. श्रीपादप्रभू ज्या वेळेस गंगा स्नानास जात असत, त्यावेळी हा धोबी कपडे धुण्यासाठी घाटावर येत असे. श्रीपादप्रभूंचे दिव्य, तेजस्वी व प्रसन्न रुप पाहून त्यांना भक्तिभावाने नमस्कार करुनच तो कपडे धुण्यास जात असे. असे नित्य दर्शन धोब्याला होत असे. एके दिवशी एक राजा आपल्या लव्याजम्यासह गंगेत विहारासाठी आला असता त्याचे ऐश्वर्य पाहून रजकाच्या मनात तशा प्रकारच्या सुखाची वासना निर्माण झाली. ती ओळखून श्रीपादप्रभूंनी त्याच्या उत्कट भक्तिभावावर प्रसन्न होऊन, ''तू पुढील जन्मी हे सर्व सुख भोगशील'' असा आशिर्वाद दिला.

खरे तर श्रीगुरु त्याचा तात्काळ उध्दारही करु शकले असते. परंतु परम नियतीच्या कार्यात वा नियमांमध्ये ढवळाढवळ करायची नव्हती हे एक कारण आणि दुसरे कारण म्हणजे श्रीपादप्रभूंचा जन्म हा ''कारणिक'' अवतार होता. त्यांना रजकास सर्व सुख भोगायला देऊन पुढे त्याचा उध्दार करायचा होता.

आपल्या ह्या अल्प काळात अनंत लीला, चमत्कार करुन श्रीपादप्रभू अश्विन वद्य द्वादशी या दिवशी गंगेत गुप्त झाले. हा त्यांचा ''निजानंदगमनाचा'' दिवस आजही ''गुरुद्वादशी'' म्हणून श्रध्देने पाळला जातो.

श्रीपादप्रभूंच्या आशिर्वादाने अंबिका ब्राह्मणी कारंजा गावी ''अंबा भवानी'' नावाने जन्म पावली. पुढे एक शिवव्रती ब्राह्मण माधव याच्याशी विवाहबध्द झाली. पूर्वसंस्कारानुसार म्हणजे श्रीपादप्रभूंच्या आशीर्वादानुसार विवाहानंतरही तिचे ''शनिप्रदोषाचे व्रत ''चालू राहिले आणि १६ वर्षांच्या व्रतानंतर तिच्या पोटी एक दिव्य व तेजस्वी बालकाने जन्म घेतला. या बालकाचे पाळण्यातील नांव ''शालग्रामदेव''! परंतु पुढे लौकिक नाम ''नरहरी'' असे रुढ झाले हेच श्रीगुरुदत्तात्रेयांचे दुसरे अवतार ''श्रीनृसिंहसरस्वती महाराज'' होय.

मौजिबंधन झाल्यावर नरहरींनी आपल्या मातेजवळ भिक्षा मागताना निरोप मागितला. परंतु आईची मातृवत्सलता परवानगी देईना. तेव्हा नरहरिंनी आपल्या आईच्या मस्तकी हात ठेवून तिला गतजन्मीच्या प्रसंगाचे स्मरण करुन दिले. पुढे आईला दोन पुत्र झाल्यावर जगतोध्दाराचे कार्य हाती घेऊन घर सोडले.

श्रीक्षेत्र काशीला जाऊन बहुतकाळाचे संन्याशी, वृध्द कृष्णसरस्वतींना गुरू करून त्यांच्याकडून संन्यास दिक्षा ग्रहण करुन काही काळ काशीतच ज्ञानार्जनाचे कार्य केले. संन्यासदीक्षा ही सदगुरूंकडून घ्यावी लागते. येथे सामान्य बुध्दीला प्रश्न निर्माण होतो, नरहरी तर ईश्वराचेच अवतार! मग यांना गुरूंची काय आवश्यकता? प्रत्यक्ष ईश्वरालाही गुरूंची गरज असते. प्रभू रामचंद्र वशिष्ठ मुनींना शरण गेले. भगवान श्रीकृष्णांनी सांदीपनीचे शिष्यत्व पत्करले. अशी अनंत उदाहरणे आपल्या समोर आहेत. बाळ नरहरीने श्रीकृष्णसरस्वती यांचे चरण पकडून माझा शिष्य म्हणून स्वीकार करुन मला उपकृत करा अशी मनोभावे विनंती केली. गुरुवर्यानी मोठया प्रेमाने त्याला पोटाशी धरुन म्हटले, तुझ्यासारख्याचा गुरू होणे हे माझ्या जीवनातील परमभाग्य आहे. माझा शिष्य होण्याची तुझी योग्यता आहेच. भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ असते. म्हणूनच मी तुझी विनंती मान्य करुन अतीव आनंदाने तुझा शिष्य म्हणून स्वीकार करतो. अशा तहेने नरहरीचा संन्यास घेण्याचा मार्ग मोकळा झाल्यावर लागलीच एका शुभमुहूर्तावर धर्मशास्त्रानुसार श्रीकृष्णसरस्वतींनी नरहरीस संन्यास दीक्षा दिली. सदगुरूंनी नरहरीस ''दण्ड" प्रदान करून संन्यासधर्माच्या शास्त्राप्रमाणे नरहरीचे ''नृसिंहसरस्वती " असे नामाभिधान केले. तेथून देश पर्यटनाला बाहेर पडले. बदरीकेदाराचे दर्शन घेऊन गंगासागरी आपल्या मुनींचा मेळा बरोबर घेऊन सर्वांसह गंगातटाक यात्रा करीत प्रयाग क्षेत्री उतरले. येथेच त्यांनी ''माधव'' नामक ब्राह्मणास संन्यास दिक्षा देऊन शिष्य करुन ''माधवसरस्वती'' असे त्याचे नामकरण केले. या आपल्या प्रथम शिष्यावर त्यांचे अपार प्रेम

होते. पुढे यात्रेदरम्यान बाळकृष्णसरस्वती, कृष्णसरस्वती, उपेंद्र माधव सरस्वती, दयानंद सरस्वती, ज्ञानज्योती सरस्वती आणि सिध्द सरस्वती असे आणखी सहा शिष्य लाभले. या सर्वांसह तीर्थयात्रा करीत श्रीनृसिंह सरस्वती स्वामी दक्षिणेकडे आपल्या घरी कारंजनगरीत आले.

वयाच्या नवव्या वर्षी श्रीनृसिंहसरस्वती स्वामींनी घर सोडले होते आणि तीस वर्षांनी पुन्हा आपल्या माता-पित्यांस भेटण्यास आले होते. त्यांचे दिव्य तेजस्वी रुप पाहून माता-पित्यांना आणि ग्रामस्थांना त्यांच्याविषयी अपार श्रध्दाभाव निर्माण झाला. त्यांच्या भावंडांनाही आपल्या तेजसंपन्न जेष्ठ बंधूला पाहून मनात प्रेमभावना दाटून आली. स्वामींनी आपल्या भगिनीस (रत्नाईस) तिचे पुढील आयुष्याचे भाकित सांगून गतजन्मीच्या केलेल्या पापाची कल्पना देऊन त्यावर योग्य उपाय सुचवून भगिनीची पापांतून सुटका केली. घरच्या सर्व प्रिय जणांना, ग्रामस्थांना, भक्तांना आपला अल्प सहवास देऊन स्वामी त्र्यंबकेश्वरला निघाले.

गोदावरीची तटाकयात्रा पूर्ण करुन स्वामी मंजरिका गावी आले. येथे माधवारण्य मुनी वास्तव्य करुन होते. श्रीगुरु येथे आले आहेत हे कळताच मुनी त्यांना सर्वस्वाने शरण गेले. त्यांचा उत्कट भक्तिभाव पाहून स्वामींनी त्यांना आत्मबोध करुन परमसिध्दीचा आशिर्वाद दिला आणि वासर ब्रह्मेश्वरी आले. येथे त्यांनी एका ब्राह्मणाची जठरव्यथा सायंदेवाच्या घरी आपल्या समवेत भोजन करण्यास बसवून त्याला निरोगी बनविले. त्यासमयी सायंदेवाची हृदयव्यथा अर्थात बादशहाची भीती मनी ओळखून, त्यांनी सायंदेवाला निर्भयपणे बादशहास जाऊन भेट, तू परत येईपर्यंत मी येथेच थांबतो असे म्हणून त्याची बादशहाकडे रवानगी केली.

श्रीगुरुंची लीला पहा, बादशहाच सायंदेवाला घाबरला आणि त्याने वस्त्रभूषणे देऊन सायंदेवास सन्मानाने घरी पाठविले या अद्भूत घटनेने सायंदेवाच्या रोमारोमात गुरुभक्ती उमलून त्याच्या हृदयी श्रीगुरुंची चरणकमले कायमची स्थिरावली.

तेथून निघताना श्रीगुरुंनी सायंदेवास, तुझ्या गावाजवळच काही काळाने आपण भेटू असे आश्वासन देऊन परळीवैजनाथ येथे आले. प्रत्येक ठिकाणी श्रीगुरुंच्या लीलेने त्यांच्याभोवती सकाम, श्रध्दाळू शिष्यांचा समूह गोळा होऊ लागला. त्या सर्वांना तीर्थयात्रा करण्याचा आदेश देऊन श्रीगुरु तेथे एक वर्षभर अज्ञातपणे राहिले. या काळात त्यांच्या सेवेला फक्त ''सिध्द सरस्वती'' हा एकमेव शिष्य होता. त्याच

दरम्यान श्रीगुरुंनी एका गुरुद्रोही ब्राह्मणास गुरुमहात्म्य सांगून त्याचे मन विकल्परहित केले.

वर्ष पूर्ण होताच श्रीगुरु तेथून भिल्लवडी ग्रामी आले. तेथील कृष्णा नदीच्या पश्चिम तीरावर औदुंबराच्या विस्तीर्ण छायेत चातुर्मास करण्यासाठी राहिले. हा परिसर ''भुवनेश्वरी'' देवीच्या शक्तीस्थानामुळे ''सिध्दस्थान'' म्हणून प्रसिध्द होता. तिच्यासमोर कोल्हापूरच्या एका मंद बुध्दीच्या ब्राह्मणाने विद्याप्राप्तीसाठी घोर प्रार्थना आरंभली होती. तिच्या कृपेची वाट पाहण्याइतका त्याला संयम नव्हता म्हणून त्याने एका धारदार शस्त्राने स्वत:ची जीभ कापून टाकली आणि मनात संकल्प केला, आता माझी आस पुरविली नाहीस तर शिर कापून तुझ्या चरणी वाहीन. तात्काळ देवी साक्षात प्रगट झाली आणि तिने त्याला पैलतीरी श्रीगुरुंकडे जाण्यास सांगून गुप्त झाली. त्याने ताबडतोब नदीत उडी टाकून पैलतीर गाठला आणि श्रीगुरुंच्या चरणी विनम्रपणे मस्तक ठेवले. त्याच्या भक्तिभावाने प्रसन्न होऊन श्रीगुरुंनी त्यास प्रेमाने उठवून त्याच्या मस्तकी आपला वरदहस्त ठेवताच त्या मंद बुध्दी ब्राह्मणाला जीव्हा फुटून सर्व ज्ञान प्राप्त झाले.

चातुर्मास पूर्ण करुन स्वामी कृष्ण-पंचगंगा संगमावर अमरापूर ग्रामी आले. हे निसर्गरम्य स्थान पाहून त्यांचे मन उल्हासीत झाले. मनमोहक सौंदर्यसृष्टी लाभलेली, कृष्णावेणी-पंचगंगेचा संगम असलेली, औदुंबर, शम्मी, वड, पिंपळ, बेल, पळस, चंदन, सरळ, साल, देवदार, खैर, रुई आदी देव वृक्षांनी बहरलेली आणि अनेक सत्पुरुषांच्या तपाने पावन झालेली ही भूमी पाहून श्रीस्वामींचे तप:प्रिय हृदय तेथेच विसावले. लोकवस्ती झालेली नव्हती. स्वामी महाराज येथे बारा वर्षे तप:साधना करुन राहिले.

येथे एक गोष्ट लक्षात आल्याशिवाय राहात नाही. श्रीपादश्रीवल्लभ व श्रीनृसिंहस्वामी या दोन्ही अवतारांनी जलतत्वाला अग्रस्थान दिले आहे. दोघांच्याही जीवनातील अधिकतम काळ तटाकयात्रा करण्यात, नदीकिनारी अर्थात संगमस्थानी वास्तव्य करण्यात गेला. आणि अवताराची समाप्तीही नदीप्रवाहातच झाली आहे. श्रीपादवल्लभांनी कृष्णेच्या घाटावर कुरवपुरात आपला काळ व्यतित केला. तर नृसिंहसरस्वती स्वामींनी कृष्णावेण्णी-पंचगंगा आणि भीमा-अमरजा संगमस्थाने आपल्या सहवासाने पवित्र पावन केली.

श्रीगुरु जेव्हा कृष्णावेणी-पंचगंगा संगमावर आले ते साल होते, १४२२! तत्पूर्वी श्रीरामचंद्र योगी व इतर काही महात्म्ये तपाचरणासाठी येथे येऊन राहिले होते. आपल्या तपश्चर्येने त्यांनी ही ''तपोभूमी''

बनविली. श्रीगुरुंच्या येथील येण्याने, वास्तव्याने आणि तपश्चर्येने या स्थानाचा महिमा वाढत गेला. त्यांच्या नावावरुन या पुण्य क्षेत्राला ''नृसिंहवाटिका'' असे नाव प्राप्त झाले. पुढे ''नृसिंहवाडी'' असे नांव पडले.

येथील वास्तव्यात श्रीगुरुंनी जवळच असलेल्या शिरोळग्रामी एक चमत्कार केला. त्याचे प्रतिक आजही येथे पाहण्यास मिळते. एके दिवशी दुपारी बाराच्या सुमारास शिरोळ ग्रामी एका गरीब पण सुशील कुलकर्णी नामे ब्राह्मणाच्या घरी भिक्षेस गेले. ब्राह्मणाची पत्नी सुशीला ही सुध्दा पतीप्रमाणे सुशील व दत्तभक्त होती. त्या समयी तो ब्राह्मण भीक्षेसाठी बाहेर गेला होता. पत्नी सुशीला एकटीच घरी होती. तिला दरवाजावर ''नारायण नारायण'' हे शब्द ऐकू आले. लगबगीने ती बाहेर येताच हाती दंड, कमंडलू, भस्मांकित कांती असे तेजस्वी स्वरुप तिच्या दृष्टीस पडताच तिने मन:पूर्वक नमस्कार करुन त्या यतीस बसण्यास आसन दिले.

आसनावर बसताच श्रीगुरुंनी तिला, मला फार भूक लागली आहे, काय असेल ते वाढ असे म्हटले. यतिराजांच्या बोलण्याने तिचे अठराविश्वे दारिद्र्य जागृत होऊन दु:ख झाले. परंतु चेहऱ्यावर ते न दाखविता भक्तिभावाने त्यांना म्हणाली, ''महाराज माझे पती भिक्षेसाठी बाहेर गेले आहेत. एवढ्यातच येतील! आपण थोडा वेळ थांबावे.'' परंतु श्रीगुरुंना खूपच भूक लागली होती. तेव्हा ते म्हणाले, जे असेल ते वाढावे. माते घरात कण्या आहेत, त्या शिजवून वाढ. यतींचे बोल ऐकून तिची भक्ती जागृत झाली आणि एका गाडग्यात असलेल्या कण्या शिजविल्या. परंतु पुन्हा ती दु:खात बुडाली. या कण्या कश्यावर वाढून महाराजांना देऊ? कारण घरात वाढण्यासाठी काहीच नव्हते. साधी पत्रावळ देखील नव्हती.

श्रीगुरुंनी तीची अडचण जाणून बाहेरुन एक पाषाण पात्र म्हणून घेतला. तो स्वच्छ करुन आपल्याकडील असलेल्या कमंडलूतील पाण्याने त्यावर प्रोक्षण करुन त्यावर ॐ कार काढून ब्राह्मणीस त्यात कण्या वाढण्यास सांगितले. श्रीगुरुंनी प्रथम घास सेवन करुन परमसंतोषाने त्या कण्या आरपल्या. परत जाताना ते पाषाण ब्राह्मणीच्या हाती देऊन म्हटले, ''माते, यावर निष्ठा ठेवून याची पूजा अर्चा केल्यास संतती बरोबर लक्ष्मीही आपल्या घरी वास करील.'' असा तिला आशिर्वाद देऊन श्रीगुरु संगमावर परतले.

श्रीगुरु निघून गेल्यावर काही वेळातच तिचा पती भिक्षा मागून घरी आला. तिने घडलेली हकिकत पतीला सांगताच त्यास आपल्याला यतिमहाराजांचे दर्शन न झाल्याने अपार दु:ख झाले. त्याने ते पाषाण पाहताच त्यावर ॐकार, शंख, गदा, पद्म आणि पाच बोटांचे ठसे दिसू लागले. तेच ते शिरोळचे

भोजनपात्र म्हणून प्रसिध्द झाले.

धनधान्य ना सदनी भोजनपात्र! जाड्याभरड्या कणिका आधार मात्र।। आरेपाती त्या प्रेमे सति हस्त। प्रकटे करतल ठसे पाषाणी श्रीदत्त।।

अशी ही श्रीगुरुंची लीला! सामान्यांची मती का बरे गुंग होणार नाही? जेथे भक्तिभाव तेथे अनुभव! धन्य धन्य ते भक्त.

या बारा वर्षांच्या निवासात स्वामींनी अनेकांची दु:खे, संकटे दूर केली. कृष्णावेणी-पंचगंगा संगमासमोर असणाऱ्या अमरापूर ग्रामी मल्हारपंत कुलकर्णी गरीब ब्राह्मणाच्या घरी स्वामी भिक्षेस जात असत. अत्यंत गरीब असा हा ब्राह्मण. व्यवसाय भिक्षुकीचा असल्याने रोज जो काही शिधा मिळत असे त्यावरच त्यांची उपजिविका चालत असे. ब्राह्मण पती-पत्नी दोघेही सात्विक वृत्तीचे! दारी आलेल्या अतिथीस त्यांनी रिकाम्या हाती पाठविले नव्हते.

एखादे दिवशी शिधा मिळालाच नाही तर घरी असलेल्या घेवड्याच्या शेंगाची भाजी करुन दोघेही आनंदाने ग्रहण करीत. परंतु समाधानी राहात. एके दिवशी स्वामी त्यांच्या घरी भिक्षेला गेले असता ब्राह्मणाने त्यांना आनंदाने घेवड्याच्या शेंगाची भाजी करुन वाढली. त्यांच्या भक्तिपूर्वक भिक्षेने श्रीगुरुंना परम संतोष झाला. प्रसन्न मनाने ते उद्गारले, ''बाळा, तुझे दारिद्र्य नाहिसे झाले.'' ज्या ठिकाणी घेवड्याची वेल होती त्या ठिकाणी जाऊन स्वामींनी त्या घेवड्याचे मूळ उपटून काढले व संगमावर निघून गेले.

ब्राह्मणपत्नी, आपले अन्न नाहिसे झाले म्हणून फार शोकाकूल झाली. ब्राह्मणाने पत्नीची समजूत काढून वेल मुळासकट उपटून काढण्यासाठी माती खणू लागले. तोच घेवड्याच्या मुळाखाली हंडा दिसला. त्याने तो घरात नेऊन पाहिला असता त्यात द्रव्य दिसून आले. ब्राह्मण पत्नीने हे पाहताच तिला आनंद झाला. आपल्याकडे येणारे गुरुमहाराज सर्वसामान्य नसून ते दत्तात्रेयांचे अवतार आहेत याची त्या दांपत्याला खात्री झाली.

ही घटना श्रीगुरुंना सांगण्यासाठी ब्राह्मण पती-पत्नी धावतच संगमावर आली. श्रीगुरुंची पूजा करुन त्यांना ती हकिकत सांगितली. स्वामी त्यांना म्हणाले, ही गोष्ट कुणालाही सांगू नका. म्हणजे लक्ष्मी तुमच्या

घरी नांदेल. आता सुखा समाधानाने प्रपंच करा असा आशिर्वाद देऊन घरी पाठविले.

आजही अमरापूरात (औरवाडमध्ये) कुलकर्णी वाड्यात घेवड्याच्या वेलाच्या स्थानी शिवलिंगाचे छोटेसे मंदिर आहे. घेवड्याच्या वेलाचे प्रतिक म्हणून दररोज पूजा केली जाते. त्याचप्रमाणे पौष शुध्द द्वितीयेला घेवड्याचा शेंगांचा उत्सव साजरा होतो.

आज पुरातन अमरापूरला औरवाड असे नाव मुस्लीम राजवटीत पडले. विजापूरचा बादशहाचा अमंल अमरापूरपर्यंत होता. तसेच तत्कालीन काळी मुस्लीम वस्तीही होती. मराठीसोबत उर्दू भाषाही प्रचलीत होती. त्याकाळी अमरापूरमध्ये राहणाऱ्या लोकांमध्ये अचाट शक्ती होती. आपल्या अंगातील शक्तीने, ताकदीची कामे आश्चर्यकारकरित्या येथील माणसे सहज करीत असत. त्यामुळे विजापूर दरबारी ''अमरापूरचा'' नावलौकिक होता. त्यामुळे इतर ठिकाणी एखादी गोष्ट अमरापूरविषयी लोकांच्या कानी पडली की ते लोक म्हणत ''अमरापूरकी बात और है।'' अशी ही और काम करणारी, और माणसे अमरापुरात राहात होती, त्यामुळे सुध्दा अमरापुरला ''औरवाड'' असे नाव पडले असल्याचीही शक्यता असू शकेल.

श्रीगुरु अमरापुरला अमरेश्वर मंदिराजवळ गुप्तपणे राहात होते. कृष्णेच्या पश्चिम तीरावर नरसोबाची वाडी तर पूर्वतीरावर अमरापूर वा अमरेश्वर ही दोन्ही गावे वसली असून ती मूळ अमरापूर क्षेत्रातच आहेत.

श्रीस्कंदपुराणाच्या उपपुराणात ''कृष्णा महात्म्य'' अध्याय २४ व २५ मध्ये अमरापूर स्थानाचे महात्म्य वर्णिलेले आहे. अमरेश्वर लिंग हे फार पुरातन शिवशंकराचे स्थान आहे. इंद्र व इतर देवानींही येथे येऊन अमरेश्वराची पूजा व अमरतीर्थात स्नान करुन श्रीमहादेवांकडून कृपाप्रसाद प्राप्त केला आहे. अमरेश्वर म्हणजे साक्षात काशीविश्वेश्वर होत. नारदादी मुनी, योगी येथे नित्य दर्शनाला येतात. या शिवमंदिरात ६४ योगिनी या शिवदूतांपैकीच असलेल्या शक्ती देवतांचे वास्तव्य होते. अमरेश्वराससमोर असलेल्या औदुंबर वृक्षाखाली श्रीगुरु तपश्चर्या करत बसलेले असत. तेच साक्षात ईश्वर आहेत हे जाणून ६४ योगिनी भर दुपारी श्रीगुरुंकडे येऊन त्यांना नदीच्या खाली सुंदर महालात नेऊन त्यांची पूजा, आरती करुन त्यांना सुग्रास अन्नाचा प्रसाद, भोजन देत असत. स्वामींही तो प्रसाद अत्यानंदाने ग्रहण करीत. असा हा क्रम बारा वर्षे चालला होता.

तेथील ग्रामस्थांना याची काहीच कल्पना नव्हती. घनदाट जंगल असलेल्या औदुंबर वृक्षाखाली तपसाधना करीत बसलेले यतीवर गावात कोणाकडे भिक्षेसाठी गेलेले कोणालाही दिसले नव्हते. अन्नाशिवाय जास्त काळ कोणी जगू शकत नाही. मग हे यतीवर जंगलामध्ये एकटे राहून आपल्या भूकेचे निवारण कसे काय करतात, याचे सर्वांना नवल वाटत होते. काहींना तर या गोष्टींमुळे दाट संशयाने घेरले. त्याची एकमेकांत चर्चा होऊ लागली. काही संशयाने पछाडलेल्यांनी या गोष्टीचा छडा लावण्याचा प्रयत्न केला. आपल्यातील एका अतिउत्साही ब्राह्मणास त्या कामावर नेमून यतीवरांच्या संपूर्ण दिवसाच्या हालचालींवर गुप्त पाळत ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे तो ब्राह्मण कामास लागला. संगमावर माध्यान्ही अकस्मात त्याला अत्यंत भयानक अशी अनेक दृश्ये दिसू लागली. त्याचे सर्वांग भीतीने थरथरु लागले आणि त्याने जीवाच्या आकांताने तेथून धूम ठोकली. या प्रसंगाने त्याला वेड लागले.

त्याचवेळी गंगानुज नावाचा शेताची राखण करणारा गरीब शेतकरी काही कामानिमित्त संगमावर आला होता. त्याला तेथे कसलेही भीतीदायक दृश्य न दिसता उलट नवलाई वाटण्यासारखे अत्यंत रमणीय असे दृश्य दिसले. श्रीकृष्णामातेच्या उदरातून दैदिप्यमान देवी वर आल्या व श्रीगुरुंपाशी जाऊन त्यांना वंदन करुन श्रीकृष्णामाईच्या प्रवाहात शिरताना दिसल्या. श्रीगुरुही त्यांच्यासह प्रवाहात शिरताच तो प्रवाह दुभंगून मधोमध निर्जल वाट तयार झाली. सारे आत शिरताच पुन्हा नदीचा प्रवाह एक झाला.

पूर्वेकडील अमरेश्वरानजीकच्या काठाजवळ प्रवाहात त्या देवता व श्रीगुरु गुप्त झाले. ते अलौकिक दृश्य पाहून गंगानुज आश्चर्याने चकित झाला. त्या स्त्रीया नक्कीच देवकन्या असल्या पाहिजे आणि यतीवर प्रत्यक्ष परमेश्वर असणार या विचाराने त्याने मनातूनच त्यांना भक्तिभावाने नमस्कार केला. पुन्हा उद्या या ठिकाणी हे दृश्य पाहण्यासाठी येण्याचा निश्चय करुन गंगानुज घरी परतला.

येथे एक गोष्ट लक्षात येते, एकाच ठिकाणी, पाळत ठेवणाऱ्या ब्राह्मणास भीतीदायक दृश्ये दिसले आणि गंगानुजाला आनंददायक रमणीय दृश्य दिसले! असे का घडले? श्रीगुरुंची ही काय लीला होती?

गंगानुज तेथे निर्मळ, निरपेक्ष मनाने आला होता. ना त्याच्या मनी संशय होता ना विकल्प ! त्याला कोणाच्याही चारित्र्याबद्दल, दिनक्रमाबद्दल कसलेही कुतूहल नव्हते. वा कसलाही संशय नव्हता. या उलट त्या गुप्तहेराची परिस्थिती होती.

आपल्या ठरलेल्या निश्चयानुसार गंगानुज दुसरे दिवशी अत्यंत भक्तिभावाने औदुंबर वृक्षाजवळ आला. काल पाहिलेले ते रमणीय दृश्य पुन्हा दिसून श्रीगुरुंना पाहून आपली दृष्टी पावन व्हावी व त्यांना पूर्ण श्रध्देने वंदन करण्याचे परमभाग्य प्राप्त व्हावे हा इतकाच हेतू मनी धरुन गंगानूज आज तेथे आला होता.

नित्याप्रमाणे माध्यान्ही त्या जलदेवता चौसष्ट योगिनी जलाबाहेर पडून श्रीगुरुंपाशी आल्या. इंद्रलोकीच्या अप्सरांनाही लाजवील असे त्यांचे सौंदर्य होते. सोज्वळ वेश परिधान करुन त्याला साजेशे मोजकेच अलंकार त्यांनी धारण केले होते. श्रीगुरुंना ओवाळण्यासाठी सर्व साहित्य आणि मनोहारी पुष्पहार त्यांच्या हाती होते. ते नयनरम्य दृश्य डोळ्यांची पापणी न हलवता गंगानुज एकाग्रतेने टिपत होता.

श्रीगुरुंपाशी जाऊन योगिंनीनी त्यांना प्रथम ओवाळले. पुष्पमाला अर्पण करुन श्रीगुरुंच्या चरणी वंदन करुन त्यांना पूजा व भिक्षा स्वीकारण्यासाठी आपल्याबरोबर येण्याची प्रार्थना केली. त्या भावपूर्वक प्रार्थनेचा स्वीकार करुन श्रीगुरु त्यांच्यासमवेत निघाले. त्यांनी श्रीकृष्णमातेच्या जलात पाऊल ठेवताच पाणी दुभंगून निर्जल वाट तयार झाली. आता मात्र गंगानुजाला आपले मन आवरता आले नाही. या ईश्वराची संगत सोडायची नाही या एकाच भावनेने तो झपाटून गेला होता. त्यांना मनोमन वंदन करीत व आपल्या उध्दारासाठी प्रार्थना करीत त्यांच्या पाठोपाठ चालू लागला. श्रीगुरुंच्या पाठमोऱ्या पावलांवर एवढ्या प्रेम व भक्ती भावनेने त्याची दृष्टी खिळली होती की तो श्रीगुरुंच्या पाठोपाठ सहजगत्या खेचला जात होता. पाण्याखाली एका भव्य नगरीत सर्वांचे आगमन झाले. योगिंनीनी श्रीगुरुंना मोठ्या आदराने एका महाली नेऊन एका रत्नजडित सुवर्णासनावर बसवून त्यांच्यावर पुष्पवृष्टी केली. स्तुतिस्तोत्र गायन करुन श्रीगुरुंचे षोडषोपचारे पूजन करण्यात आले. काहीजणी चवऱ्या हाती धरुन श्रीगुरुंना हळूवारपणे वारा घालीत होत्या. काहींजणींची पूजा साहित्य देण्याघेण्यात लगबग चालली होती. तर काहीजणी श्रीगुरुंना काही हवे असल्यास ते देण्यासाठी त्यांच्या आज्ञेची वाट पाहात एकाग्रतेने त्यांच्या जवळ उभ्या होत्या.

श्रीगुरुंच्या पाठोपाठ मंत्रमुग्ध होऊन आलेला गंगानुज त्या महालातील एका खांबाजवळ उभा राहून श्रीगुरुंच्या पूजनाचा अपूर्व सोहळा पाहात होता. ती पूजा आपणच करीत आहोत अशा कल्पनेत त्याचे मन व दृष्टी दंग होऊन गेली होती. त्याला श्रीगुरुंशिवाय अन्य काहीच दिसत नव्हते. डोळ्यांतून आनंदाश्रू वाहत असतानाच आपल्या राहिलेल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण श्रीगुरुंच्या सेवेत जावा अशी तो मनोभावे

श्रीगुरुंना करुणा भाकत होता.

सर्व योगिनींची पूजा झाली होती. त्या सर्वांवर श्रीगुरु कृपा नजर फिरवित असता गंगानुज त्यांच्या दृष्टीस पडला. श्रीगुरुंनी त्याला जवळ बोलावले व तू कोण? येथे कसा व कशासाठी आलास? हे विचारले. गंगानुज अगोदरच श्रीगुरुंच्या भक्तीत रममान झाला होता. प्रत्यक्ष तेच आपली विचारपूस करीत आहेत याचे भान होताच, त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून मर्यादातिक्रमण घडल्याची क्षमा मागून आपण येथे कसे पोहोचलो हे सर्व सत्य कथन करुन गंगानुज म्हणाला, ''देवा, आपण माझ्या अंतरीची भावना, माझे मन, माझी श्रध्दा जाणता. आपल्यावरील भक्तीप्रेमाने, श्रध्देने व देवत्वाने मला मंत्रमुग्ध करुन येथे आणले आहे, आणि हा दिव्य सोहळा पाहण्याचे परम भाग्य मला लाभले. आता उर्वरीत आयुष्याचा क्षण अन् क्षण आपल्या सेवेत जाईल असा आशिर्वाद देऊन माझा उध्दार करा. आपल्या परम पवित्र चरणांजवळ आसरा देऊन उपकृत करा.''

श्रीगुरु गंगानुजाच्या मनातील निष्कपट भाव पाहून संतुष्ट झाले व म्हणाले, ''तू निश्चिंत राहा! तुझ्याकडून कोणताच प्रमाद घडलेला नाही. तुझ्या भक्तिभावाने मी आनंदी झालो आहे. तुझी श्रध्दा, अतुट भक्तिभाव, निर्मल अंत:करण मी जाणले आहे. ह्या क्षणापासून तुझे दारिद्रय संपले याची खात्री बाळग. तू सर्वार्थाने सुखी होशील आणि अंती तुला सद्गती प्राप्त होईल. संगमापासून येथेवर जे काही तू पाहिलेस, अनुभवलेस ते कोणासही सांगू नकोस. हे पथ्य पाळले नाहीस तर तुझे अहित होईल. आता तू येथे भोजन करुन माझ्याबरोबरच परत निघ.'' श्रीगुरुंची मधुर वाणी ऐकून गंगानुजाला परमानंद झाला. श्रीगुरुंनी त्याच्या प्रेम भक्ती भावनेला दाद दिल्याचे पाहून त्याचे हृदय आनंदाने, समाधानाने भरुन गेले.

योगिनींनी नंतर श्रीगुरुंची आरती करुन त्यांना सुमधुर पक्वान्नांची भिक्षा अर्पण केली. श्रीगुरुंनी त्या भिक्षेचा संतोषपूर्वक स्वीकार केला. गंगानुजालाही भोजन-प्रसाद दिला. श्रीगुरुंनी चौसष्ट योगिनींना आशिर्वाद दिला व गंगानुजाला बरोबर घेऊन औदुंबर वृक्षातळी आले. दुसरे दिवसापासून गंगानुज आपल्या ठाम निश्चयानुसार नित्य श्रीगुरुंच्या सेवेसाठी औदुंबरापाशी येऊ लागला. सूर्योदय ते सूर्यास्त पर्यंतचा काळ श्रीगुरुंच्या सहवासात सेवा करत होता.

तो दिवस होता माघ पौर्णिमेचा! गंगानुज सकाळीच आल्या आल्या श्रीगुरुंना वंदन करुन म्हणाला, ''स्वामी, गावातील सारे ब्राह्मण म्हणत होते, माघ मासात प्रयाग तीर्थात स्नान केले असता पुण्य प्राप्त होते.

तेथून जवळच काशी, प्रयाग ही दोन पवित्र क्षेत्रे आहेत. त्यांचीही यात्रा करता येईल. देवा आपली अनुज्ञा असेल तर मी त्रिस्थळींची यात्रा करु का?''

गंगानुजाचे बोलणे ऐकूण श्रीगुरु त्याला म्हणाले, ''अरे वेड्या, त्या परम कृपाळू, दयाळू ईश्वराने तुझ्यासारख्या वृध्द असमर्थ भक्तांची इच्छा पूर्ण व्हावी म्हणून उत्तरेकडील प्रयाग, काशी व गया या तीर्थांसमान पुण्य, पवित्र तीर्थक्षेत्रे येथे दक्षिणेकडेही निर्माण करुन ठेवलेली आहेत. या पंचगंगेचा श्रीकृष्णेशी झालेला सुरेख संगम हेच ''प्रयाग'' होय. कृष्णाकाठी वसलेले गुगुळ (याला जुगुळ किंवा युगालय असेही म्हणतात) हे गाव दक्षिणेकडील ''काशी'' आहे. बेळगाव जिल्ह्यातील अथणी तालुक्यात गुगुळ हे गाव आहे आणि करवीरपुर अर्थात कोल्हापूर म्हणजेच दक्षिणेकडील ''गया'' होय. दक्षिणेकडील ह्या सर्व स्थानांचे माहात्म्य व पावित्र्य उत्तरेकडील प्रयाग, काशी, गया प्रमाणेच आहे. तुझी प्रबळ इच्छा झाली आहे ना, चल आताच ती पूर्ण करतो.'' असे म्हणून श्रीगुरु ज्या व्याघ्रासनावर बसले होते त्यावर आपल्या मागे व्याघ्रासनाचे एक टोक घट्ट धरुन डोळे बंद करुन त्या शेतकऱ्यास बसण्यास सांगितले. त्याने तसे करताच श्रीगुरु मनोवेगाने प्रयाग क्षेत्री पोहोचले. गंगानुजाला स्वत:बरोबर स्नान करण्यास सांगून माध्यान्ही काशीला आले. तेथे त्याला श्रीकाशीविश्वेश्वराचे दर्शन घडवून गया क्षेत्री गेले. अशाप्रकारे त्या भोळ्या भाबड्या पण श्रध्दाळू भक्ताची मनोकामना पूर्ण करुन सायंकाळी श्रीकृष्णावेणी-पंचगंगा संगमी परत आले.

श्रीगुरुंची ही अपूर्व लीला पाहून गंगानुज स्तंभित झाला. त्यांची थोरवी कशा प्रकारे करावी हेच त्याला कळेनासे झाले. पूर्ण भक्तिभावाने त्यांने श्रीगुरुंना पुन्हा पुन्हा वंदन करुन घरी परतला. घरी येताच त्याने घडलेल्या त्रिस्थळी यात्रेचा वृत्तांत आपल्या पत्नीस व मुलांस सांगितला. ते ही त्याच्या सांगण्याने आश्चर्याने भारावून गेले. असं म्हटलं जातं, स्त्रियांच्या कानी पडलेली गोष्ट कधी गुप्त राहणे शक्य नाही, ते सत्य ठरले. ही बातमी दुसऱ्याच दिवशी संपूर्ण गावभर पसरली आणि आजूबाजूच्या अन्य गावांत पसरायला वेळ लागला नाही. जो तो श्रीगुरुंजवळ येऊन कृपाप्रसाद मागू लागला. आपल्या सांसारिक अडचणी, आधी-व्याधींची कर्मकथा सांगून उपाय विचारु लागला. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत सर्व लोक श्रीगुरुंना भांडावून सोडू लागले. या सर्व काळात श्रीगुरुंना ना विश्रांती मिळत होती ना स्वस्थता! तेव्हा नाईलाज म्हणून श्रीगुरुंनी ते स्थान सोडून गाणगापूरी जाण्याचा निर्णय घेतला.

निर्णय पक्का होताच एके दिवशी श्रीगुरु अमरेश्वरापाशी गेले. तेथे अमरेश्वराची पूजा करुन त्यांचा निरोप घेऊन संगमावर औदुंबर वृक्षातळी आले. तोपर्यंत माध्यान्ह झाली होती. नित्याप्रमाणे ६४ योगिनी श्रीगुरुंना आपल्या मंदिरी घेऊन जाण्यासाठी आल्या, तो श्रीगुरु येथून प्रयाण करण्याच्या तयारीस लागल्याचे कळून आले. त्याने त्या अत्यंत दु:खी झाल्या. परंतु संयम राखून त्यांनी दु:खाश्रू रोखून धरले. परंतु चेहऱ्यावरचा निर्विकार लपून राहिला नाही. नित्याच्या प्रथेनुसार त्यांनी श्रीगुरुंना वंदन करुन ओवाळले व पुष्पमाला अर्पण करुन माध्यान्हीच्या पूजेसाठी, भिक्षेसाठी आपल्याबरोबर येण्याची भक्तिभावपूर्वक विनंती केली. त्यांचे उदासिनतेने झोकाळलेले चेहरे आणि दु:खाश्रूंनी डबडबलेले डोळे पाहून श्रीगुरुंचे अंत:करण कळवळले. त्यांनी योगिनींची विनंती मान्य करुन त्यांच्या समवेत निघाले.

श्रीगुरु आपल्याबरोबर येत आहेत हे पाहून योगिनींचे चेहरे प्रसन्नतेने उजळले. मंदिरी येताच श्रीगुरुंना सिंहासनावर बसवून नित्याप्रमाणे भावपूर्ण पूजा, आरती करुन त्यांना भिक्षा अर्पण केली. भिक्षा ग्रहण करुन श्रीगुरु संगमावर औदुंबरतळी परतले. सर्व योगिनी सुध्दा श्रीगुरुंना सोबत करीत औदुंबर वृक्षापाशी आल्या. श्रीगुरुंनी सर्वांना आशिर्वाद देऊन प्रहरभराने आपण हे स्थान सोडून गाणगापूर क्षेत्री प्रयाण करणार असल्याचे सांगितले.

श्रीगुरु येथून निघून जाणार ही कल्पनाच त्या ६४ योगिनींना सहन करवेना. त्यांचे कंठ दाटून येऊन डोळ्यातून अश्रू वाहू लागले. त्यांच्या चरणी लागून प्रार्थना करु लागल्या, '' आपल्या येथील सहवासाने, वास्तव्याने आमचे जीवन सुसह्य झाले आहे. आपणच निघून गेलात तर आपल्या पाठोपाठ येथील स्वर्गीय शोभाच नष्ट होईल. अन्नपूर्णाही ह्या स्थानाचा त्याग करील. आपल्या सेवेच्या लाभास आणि आनंदास आम्ही मुकलो तर आमचे जीवनच निरर्थक होईल. तेव्हा स्वामी, आम्हांस सोडून जाऊ नका. दिवसातून एकदा तरी आपल्या चरणांचे दर्शन मिळावे हीच आमची इच्छा आहे. कृपाळू जगन्नाथा, एवढी भिक्षा आमच्या पदरी घाला. प्रयाणाचा बेत रद्द केला हे आपल्या मुखातून ऐकण्यासाठी आमचे कान आसुसले आहेत. दयाघना, आमच्यावर कृपा करा. आमचा अंत पाहू नका.'' अशा तऱ्हेने त्या योगिनी काकुळतीला येऊन श्रीगुरुंची विनवणी करु लागल्या.

योगिनींच्या प्रेमळ व निष्कपट अंत:करणातून निघालेले कारुण्यपूर्ण बोल ऐकून दयाघन श्रीगुरुंचे मन गलबलले. परंतु हे स्थान सोडणेही अत्यावश्यक होते. श्रीगुरु त्या सर्वांना आश्वासनपूर्वक म्हणाले, ''शांत

व्हा! मी तुम्हांपासून दूर गेल्याचे तुम्हांला कधीही जाणवणार नाही. श्रीकृष्णावेणी-पंचगंगा संगमावरील हा औदुंबर वृक्ष हेच माझे दिव्यस्थान आहे. नित्य गुप्तरुपात चंद्र-सूर्य असेपर्यंत माझे वास्तव्य येथेच असणार आहे. या माझ्या शब्दांवर विश्वास ठेवा. तुम्ही साध्या नारी नसून जलदेवता आहात याचा विसर पडू देऊ नका. येथेच राहून माझ्या सोबतीने येणाऱ्या भक्तांच्या मनोकामना पूर्ण करा. अन्नपूर्णाही माझ्या आज्ञेने येथेच राहणार आहे. या सुरेख संगमाच्या व समोरील असलेल्या अमरेश्वराच्या परिसरात मी जरी गुप्तरुपाने वास्तव्य करीत असलो तरी माझ्या श्रध्दावान भक्तांना माझे अस्तित्व जाणवेल. येथून निघून जाताच हा मी जेथे उभा आहे तेथेच माझी पाऊले पादुकारुपात राहून सश्रध्द भक्तांना सहाय्य करण्यासाठी, त्यांच्या सद्वासना पूर्ण करण्यासाठी, संसारतापातून सुटका करण्यासाठी सदैव तत्पर असतील. सर्व प्रकारच्या दैवी शक्तींनी परिपूर्ण असलेला माझ्यातील देवत्वाचा अंश या पादुकांमध्ये सामावलेला आहे. हे माझे वचन आहे. या औदुंबरानेच मला आश्रय दिला आहे. त्या वृक्षातळीच माझ्या ''मनोहर पादुका'' राहणार आहेत. तुम्ही नित्य येथे येऊन या औदुंबराची पूजा करा. त्याची सेवा-पूजा ही माझीच सेवा-पूजा होय. मी जरी देहाने जात असलो तरी येथेच आहे हा विश्वास ठेवा.''

श्रीगुरुंनी गाणगापूरी निघण्यापूर्वी आणखी एक अलौकिक लीला केली. या लीलेमध्ये त्यांचे, नृसिंहवाडीला आपल्या पादुंकाद्वारे पवित्र पावन करुन या क्षेत्राचे तीर्थस्थान करुन नावलौकिक वाढविण्याचे प्रयोजन होते. श्रीकृष्णावेणी-पंचगंगा संगमाच्या दक्षिणेला अडीच-तीन मैलांवर आलास हे समृध्द गाव वसलेले आहे. देवधर्माच्या कामासाठी येथील ब्राह्मणांचे शिरोळ, कुरुंदवाड येथे नित्य जाणे-येणे होत असे.

या गावात भैरंभट नामक वृध्द ब्राह्मण राहात असत. सदाचारी त्याचप्रमाणे वेदसंपन्न! त्यांची पत्नीही अत्यंत शालीन व सुशील अशीच होती. पती हाच देव, गुरु आणि सर्वकाही मानून त्याप्रमाणे तिचे आचरण होते. दोघेही एकमेकांवर नितांत प्रेम करीत. घर छोटेसे परंतु मंदिर भासे. कोणीही अतिथी येवो, त्यांचे ह्या घरी यथोचित स्वागत व्हायचे. परंतु या दंपत्तीला एक दु:ख होते, त्यांना संतती नव्हती. त्यामुळेच की काय दोघेही एकमेकांची खूप काळजी घ्यायचे. संपूर्ण पंचक्रोशीत उभयतांना फार मान होता. भैरंभट्ट स्वत:च्या गावी तसेच अमरापूर, गोपूर, शिरोळ, कुरुंदवाड येथे जोशकीसाठी (पुरोहिताचे कार्य) नेहमी जायचे. शिरोळला जाताना अमरेश्वराचे दर्शन घेत. कृष्णानदीला जेथे उतार असेल तेथून

पात्र ओलांडून पश्चिमतीरावर येऊन पंचगंगेच्या काठाने शिरोळग्रामी जात असत. पावसाळा चालू झाला की नावेतून नदी पार करावी लागे. नावाडी अत्यंत आदराने भैरंभट्टांना पैलतीरी नेऊन सोडत. सूर्यास्तापूर्वी ते आपल्या ग्रामी परत येत. वयाची सत्तरी पार झाली तरी त्यांचा हा नित्यक्रम चालू होता.

एकदा शिरोळला जाताना भैरंभट्ट अमरेश्वराच्या दर्शनााठी थांबले होते. सकाळ झाली होती. श्रीकृष्णावेणीच्या पश्चिम तीरावर जवळच असलेल्या एका औदुंबर वृक्षाखाली एक यती बसलेले त्यांना दिसले. ती तेजस्वी मूर्ती पाहून त्यांचे हात अनाहूतपणे जोडले गेले. मनोमन नमस्कार करुन ते पैलतीरावर आले. त्या तेजस्वी यतीचे दर्शन भैरंभट्टांना आता अगदी जवळून झाले होते. त्यांना साष्टांग नमस्कार घालून उठताच श्रीगुरु फक्त ''नारायण'' म्हणाले. भैरंभट्ट तेथून शिरोळ ग्रामी आले. आपली कामे आटोपून घरी परतताना पुन्हा यती महाराजांचे दर्शन घेतले. घरी आल्यावर पत्नीस यतींचे दिव्य स्वरुप वर्णन करुन सांगितले. या दिवसानंतर त्यांचा यती दर्शनाचा नित्यनेम झाला. जोशकीच्या कामाचे निमित्त होऊन भैरंभट्टांना श्रीगुरुंच्या दर्शनाची ओढ दिवसेंदिवस वाढू लागली. श्रीगुरु ''नारायण'' शब्दाखेरीज इतर काही बोलत नसत.

एकदा नेहमीप्रमाणे भैरंभट शिरोळहून परतताना संगमावर आले तोवर संध्याकाळ झाली होती. श्रीगुरु त्यावेळी संगमावर सायंसंध्या करीत होते. त्यांना पाहून ह्यांनीही खांद्याची पडशी खाली ठेवून भस्मधारण करुन सायंसंध्या आटोपून घेतली. श्रीगुरुंना येऊन नमस्कार केला. ह्यावेळीही ''नारायण'' शब्द कानी पडला. एव्हांना संध्याकाळ उलटली होती. भैरंभट, पडशी खांद्याला लावून लगबगीने जायला निघाले. घरी जाण्याची ओढ लागली होती. तोच श्रीगुरुंचे बोल त्यांच्या कानी पडले, ''अंधार पडू लागला आहे. त्यात तुमचे वयही बरेच झालेले आहे. अशावेळी एकटऱ्याने दुर्गम वाटेने, जंगलातून जाणे बरे नव्हे. आज येथेच थांबून मुक्काम करावा व प्रात:काळी स्वगृही जावे.'' इतक्या काळानंतर प्रथमच त्यांना श्रीगुरुंची मधुरवाणी ऐकावयास मिळाली होती. तेच प्रत्यक्ष ''नारायण'' आहेत. परंतु दुसऱ्या क्षणी पत्नी घरी एकटीच असल्याची जाणीव झाली. नित्याप्रमाणे घरी गेलो नाही तर तिला चिंता वाटेल. त्यांच्या मनाची द्विधा अवस्था झाली. बरे श्रीगुरुंचे वचन टाळणेही ठीक नव्हे. असा विचार करुन ते तेथेच थांबले आणि हात जोडून श्रीगुरुंसमोर विनम्रभावाने बसले. श्रीगुरुंनी त्यांची चौकशी सुरु केली असता ते सांगू लागले, ''आम्ही आलास ग्रामीचे भारद्वाज गोत्राचे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. पिता वेदोनारायण होते. माझे उपनयन झाल्यावर त्यांच्याकडे बारा वर्षे शाखा अध्ययन झाले. आमच्या घरानजीकच श्रीविश्वेश्वराचे मंदिर आहे.

त्याची स्थापना आद्यशंकाराचार्यांनी केली आहे. तेथे नित्य पूजन व रुद्राभिषेक आमचे हातून घडत असतो. आमची कुलदेवता जगदंबा एकवीराचे नित्य ध्यान पूजन करतो. पंचक्रोशीतील सारे जन धर्मकृत्याकरीता पुरोहित म्हणून आदराने निमंत्रण देतात. माझी पत्नी सुशील व सदाचारिणी आहे. परंतु संततीसुख मात्र आम्हांला प्राप्त झाले नाही. आम्ही दोघेही आता वृध्द झालो आहोत. आर्थिक परिस्थितीही बेताची आहे. पण कुलदेवतेच्या कृपेने अन्नदोकाची चिंता वाटत नाही. घरी अग्निहोत्र असल्यामुळे तीर्थयात्रेला कधी गेलो नाही. ज्या दिवशी आपले प्रथम दर्शन घेतले त्या दिवसांपासून भरतखंडातील सर्व तीर्थे आपल्या चरणांपाशीच आहेत असे वाटू लागले. आपल्या मधूर वाणीतून निघणारा ''नारायण'' हा शब्दरव ऐकून मनाला फार प्रसन्नता वाटते.''

श्रीगुरुंना भैरंभटाची सारी कहाणी ज्ञात होती. म्हणून ते त्यांना म्हणाले, ''आमच्याविषयी एवढी श्रध्दा आहे तर येथेच या संगमावर राहायला या!'' श्रीगुरुंचे वचन ऐकून भैरंभट भांबावून गेले. त्यांनी पूर्ण जाणले होते, श्रीगुरु हे अवतारी पुरुष आहेत. पण त्यांच्या सूचनेवर काय बोलावे? हे कळेना. त्यांची द्विधा मनस्थिती ओळखून श्रीगुरु म्हणाले, ''या पवित्र तपोभूमीत आम्हांला येऊन बारा वर्षे झाली. आता दुसऱ्या स्थानी गमन करायचे आहे. इथून पुढे या स्थानाचा लौकिक वाढत जाणार आहे. येथे येणाऱ्या सकल भक्तांची मनोकामना पूर्ण करण्यासाठी आम्ही ''पादुका'' रुपाने कायम राहणार आहोत. या पादुकांचे नित्य पूजन अर्चन करण्यासाठी तुमच्यासारखे आचरण असणारा, श्रध्दाळू ब्राह्मण असणे आवश्यक आहे. तुमची दृढ निष्ठा, भक्तिभाव पाहून आम्ही प्रसन्न झालो आहोत. तेव्हा या उत्तम कार्यासाठी आपणच या स्थानी सहकुटुंब येऊन राहावे असे आम्हांस वाटते.''

श्रीगुरुंचे बोलणे ऐकून भैरंभट अधिकच गांगरुन गेले. त्यांचे विचारचक्र सुरु झाले. एक तर हा निर्जन आणि घनदाट जंगलाचा परिसर! येथे ना लोकवस्ती, ना शेजार-पाजार! जवळपासच्या गावातून येणाऱ्या लोकांची वर्दळही क्वचितच! दिवस कसा तरी निघून जाईल, परंतु रात्री समयी येथे कसा निभाव लागेल? शिवाय उदरभरणाचा प्रश्न आहेच. जरी हे सर्व पत्करुन श्रीगुरुंचे महत्व जाणून त्यांच्या आज्ञेने मी येथे राहण्यास तयार झालो तरी पत्नीचे काय? तिला ते जमेल का? कारण ती सुध्दा वृध्दापकाळामध्ये झुकली आहे. कधी कुठे दुखलंखुपलं तर जवळपास वैद्य ही नाही, ना कोणी नातलग! अशा रात्री-अपरात्री जाणार कोठे? आणि पावसाळ्यात श्रीकृष्णावेणी-पंचगंगा दुथडी भरुन वाहात असतात! तेव्हा कोठे

जायचे? काय खायचे? काय करायचे? अशा नाना विचारांनी भैरंभटांचे मन भयभीत झाले. तरीही थोडे धारिष्ट करुन श्रीगुरुंना म्हणाले, ''महाराज हे माझे जन्मोजन्मीचे भाग्य म्हणूनच साक्षात ईश्वराच्या पादुकांची सेवा करण्याची संधी प्राप्त झाली आहे. परंतु या घनदाट जंगलात, निर्जन परिसरात राहायचे तर पत्नीशी विचारविनिमय करावा असे मनात वाटते. तिची तयारी असेल तर मी मोठ्या आनंदाने येथे राहायला येईन.'' स्मित हास्याने श्रीगुरुंनी त्यांना मान्यता दिली. काहीशा अपराधीपणाने व भारावलेल्या अंत:करणाने भैरंभट महाराजांच्या जवळ गेले. त्यांचे पवित्र चरणकमल घट्ट पकडले. त्या अवस्थेतच त्यांचे थकलेले शरीर निद्रादेवीच्या स्वाधीन झाले.

इकडे भैरंभटांची साध्वी पत्नी त्यांच्या वाटेकडे डोळे लावून वाट पाहात होती. नित्य सूर्यास्तापूर्वी घरी परतणारे पती अंधार पडला तरी अजून का आले नाहीत? तिला खूप काळजी वाटू लागली. घरी अग्निहोत्र असल्यामुळे शास्त्र नियमाप्रमाणे पती परगावी गेले असतील तर पत्नी हवन, यजन करु शकते. त्याप्रमाणे यथाविधी पूजाअर्चा करुन पतीची पुन्हा वाट पाहात बसली. येव्हाना गावात सर्वत्र निजानिज झाली होती. मनाची तगमग वाढू लागली. नको ते विचार मनी येऊ लागले. आज एकादशीचा उपवास! रस्त्यात कोठे चक्कर तर आली नसेल ना? कोठे असतील? काय करीत असतील? चिंतेने तिचे मन भेदून गेले. होता होता मध्यरात्र होत आली. काय करावे ते सुचेना. अखेर देवघरात येऊन कुलदेवतेला हळदकुंकू वाहून व्याकूळ मनाने तिने प्रार्थना केली, ''माते जीवाची फार तगमग होत आहे. आता तूच माझ्या पतीचे रक्षण कर! तू आमची कुलदेवता आहेस. आमच्या रक्षणाची जबाबदारी तुझीच आहे.'' अशा तळमळीने प्रार्थना करता करता तिला ग्लानी आली व तेथेच पडून राहिली. तोच एकवीरा माता प्रकट झाली आणि म्हणाली, ''हे पतिव्रता, मुळीच चिंता करु नकोस. श्रीकृष्णावेणी-पंचगंगा संगमावर औदुंबर वृक्षातळी ईश्वराच्या सान्निध्यात तुझे पतिदेव सुरक्षित आहेत. त्यांची आता तुमच्यावर कृपा होणार आहे. म्हणून मी स्वत: तुझी सोबत करण्यास आली आहे.''

कुलदेवता एकवीरा मातेच्या मंजूळ शब्दांचा ती साध्वी सुखाचा आनंद घेत होती. त्या अवस्थेत तिला संगमावरचे मनोहर दृश्य दिसू लागले. भैरंभट श्रीगुरुंच्या चरणापाशी गाढ झोपले होते. ते अनुपम दृश्य पाहता पाहता पहाट झाली. इतक्यात तिला जाग आली. तिचे सर्वांग रोमांचित झाले होते. एकवीरा माता आणि संगमावरील श्रीगुरुंचे रुप पुन्हा पुन्हा आठवत होते. मोठ्या उत्साहाने त्या साध्वीने सडासंमार्जन

केले. देवघरातील तेलवात नीट केली. घरात एक सुगंध भरुन राहिला असल्याची तिला जाणीव झाली. आज परसदारीचे कृष्णकमळ, सोनचाफा, प्राजक्ता, जाईजुईचे वेल फुलांनी बहरुन गेले होते.

इकडे संगम तीरावर प्रात:काली भैरंभटाना जाग आली. उठून पाहतात तो श्रीगुरु प्रात:स्नानासाठी चालले होते. श्रीगुरुंच्या मागोमाग तेही जाऊ लागले. मुख प्रक्षालन व देहशुध्दी करुन श्रीकृष्णेच्या प्रवाहात उतरले. श्रीगुरुंच्या अंगावरुन येणाऱ्या जलप्रवाहात स्नान घेऊ लागले. श्रीगुरुं भैरंभटांकडे कौतुकाने पाहू लागले. संध्यावंदन झाल्यावर श्रीगुरु औदुंबराकडे आले. भैरंभटांनी त्यांना साष्टांग नमस्कार घालून घरी जाण्याची आज्ञा घेतली. श्रीगुरुंनी प्रसन्नतेने त्यांना घरी रवाना केले. आता सूर्योदय झाला होता. भैरंभट घरी पोहोचले. रात्रभर प्रतिक्षा करणारी पत्नी त्यांच्या आगमनाने प्रफुल्लीत झाली. आनंदाने दोघांनी एकमेकांकडे पाहिले. आपले दिव्य अनुभव परस्परांना सांगायचे होते. पण परमानंदात रमलेले मन अजून बाहेर येत नव्हते. दोघांच्याही चेहऱ्यावर तो आनंद ओसांडून वाहात होता. दोघांचाही काही वेळ मूक संवादात निघून गेला. भैरंभट हात-पाय स्वच्छ करुन खांबाला टेकून बसले. हळूवारपणे बोलण्यास सुरुवात केली, ''काल रात्री श्रीगुरुंनी संगमस्थानी त्यांच्याजवळ ठेवून घेतले. तुम्हांला घोर चिंता लागली असेल नाही.'' त्यावर ती साध्वी म्हणाली, ''मला सर्व ठाऊक आहे. आपण प्रथम आपली नित्य कर्मे आटोपून घ्या! सर्व गोष्टी भोजनानंतर बोलू.'' भैरंभट चकितच झाले, जास्त काही न बोलता आपली पूजा-अर्चा उरकून घेतली. डोळ्यांसमोर सतत श्रीगुरुंची मूर्ती उभी राहात होती.

तोपर्यंत पत्नीने पाक्सिध्दी केली होती. देवाला नैवेद्य दाखवून झाला होता. गोग्रास, काकबळीही देऊन झाला. नेहमीप्रमाणे कोणी अतिथी येताहेत का हे पाहण्यासाठी भैरंभट दारात येऊन उभे राहिले. एक जटाधारी योगी दूरुन येताना दृष्टीस पडले. त्यांना सामोरी जाऊन घरी येण्याची विनंती केली. योगीवरांनी ती मान्य केली. पत्नी पाण्याने भरलेली घागर घेऊन बाहेर आली. योगीवरांनी हस्तपाद प्रक्षालन केले. माध्यान्ह स्नानही केले. साध्वीने केळीच्या पानावर सुग्रास अन्न वाढले. भैरंभटांनी प्रोक्षण करुन यतिरायांना अन्न ग्रहण करण्याची विनंती केली. श्रीगुरुच वेश पालटून त्यांच्या घरी आले होते. साध्वीने भावभक्तीने, उत्कट प्रेमाने वाढलेले अन्न श्रीगुरु रुचीने ग्रहण करीत होते. यतिराजांच्या भोजनानंतर भैरंभटांनी त्यांना दर्भाची चटई अंथरुन वामकुक्षी घेण्याची विनंती केली. योगीरायांनी ती मान्य केली आणि थोड्याच वेळात निद्रिस्त झाले. त्यानंतर भोजन उरकून दोघेही मध्यघरात बसून हळू आवाजात

बोलू लागली. भैरंभटांनी रात्रीचे वर्णन करताना म्हणाले, ''ते यतिराज म्हणजे प्रत्यक्ष दत्तप्रभूच आहेत. भक्तांच्या उध्दारासाठी अन्य ठिकाणी जाणार आहेत. त्या दिव्य पादुकांच्या पूजा-अर्चनाची जबाबदारी आपल्यावर सोपवणार आहेत. आता आपण दोघांनी विचारविनिमय करुन निर्णय घ्यायचा आहे.'' हे बोलताना त्यांना आठवण झाली, त्यांनी पत्नीस विचारले, ''मघाशी तू बोलून गेलीस, मला ठाऊक आहे. ती कोणती गोष्ट?'' तेव्हा तिने रात्रीचा आपला दिव्य अनुभव सांगितला. एकवीरा मातेने प्रत्यक्ष येऊन मला सोबत केली. एवढेच नव्हे तर संगमावरच्या यतींचे दर्शनसुध्दा घडविले. त्यांच्या चरणांपाशी तुम्ही निद्रिस्त झाल्याचेही मी पाहिले. महाराजांच्या आज्ञेचे आपण पालन करावयास हवे. परंतु त्या निर्जन जागी आपला निभाव कसा लागायचा? आपण दोघेही आता वृध्द झालो आहोत. शिवाय आपली काळजी घ्यायला अपत्यही नाही. तेथे लोकवस्तीही नाही. तुम्ही दिवसभर उद्योगासाठी गेलात आणि एखादे श्वापद वा चोर आले तर एकटीने मी काय करायचे? माझे मन त्या स्थानी राहायला धजत नाही. गुरु महाराजांच्या आज्ञेचे पालन करायचेच असे दोघांनाही मनस्वी वाटत होते. परंतु संभ्रम निर्माण झाला होता. शेवटी घरी आलेल्या यतिरायांना विचारुन निर्णय घ्यायचा असे ठरले.

तोपर्यंत योगीराजांची वामकुक्षी झाली होती. पडवीच्या बाहेर येऊन त्यांनी चुळा भरल्या आणि पुन्हा आसनावर येऊन बसले. ते पाहून भैरंभट पत्नीसह बाहेर आले. त्यांना वंदन करुन नम्रपणे म्हणाले, ''एक विचारायचे आहे.'' नि:संकोचपणे विचार असे योगीराज म्हणताच, त्यांनी काल रात्रीची सारी हकिकत तपशीलवार सांगितली. ती शांतपणे ऐकून योगी म्हणाले, ''संगमावरील ते संन्याशी साक्षात दत्तात्रेय आहेत. तुमच्या जन्मोजन्मीच्या पुण्याईमुळेच त्यांच्या नित्य सेवेचा तुम्हांला लाभ घडणार आहे. मनात कोणताही किंतू, भय न बाळगता लागलीच तेथे राहण्यास जा. त्यांच्या इच्छेप्रमाणे मनोहर पादुकांची सेवा, पूजा-अर्चा करण्यास सुरुवात करा. तुमच्यावर ते प्रसन्न असून तुमचा चरितार्थ चालविण्यास, तुमची सारी संकटे निवारण्यास समर्थ आहेत.'' असे सांगून दोघांना आशिर्वाद देऊन योगिराज निघून गेले.

उभयतांचा संगमावर जाऊन राहण्याचा निश्चय पक्का झाला. पंचक्रोशीत ही बातमी सर्वांना समजली होती. संपूर्ण पंचक्रोशीत भैरंभटांना खूप मान होता. या उतारवयात पत्नीसह ते गाव सोडून एका निर्जन स्थळी राहण्यास जाणार म्हणून काहींनी आपली चिंता बोलून दाखविली. परंतु काही वृध्द व अनुभवी

लोकांनी ईश्वराची कृपा झाली असल्याचे जाणले. अशांनी भैरंभटांना मनोमन पाठिंबा दर्शविला. भैरंभटांची थोरवी त्यांना कळून चुकली होती. शिवाय प्रत्यक्ष एकवीरा देवी त्यांच्या पत्नीस सोबत करण्यासाठी एक रात्र येऊन राहिली होती. हे साऱ्यांनाच समजले असल्याने साक्षात कुलदेवता रक्षणासाठी तत्पर आहे मग भय तरी कोणत्या गोष्टीचे उरते? उभयतांच्या मनाची आणि विचारांची एक वाक्यता होऊन तशी तयारीही झाली होती. त्याचप्रमाणे ग्रामस्थ, बंधुजन, नातेवाईक यांनीही त्यांच्या दैवी कार्याला अनुकूलता दर्शविली होती.

वर्षा ऋतु संपून आश्विनातले नवरात्र पार पाडून पौर्णिमाही झाली. अश्विन वद्य दशमीला दिवसातील सर्व कार्ये आटोपून भैरंभटांनी घरी वैश्वदेवाला नैवेद्य दाखविला. भोजन उरकल्यावर पुन्हा एकदा देवतांचे दर्शन घेऊन संगमाकडे प्रयाण करण्याची तयारी केली. त्यांना निरोप देण्यासाठी ग्रामस्थ, आप्तस्वकीय जमले होते. भैरवपत्नीने काही भांडीकुंडी, शिधासामुग्री, अंथरुण-पांघरुण, नित्याची वस्त्रे आणि यतिराजांचे प्रथम दर्शन घेत असल्याने त्यांना अर्पण करण्यासाठी फळेही घेतली. इतरांनीसुध्दा दूध, फळे, शिधा आणून दिले. उभयतांनी राहती वास्तू एका बांधवाच्या स्वाधिन करुन तिचे मनोभावे दर्शन घेऊन पाठमोरे होऊन संगमाकडे निघाले. सोडायला काही लोक वेशीपर्यंत निघाले. तर जवळची काही मंडळी या वृध्द दांपत्याला ओझे होऊ नये म्हणून संगमस्थानापर्यंत सोडावयास निघाली. मार्गात शुभ-शकून होऊ लागले. शुभ्र गाईंना बिलगून स्तनपान करणारी वासरे दिसली. मुंगुसाचे एक युगुल वाटेमध्ये दिसले. चातक, भारद्वाज पक्षांचा मंजूळ स्वर कानी पडला. डोक्यावर पाण्याने भरलेले कलश घेऊन सुवासिनी जाताना दिसल्या. या साऱ्या गोष्टींनी उभयतांचे मन प्रसन्न झाले. त्या आनंदात सर्व मंडळी अमरेश्वरात येऊन पोहोचली. त्याचे दर्शन घेऊन नदीतीरावर येताच श्रीगुरुंचा अनुग्रहीत गंगानुज आपली नौका घेऊन तेथे वाट पाहात होता. त्यांनी उभयतांना व काहीजणांना नौकेत घेऊन औदुंबर वृक्षातळी आला.

श्रीगुरु तेथे प्रसन्न चित्ताने बसलेले होते. भैरवपत्नीने त्यांना पाहताच तिचे अष्टसात्विकभाव जागृत झाले. भैरंभटांनी जवळ येऊन श्रीगुरुंना साष्टांग प्रणिपात केला. तिनेही श्रीगुरुंना वाकून नमस्कार केला. तोच स्वामींनी तिच्या ओटीत श्रीफळ घालून आशिर्वाद दिला ''अखंड सौभाग्यवती भव! पुत्रवती भव!'' त्यांचे आशिर्वचन ऐकून साध्वी नम्रपणे म्हणाली, ''महाराज आम्ही आता वृध्द झालो आहोत. या वयात पुत्रप्राप्ती कशी होईल? '' श्रीगुरु प्रसन्नतेने हसून म्हणाले, ''आमचा आशिर्वाद याच जन्मात सत्य होणार!

तुम्हांला लवकरच एक उत्तम पुत्र होईल. त्याला पुढे चार पुत्र होतील. औदुंबराला ज्याप्रमाणे फळे येतात त्याप्रमाणे त्या चारही पुत्रांचे वंश वाढतील.

आता आम्ही गाणगापूरी निघालो. इथे एका शिळेवर पादुका प्रकट होतील. त्यांचे तुम्ही आणि तुमच्या पुढे होणाऱ्या वंशजांनी चंद्र-सूर्य असेपर्यंत म्हणजेच पिढ्यान पिढ्या पूजा-अर्चन करावे. या ''मनोहर'' पादुकांच्या रुपाने आमचे अखंड अस्तित्व राहणार आहे. तुम्ही त्याची सदैव प्रचिती घेत राहाल. येथे येणाऱ्या भक्तांच्या मनोकामना पूर्ण होऊन या क्षेत्राचा उत्तरोत्तर नावलौकिक वाढत जाईल.'' इतके बोलून श्रीगुरुंनी औदुंबरालगत असलेल्या एका पाषाणावर आपल्या हाती असलेल्या कमंडलूतील कृष्णाजल शिंपडले. स्वहस्ते तो स्वच्छ करुन त्यावर बोटांनी ओंकाराबरोबर मानवी पावलांच्या दोन मुद्रा रेखाटल्या. त्या सभोवती शंख, चक्र, गदा, पद्म, जंबूफळ इत्यादी स्वस्ति चिन्हेही रेखाटली. पाहता पाहता त्या पाषाणावर ''मनोहर पादुका'' प्रकट झाल्या. ते पाहून भैरंभट उभयता आणि सोबत आलेल्या नातलगांचे हृदय भावभक्तिने फुलून गेले. नेत्रांतून आनंदाश्रू ओघळू लागले. श्रीगुरुंना आणि मनोहर पादुकांना त्यांनी वारंवार नमन केले. एका दिव्य व अलौकिक प्रसंगाचे ते सारे साक्षी झाले होते. तेजस्वी मनोहर पादुका आणि श्रीगुरुंची दिव्य मूर्ती यांच्याकडे भक्तिभावाने पाहता पाहता साऱ्यांचे भान हरपून गेले होते.

काहीवेळाने श्रीगुरुंनी भैरंभटाना म्हटले, ''तुम्ही आणलेली सर्व शिधासामुग्री मनोहर पादुकांसमोर ठेवा. प्रत्यक्ष अन्नपूर्णा त्यात अवतरणार आहे. तिचे मन:पूर्वक पूजन करा. तुमच्या पुढील सर्व वंशजांना, या क्षेत्रात राहणाऱ्या ग्रामस्थांना, येणाऱ्या भक्तांना अन्न आणि उदकाची चिंता राहणार नाही.'' भैरंभटांनी व इतरांनी आणलेली सारी शिधासामुग्री एका वस्त्रावर मांडून ती मनोहर पादुकांसमोर ठेवून श्रीगुरुंच्या वचनाप्रमाणे अन्नपूर्णेचे पूजन करुन प्रार्थना केली.

अश्विन वद्य दशमीची ती संध्याकाळ! श्रीगुरुंच्या सत्य वचनाप्रमाणे साक्षात अन्नपूर्णा अवतीर्ण झाली. सर्वांनी अन्नपूर्णा माता, मनोहर पादुका आणि श्रीगुरुंना साष्टांग दंडवत घातले. संपूर्ण परिसरात अनामिक सुगंधाची दरवळ पसरली गेली. भैरंभटांच्या नातलगांनी त्यांना मनोहर पादुकांच्या जवळच एक पर्णकुटी बांधून दिली. भैरंभटांचे सामान तेथे नीट मांडून ठेवले. अंधाराची चाहूल लागली होती. सारे आपल्या गावी परतू लागले. उदईक वद्य एकादशी होती. द्वादशीला श्रीगुरुंच्या मनोहर पादुकांची महापूजा

करण्याचे सर्वमुखांतून ठरले. त्याकरीता सर्वांनी लवकरच यावे अशी भैरंभटांनी सर्वांना विनंती केली.

दुसरे दिवशी एकादशी! भैरव उभयता नित्याप्रमाणे पहाटेच उठले. शरीरशुध्दी झाली. भैरंभट पर्णकुटी बाहेर आले तो त्यांना श्रीगुरु कृष्णास्नानासाठी चाललेले दिसले. तेही त्यांच्या मागून चालू लागले. भैरव पत्नीने औदुंबर व मनोहर पादुकांसमोरील सर्व परिसर झाडून स्वच्छ केला. सडासंमार्जन करुन रांगोळी घालीत असताना तेथे आणखी कुणाचा तरी अदृश्य रुपात वावर असल्याची जाणीव होऊ लागली. सारा परिसर जलदगतीने स्वच्छ होऊन वातावरण मंगलमय होऊ लागले. म्हणून तिने आजूबाजूस पाहिले असता तिला काही दिव्य स्त्रीयांचा वावर दिसला. त्या होत्या ६४ योगिनी. काशीक्षेत्री असलेल्या मणिकर्णिका घाटावरील त्या योगिनी श्रीगुरुंच्या सेवेसाठीच श्रीकृष्णावेणी-पंचगंगा संगमक्षेत्री आल्या होत्या. भैरवपत्नीचे कुतूहल दूर करण्यासाठी तिच्या समोर येऊन उभ्या राहिल्या. साध्वीने त्यांना मन:पूर्वक नमस्कार केला.

भैरवपत्नीचा नमस्कार स्वीकारुन लागलीच त्या योगिनी श्रीगुरुंना स्नान घालण्यास निघाल्या. भैरंभटही तेथे स्नानासाठी हजर होतेच. एका सुवर्णकुंभामध्ये कृष्णजल घेऊन चौसष्ट योगिनी श्रीगुरुंना स्नान घालू लागल्या. आश्चर्याने थक्क होऊन तो प्रकार पाहात भैरंभटांनी श्रीगुरुंच्या अंगावरुन येणाऱ्या जलप्रवाहात स्नान केले. त्यानंतर पर्णकुटीत परतून त्यांनी संध्यादी कर्मे उरकून घेतली. एव्हाना सूर्यनारायण प्रकाशित झाले होते. भैरंभटांनी पादुकांसमोर बसून कृष्णजलाने स्नान घालून त्या स्वच्छ कोरड्या केल्या. भावभक्तिने पूजन करुन गंधपुष्प वाहिले. धूप-दिप दाखवून फळांचा नैवेद्य अर्पण केला. तद् नंतर रुद्र, श्रीसुक्त, पुरुषसुक्त, पंचसुक्त, पवमान इत्यादींचे पठण केले. संपूर्ण एकादशीचा दिवस श्रीगुरुंजवळ बसून भगवद्गीता, विष्णूसूक्त, विष्णूसहस्त्रनाम, शांतीपाठ इत्यादींचे आवर्तने करण्यात व्यतीत झाला. श्रीगुरु येण्यापूर्वीपासून श्रीरामचंद्र योगी येथे तपाचरण करीत होते. वृध्द भैरंभटां विषयी श्रीगुरुंना असलेला वात्सल्यभाव व मनोहर पादुकांचे अवतरण यांनी त्या परिसरातील सारे तापसी आश्चर्याने थक्क होऊन गेले. कठोर तपाचरण करुनही जे प्राप्त होत नाही, तो हा परमानंदाचा ठेवा वृध्द भैरंभटांना केवळ उत्कट श्रद्धेने प्राप्त झाला होता. श्री. रामचंद्र योगीवरांनी भैरंभटांना श्रीपादश्रीवल्लभ आणि श्रीनृसिंह स्वामींचे चरित्र कथन करुन ''मनोहर पादुका'' या श्रीपादश्रीवल्लभ श्रीनृसिंह सरस्वतींचे विशिष्ट रुप आहे असे सांगितले.

दिवसभरात घडलेल्या नवलाईंचे स्मरण करुन उभयता आपल्या कुटीत झोपी गेली. द्वादशीचा ब्रह्मप्रहर सुरु होताच दोघेही जागे झाले. देहशुध्दी झाली. आज सारा परिसर रम्यमय होऊन गेला होता. भैरव पत्नीने पादुकांसमोरील परिसरात झाडलोट केली. सडासंमार्जन करुन सुंदर रांगोळ्या घातल्या.

श्रीगुरुंची स्वारी कृष्णास्नानासाठी निघताच भैरंभटही त्यांच्या मागोमाग निघाले. संगमी ६४ योगीनी कृष्णजलाने भरलेला सुवर्णकुंभ घेऊन श्रीगुरुंची वाट पाहात उभ्या होत्या. अंबरातील नक्षत्र तेजाने चमचमणाऱ्या कृष्णाजलात श्रीगुरु उतरले. त्यांच्या पवित्र देहावरुन येणाऱ्या जलामध्ये भैरंभटांनी स्नान केले. तोपर्यंत भैरवपत्नीही तेथे आली. श्रीगुरुंना स्नान घालण्याचा तयारीत असलेल्या ६४ योगिनींनी बाजूला होऊन कृष्णजलाने भरलेला सुवर्णकुंभ साध्वीच्या हाती दिला. उभयतांनी श्रीगुरुदत्तात्रेयांना अनन्य शरण भावाने स्नान घातले. भैरंभटांनी पत्नीसह श्रीगुरुंना घातलेला तो पहिला जलाभिषेक होता. श्रीगुरुंचे स्नान होताच त्यांचा कृष्णजलाने भरलेला कमंडलू आणि दंड घेऊन भैरंभट आश्रमात आले. श्रीगुरुही त्यांच्या पाठोपाठ येऊन आसनस्थ झाले.

इकडे आलास, अमरापूर, गोपूर इत्यादी गावातील भाविकजन इष्टमित्र, नातलग आपली घरची कामे आटोपून संगमाकडे निघाले. सोबत दूध, दही, तूप, मध यांचे कलश घेतले होते. काहींनी फळे, साखर घेतली. काही बांधवांनी भैरंभट दांपत्यासाठी पात्र, वस्त्र, प्रावरणे आणली होती. मनोहर पादुकांची आज पहिली महापूजा होणार होती. सारी मंडळीं संगमस्थानी पोहचेपर्यंत सकाळ झाली होती. साऱ्यांनी श्रीगुरुंना व मनोहर पादुकांना साष्टांग नमस्कार घातला. या मंडळींमध्ये अनेक थोर वैदिक, पुराणिक, याज्ञिक होते. सारे श्रीगुरुंसमोर बसले. श्रीगुरुंनी भैरंभटांना पादुकांचे पूजाविधान सांगितले.

भैरंभटांनी पुण्याहवाचन आणि नांदीशास्त्र करुन स्थळ, काळ तिथी, वार, नक्षत्र, योग इत्यादींचा उच्चार करुन मनोहर पादुका पूजनाचा संकल्प सोडला. या पूजनाने सर्व तऱ्हेने फलप्राप्त होऊन सहकुटुंब, सपरिवार, आयुः, आरोग्य, ऐश्वर्यवृध्दी होऊन सकल दूरीतांचे शमन होऊन वंशवृध्दी व्हावी आणि सकल मंगल व्हावे ही कामना व्यक्त केली. श्रीगणेशाचे पूजन करुन कलश, घंटा, शंख व दीपपूजन केले. मनोहर पादुकांवर दृष्टी ठेवून आवाहन मंत्राचा उच्चार करताच पादुकास्थानी प्रत्यक्ष श्रीगुरु दिसू लागले. आसनासाठी अक्षता व पादुकांवर पाद्य पूजनासाठी कृष्णजल अर्पण केले, ते सुध्दा श्रीगुरुंच्या चरणांवर दिसू लागले. अशाप्रकारे अनेक उपचारागणिक श्रीगुरु आणि मनोहर पादुकांमधील एकत्व

दृष्टीस दिसू लागले. महापूजा झाल्यावर भैरंभटांनी नानाविध फळे आणि दूध यांचा नैवेद्य दाखविला. कर्पूर आरती करुन साष्टांग नमस्कार केला आणि श्रीगुरुंच्या संमुख येऊन त्यांनी मनोभावे प्रार्थना केली; ''स्वामी, केवळ आपल्या कृपाशिर्वादाने आपल्या दिव्य मनोहर पादुकांचे पूजन आमच्याकडून घडले आहे. आपले वचन सत्य होऊन आमच्या पुढील वंशजांकडून चंद्र-सूर्य असेपर्यंत आपल्या मनोहर पादुकांची पूजा-अर्चा, सेवा अखंड घडत राहो. सर्वांना सात्विक बुध्दी प्राप्त होऊन त्यांना यश, किर्ती, धन-धान्य, संतती, समृध्दी यांचा लाभ होवो. मानवी स्वभावाप्रमाणे काही अपराध घडले तर मातृवात्सल्याने, उदार अंत:करणाने सर्वांना अभय द्यावे. सर्वांवर कृपादृष्टी ठेवून येथे मनोहर पादुकांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांचे सवार्थ मंगल करावे.'' भैरंभटांनी अत्यंत कारुण्यभावाने केलेली प्रार्थना ऐकून सर्वांची हृदये सद्गदित झाली.

भैरवपत्नी आणि इतर स्त्रियांनी पुरणावरणाचा केलेला सुग्रास स्वयंपाक केळीच्या दोन पानांवर ठेवला गेला. एका पानावरील अन्नाचा मनोहर पादुकांना नैवेद्य दाखविण्यात आला. दुसऱ्या पानाची श्रीगुरुंना विधिवत भिक्षा वाढली. प्रसन्नतेने त्यांनी ते अन्नग्रहण केले. महापूजेला जमलेल्या सर्व भक्तांना भोजन करण्याची अनुमती दिली. सारे त्या महाप्रसादाने तृप्त झाले. एक प्रकारचा अलौकिक आनंद सर्वांच्या हृदयी भरुन राहिला होता. अशातऱ्हेने दोन घटीका झाल्या. आता श्रीगुरुंचे रुप अधिकच तेजस्वी दिसू लागले होते. ते आसनावरुन उठून उभे राहिले. दंड-कमंडलू हाती घेऊन त्यांना सर्वांवर दृष्टीक्षेप टाकला. भैरंभटांना लागलीच शंका आली. त्यांनी ताबडतोब श्रीगुरुंच्या चरणांना घट्ट मिठी मारुन म्हटले, ''स्वामी, आम्हांला सोडून कोठेही जाऊ नका.'' अश्रूंनी त्यांच्या चरणांवर अभिषेक केला. स्वामींनी प्रेमाने त्यांना उठवून सांत्वन करीत म्हणाले, ''तुमच्यासारखे सात्विक, भाक्तिभावाने परिपूर्ण अनेक भक्त आमची वर्षानुवर्षे वाट पाहात आहेत. त्यांच्यासाठी आम्हांला गाणगापूरी जावे लागत आहे. आणि तुम्ही शोक तो कशासाठी करता? मनोहर पादुका म्हणजेच आम्ही! त्या रुपाने येथे सदैव राहणार आहोत. तुम्ही स्मरण करताच तुमच्या समोर हजर होईन.''

श्रीगुरुंच्या मधूरवाणीने भैरंभट भानावर आले. सर्वांनी श्रीगुरुंना साष्टांग दंडवत घातले. स्वामीनी पूर्वदिशेकडे तोंड करुन हळूवार पावले टाकीत श्रीकृष्णा प्रवाहाजवळ आले. क्षणात प्रवाह दुभंगला आणि दुतर्फा सुगंधी फुलांनी बहरलेले वृक्ष, त्यामधून गेलेला एक सुंदर राजमार्ग सर्वांनी पाहिला. त्या

मार्गावरुन पुढे जात जात श्रीगुरु अंतर्धान पावले. सर्वकाही क्षणार्धात अदृश्य होऊन श्रीकृष्णा मातेच्या प्रवाहात पुन्हा लहरी प्रकटल्या. साऱ्यांनी शोकाकूल अवस्थेत श्रीगुरुंना हात जोडले. आणि मनोहर पादुकांसमोर आले आणि आश्चर्याने थक्कच झाले. मनोहर पादुकांच्या जागी श्रीगुरु प्रसन्न वदनाने बसलेले दिसले.

सर्व भक्तमंडळींचा आनंद द्विगुणीत झाला. त्यांनी संगमापासून थोड्या अंतरावर भैरंभटांना एक छोटेसे घरकुल बांधून दिले. भैरंभट आपल्या पत्नीसह दिव्य मनोहर पादुकांच्या पूजन-अर्चनात, सेवेत रमून गेले. श्रीकृष्णाच्या पूर्वतीरावर आलास, अमरापूर, गोपूर, शिरोळ येथील मंडळी नित्य दर्शनास येऊ लागली. अशा तऱ्हेने दिवसांमागून दिवस जाऊ लागले आणि एके दिवशी सर्वांना एक नवलाईची वार्ता कळली. भैरव पत्नी गरोदर राहिली होती. सर्व आनंदी झाले. श्रीगुरुंचे शब्द खरे झाले. तिचे कोडकौतुक, हवं नको ते बघण्यासाठी माहेरची मंडळी आली. नऊ मास नऊ दिवस पूर्ण झाले. भैरव पत्नीने एका गोंडस मुलाला जन्म दिला. श्रीगुरुंच्या आशिर्वादाने भैरवदांपत्याला एक उत्तम मुलगा प्राप्त झाला. मुलाचे नाव श्रीपाद ठेवण्यात आले.

मुलगा हळूहळू मोठा होऊ लागला. मनोहर पादुकांसमोर त्याची मुंज झाली. आपल्या जन्मदात्याकडेच श्रीपादाने स्वशाखेचे अध्ययन केले. श्रीगुरुंच्या सेवेत तोही रमून गेला. काळ पुढे सरकत होता. यथावकाश श्रीपादाचा विवाह झाला. श्रीगुरुंच्या आशिर्वादाप्रमाणे श्रीपादाला चार पुत्र प्राप्त झाले. पहिला नरहरी, दुसरा जाबाल, तिसरा श्रीपाद आणि चौथा सखाराम!

कालगतीच्या नियमानुसार भैरवदांपत्य अनंतात विलिन झाले. त्यांच्या नातवांचे वंशज औदुंबर वृक्षाच्या फळाप्रमाणे विस्तार पावले. भैरंभटाचे हे वंशज म्हणजेच आजचे श्रीनृसिंहवाडीतील समस्त पुजारी होत. श्रीगुरुंच्या सत्य वचनाप्रमाणे भैरंभटांचा आजही वंश विस्तार चालू आहे. त्यांच्या चार नातवांच्या वंशजांना फडा-पहिला, फडा-दुसरा, फडा-तिसरा, फडा-चौथा असे म्हटले जाते.

श्रीगुरु गाणगापूरी गेल्यानंतर त्यांच्या वचनाप्रमाणे एक अद्भूत घटना घडली. श्रीकृष्णावेणी-पंचगंगा संगमापासून चार मैलांवर शिरोळ गाव वसलेले आहे. त्या ठिकाणी गंगाधर नामक एक वेदशास्त्र संपन्न ब्राह्मण राहात होते. त्यांची पत्नी सुशील व पतिव्रता होती. परंतु या दांपत्याची संतती जगत नसे. त्यांना पाच पुत्र झाले पण सर्व मृत्यू पावले. पाचव्या पुत्राच्या निधनानंतर ती ब्राह्मणी फारच हतबल झाली. इतक्यात

ज्योतिषविद्येत पारंगत असलेल्या एका विद्वान ब्राह्मणाची माहिती तिला कळली. तिने स्वत:ची व आपल्या पतीची कुंडली घेऊन त्या विद्वान ब्राह्मणाची भेट घेऊन आपली कर्मकहाणी सांगितली. त्याने कुंडली पाहून म्हटले, ''गोवध, अश्ववध करणे, गर्भपात करणे वा कुणाकडून कर्ज रुपात द्रव्य घेऊन त्याची परतफेड न करणे इत्यादी प्रकारची निंदनीय कृत्ये गतजन्मी घडली असली तर संतती टिकत नाही. तू गतजन्मी गरजेपोटी एका शौनक ब्राह्मणाकडून शंभर मोहरा कर्ज म्हणून घेतल्या होत्यास. मुळात तो ब्राह्मण द्रव्यलोभी होता. त्याच्या सतत पाठपुरावाने तुझी हालाकीची परिस्थिती असल्याने तू त्याचे कर्ज फेडू शकली नाहीस. आपले धन परत मिळणार नाही या विंवचनेत त्याचा अंत झाला. मोहरांवरील वासना कायम राहून तो ब्राह्मण पिशाच्च झाला. तोच तुझी संतती वाढू देत नाही. त्या ब्राह्मणाच्या मृत्यूने त्याचा वंशही संपला व त्याचे क्रियाकर्मही झाले नाही. तू ऋणको या नावाने त्याचे क्रियाकर्म केलेस व त्याच्या गोत्रातील एखाद्या सदाचारी ब्राह्मणास तेवढे धन दिलेस तर तुझे पाप नष्ट होऊन त्या ब्राह्मणास मुक्ती मिळून तुझा वंशही वाढेल.''

ब्राह्मणी म्हणाली, ''मी दरिद्री आहे. जन्मभर जरी मी कष्ट केले तरी इतके द्रव्य जमणे शक्य नाही. पण माझ्या अल्पकुवतीनुसार त्या ब्राह्मणाचे और्ध्वदेहिक क्रियाकर्म अवश्य करीन.'' यावर त्या ज्योतिषी ब्राह्मणाने तिला उत्तम मार्ग सांगितला, ''असिम श्रध्देने, एकाग्र चित्ताने तू श्रीकृष्णावेणी पंचगंगा संगमी श्रीगुरुंच्या मनोहर पादुकांचे पूजन व तेथील औदुंबर वृक्षाची सेवा केल्यास निश्चितच तुला त्याची फलप्राप्ती मिळेल. श्रीगुरु अत्यंत दयाळू आहेत. आपल्या निष्ठावान भक्तांचे नित्य कल्याण करतात.''

दुसरे दिवशी त्या दु:खी ब्राह्मणीने आपल्या मनीची हतबलता झटकून निर्धाराने, दृढ विश्वासाने आपल्या पतीसह शिरोळहून श्रीनृसिंहवाडी येथे आली. संगमावर प्रात:स्नान करुन औदुंबर वृक्षाची व श्रीगुरु पादुकांची मनोभावे सेवा सुरु केली. दिवसभरात केवळ पेलाभर दूध ग्रहण करुन श्रीगुरुंच्या ''दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा'' ह्या संजीवनी मंत्राचा जप करीत औदुंबरास प्रदक्षिणा मारु लागली. यामुळे तिचे मनोबल आणि शारीरीक उत्साह वाढू लागला होता.

असे सतत तीन दिवस उलटल्यावर उत्तररात्री तिला एक स्वप्न पडले. तो ब्राह्मण पिशाच्च तिच्या स्वप्नात येऊन म्हणाला, ''अजून तू माझे ऋण फेडले नाहीस. तुझा वंश वाढूच देणार नाही. तुझाही नाश करुन टाकीन.'' असे म्हणून तिला मारावयास धावला. भीतीने ती ब्राह्मणी औदुंबराच्या मागे गेली. तेथे

श्रीगुरु उभे होते. त्यांनी तिला अभय दिले. तोपर्यंत त्या ब्राह्मणाचे पिशाच्च तेथे आले. श्रीगुरुंनी त्याला विचारले, ''तू का ह्या स्त्रीला त्रास देतोस?'' पिशाच्चाने सांगितले, ''गतजन्मी ह्या स्त्रीने माझ्याकडून ऋण घेतले होते ते परत केले नाही, म्हणून मी आत्महत्या केली. देवा आपण दयाळू आहात. आपण पक्षपात करु नका.'' श्रीगुरु म्हणाले, ''ब्राह्मणी माझी भक्त आहे. तिला यापुढे त्रास देऊ नको. मी सांगेन तसे केलेस तर तूझी या पिशाच्च योनीतून सुटका होऊन तुला मुक्ती मिळेल.'' पिशाच्चरुपी ब्राह्मणाने श्रीगुरुंचे वचन मान्य करुन म्हणाला, ''स्वामी आपणच मला सद्‌गती प्राप्त करुन द्या.''

श्रीगुरुंनी त्या ब्राह्मणीस जवळ बोलावून म्हटले, ''तुझ्याजवळ जितके द्रव्य असेल ते कोणा एका शौनक गोत्री ब्राह्मणास अर्पण कर आणि या पिशाच्चरुपी ब्राह्मणाचे दहा दिवस उत्तरकार्य कर. त्यामुळे तुझी गतजन्मीच्या पापातून सुटका होईल आणि त्या पिशाच्चालाही मुक्ती मिळेल. तसेच सात दिवस संगमी स्नान करुन औदुंबराची भक्तिभावाने सेवा केलीस तर तुला पूर्णायुषी पुत्र प्राप्त होतील.''

ब्राह्मणी स्वप्नातून जागी झाली. मनात दृढ विश्वास ठेवून तिने श्रीगुरुंच्या दृष्टांताप्रमाणे पिशाच्चाचे सर्व क्रियाकर्म केले. शेवटच्या दिवशी श्रीगुरुंनी तिच्या स्वप्नात येऊन दोन श्रीफळांनी तिची ओटी भरुन दोन पूर्णायुषी पुत्रांची माता होशील असा वर दिला. कालांतराने ब्राह्मणीस दोन मुले झाली. श्रीगुरुंच्या सेवेने व त्यांनी दिलेल्या आशिर्वादाने आपल्याला पुत्र प्राप्ती झाली याचा त्या ब्राह्मणीस अत्यंत आनंद झाला. मोठ्या मुलाची मुंज केली गेली. परंतु अनुजाच्या चौलकर्माच्या प्रसंगी त्या मुलास धनुर्वात जडला. सतत तीन दिवस-रात्री मरणाशी झुंज देऊन अखेरीस त्याने मृत्यूला स्वीकारले. या जगाचा निरोप घेतला.

आपल्या पुत्राचा अशाप्रकारे अकाली मृत्यू झाल्याचे पाहून ब्राह्मण दंपती शोकाकूल झाली. त्या सत्यस्थितीवर त्यांचा विश्वासच बसेना. त्यांच्या शोकाला सीमा उरली नव्हती. कलेवर पडलेल्या बाळाचे एक एक बोबडे बोल आठवून ती अविरत आक्रोश करु लागली. जमलेल्या शेजाऱ्यांस, नातेवाईकांस तिचा शोक पाहवेना. सर्वांनी तिची नानाप्रकारे समजूत घालण्याचा प्रयत्न केला. शोक आवरुन प्रेत अंतिम संस्कारासाठी देण्याची विनंती करु लागले. ब्राह्मणी म्हणाली, ''हे बाळ, मी देह कष्टावून, निष्ठेने, भक्तिभावाने केलेल्या श्रीगुरुंच्या सेवेच फळ आहे. त्यांनी दिलेल्या आशिर्वादाने या फळाचा अकाली नाश होणार असेल तर त्यांना भक्तवत्सल, कृपाळू, सत्यवचनी कोण म्हणेल? हे माझे लेकरु झोपले आहे. थोड्यावेळाने उठणार आहे. मी तुमच्या पाया पडते त्याला हात लावू नका वा जबरदस्तीही करु

नका आणि तसे करायचे असेल तर त्याच्यासह मलाही अग्नी द्या.'' असे म्हणून तिने मुलाचे कलेवर पोटाशी धरुन ठेवले. कोणाचाही तिच्यापुढे इलाज चालत नव्हता. कोणी पुढे आला की वाघीणीसारखी चवताळून उठायची व प्रेताला पोटाशी धरुन ठेवायची.

अचानक त्याचवेळी तेथे एक तेजस्वी बालब्रह्मचारी आला. आपल्या अत्यंत मधूर व आर्जवी शब्दात त्या ब्राह्मणीस म्हणाला, ''माते, हा वृथा शोक का करतेस? जन्म आहे म्हणजे मृत्यू येणारच! तो सृष्टीचा नियमच आहे. देवादिकांनाही मृत्यू थांबवणे शक्य नाही. जन्मास येणाऱ्या सर्व प्राणीमात्रांच्या या निवास स्थानाला जग असे म्हणतात. जग हा शब्द दोन अक्षरांचा आहे. ज या अक्षराने ''जनन'' शब्द होतो तर ग या अक्षराने ''गमन'' शब्द होतो. या दोन शब्दांचे प्रत्येकी पहिले अक्षर घेऊन ''जग'' शब्द अस्तित्वात आला. याचा अर्थच असा प्रत्येक प्राणीमात्राचे जनन व गमन अव्याहत चालू राहते. ही प्रक्रिया कधी थांबणार नाही वा कोणी थांबवू शकत नाही. श्रीरामकृष्णांनाही गमन करावेच लागले. एक गोष्ट खरी की आपण केव्हा या जगातून गमन करणार हे कोणालाही माहित नसते. हा प्राप्त झालेला नरदेह फेसासारखा, लाटेसारखा नश्वर आहे. जीवन व मृत्यूच्या दोघांमधील जो काळ आहे ते जीवन! तेव्हा तू शोक आवर. तू तुझा पुत्र मृत्यू पावला म्हणून शोकाकूल झाली आहेस पण सत्य असे की तो तुझा नव्हताच. प्रत्येक जण एकटाच जन्म घेतो व परत एकटाच जातो. येताना तो कुणाला आणत नसतो वा जातानाही कुणाला सोबत घेऊन जात नाही. माझे माता-पिता, माझे बंधू, भगिनी, काका-काकी इत्यादी सर्व नाती मानवाने मायेपोटी निर्माण केली आहेत. प्रत्येकाने कोठे जन्म घ्यावा, कोणाच्या संगतीत रहावे, किती काळ राहायचे, हे त्या ईश्वराने निश्चित केलेले असते व ते त्याचप्रमाणे घडत राहणार! हे माते तू माझे म्हणणे समजून घे आणि लक्षात ठेव, ईश्वरच आपला एकुलता एक नातेवाईक सत्य आहे. बाकी सारी नाती फसवी आहेत. ईश्वरच आपल्या जन्मापूर्वी आपल्यासोबत होता तोच आपल्याला साथ करतो. आपणच त्याला विसरुन जातो. त्याचे अस्तित्व, सहवास याकडे दुर्लक्ष करुन आपल्याच घमेंडित राहतो. म्हणून आपण त्याला दुरावतो. म्हणून तू आपला शोक आवरुन त्या बाळाचे कलेवर नातेवाईकांच्या स्वाधीन कर.''

त्या तेजस्वी बालब्रह्मचाऱ्याचा उपदेश श्रवण करुन ब्राह्मणी म्हणाली, '' प्रभू दत्तात्रेयांचे अवतार परमकृपाळू श्रीगुरुंच्याच आज्ञेने मी सेवा, उपासना केल्यावर परम संतोषाने त्यांनी मला स्वप्नात दृष्टान्त देऊन माझ्या ओटीत दोन श्रीफळे घालून त्यांचे भक्षण केल्यावर पूर्णायुषी पुत्र होतील असे वरदान दिले. मी

त्यांच्यावरील पूर्ण श्रध्देने माझा मुलगा पूर्णायुषी होणार यावर विश्वास ठेवला, ही माझी चूक झाली का? प्रत्यक्ष ईश्वरावर विश्वास ठेवायचा नाही मग अन्य कोणावर ठेवायचा? त्यांनी अनेक पुत्रांनंतर दिलेला हा पुत्र त्यांना परत न्यायचा असेल तर माझ्यासमोर प्रत्यक्ष येऊन न्यावा व पूर्णायुषी या शब्दाचा अर्थ सांगावा. अन्यथा संगमावर श्रीगुरुंच्या पादुकांवर मी देहत्याग करीन. त्यानंतरच माझ्या कलेवरासह माझ्या बाळाचेही कलेवर या मंडळींना मिळेल. मला अजूनही श्रीगुरुंवर पूर्ण विश्वास आहे की त्यांचे वचन कधीही असत्य होणार नाही. प्रारब्ध जर सर्वश्रेष्ठ असते तर ईश्वराचे सहाय्य कधीही, कोणालाही, काहीही केल्याने मिळाले नसते. श्रीहरींची कोणीही उपासना, सेवेची वाट कोणीही स्वीकारली नसती. ईश्वरावर ठाम श्रध्दा, विश्वास ठेवून त्या मार्गाने वाटचाल केल्यास प्रारब्धही बदलता येते असा माझा पूर्ण विश्वास आहे.'' ब्राह्मणीचे हे अत्यांतिक विश्वासाचे बोल ऐकून तो तेजस्वी बालब्रह्मचारी म्हणाला, ''तुझी ईश्वरनिष्ठा श्रेष्ठ असेल, तर दयाळू भगवंताला तुझे प्रारब्ध बदलण्यास भाग पडेल. ते अगदीच अशक्य नाही. आता विलंब न करता ताबडतोब तुझ्या मुलाला संगमावर श्रीगुरुंच्या पादुकांसमोर नेऊन ठेव. तुझे सर्व विचार त्यांना कथन कर. तेच तुला उत्तम मार्ग दाखवतील. जा! विलंब करु नकोस.''

ते बालब्रह्मचारी दुसरे तिसरे कोणी नसून त्या रुपात तेथे आलेले साक्षात श्रीगुरुच होते. ब्राह्मणीच्या कल्पनेनुसार तिच्या निष्ठेचा, भक्तीचा कस पाहण्यास तेथे आले होते. ब्राह्मणीने आपल्या मृत बालकाचे कलेवर आपल्या पोटाशी बांधून ती कृष्णावेणी-पंचगंगा संगमी औदुंबर वृक्षापाशी आली आणि ते प्रेत श्रीगुरुंच्या मनोहर पादुकांसमोर ठेवून आपल्या मनातील प्रश्नांचा, विचारांचा पुर्नरुच्चार केला. तिला आपला शोक आवरता न येऊन श्रीगुरुंच्या पादुकांसमोर आपले मस्तक आपटून हंबरडा फोडून श्रीगुरुंच्या सहाय्यासाठी अपार प्रार्थना करु लागली. शेजाऱ्यांनी, नातेवाईकांनी येथेही प्रयत्न करुन प्रेत ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला, पण ती ब्राह्मणी कशालाही बधली नाही. होता होता रात्रीचे साम्राज्य पसरु लागले. सकाळी परतून प्रेताचा अंत्यसंस्कार करु या विचाराने सारे घरी परतले. आता केवळ त्या प्रेताबरोबर माता-पिता तेवढेच होते.

आदल्या दिवशी सकाळी त्या मुलाचा मृत्यू झाला होता. आजची ही दुसरी रात्र होती. त्यावेळेपासून माता-पितांचा अनावर शोक चालू होता. ना निद्रा, ना मन:शांती, ना अन्नपाणी! त्यांच्या मनाप्रमाणे त्यांची शरीरेही पार थकून गेली होती. संगमावरील गारव्याने आणि जंगलातील निरव शांततेने त्यांना झोप

अनावर होत होती. परंतु निद्रादेवीला झुगारुन ते दांपत्य श्रीगुरुंची अविरत आळवणी करीत होते. अखेर त्यांच्या थकलेल्या शरीराला निद्रादेवीने घेरलेच. गाढ झोपेत ब्राह्मणीला स्वप्न पडले. एक जटाधारी, सर्वांग भस्मांकित असलेला, गळ्यात रुद्राक्षमाला धारण केलेला, हाती योगदंड व त्रिशूल आणि व्याघ्रचर्म परिधान केलेला तेजस्वी तपस्वी त्या पादुकांच्या जागी प्रकट झालेला दिसला. तिच्याकडे पाहून म्हणाला, आम्ही तुला उपद्रव होईल असे काय केले आहे? आमचे बोल कधीही असत्य होत नाहीत. भक्ताच्या शुध्द भावनेला वश होऊन आम्हाला अशक्य काही नाही. पण ते त्याच्या अतुट भक्तिभावावर, पूर्ण निष्ठेवर अवलंबून असते. मातेच्या प्रारब्धातच जर पुत्रयोग नसेल तर त्याला पूर्णायुषी पुत्र काय करणार? त्यामुळे तुझ्या पुत्राला स्वतःच्या आयुष्याचा बळी द्यावा लागला. परंतु तुझ्या पूर्ण निष्ठेने, भक्तीभावाने आणि आमच्यावरील ठाम विश्वसाने तुझे प्रारब्ध बदलण्यास आम्हांला भाग पडले आहे. तुझा पुत्रही त्याच्या प्रारब्धानुसार पूर्णायुषी होणार आहे. असे म्हणून त्या तेजस्वी तपस्व्याने त्या मुलाच्या प्रेताला (सर्वांगाला) भस्म लावून त्या प्रेताचे तोंड उघडून त्यात फूंकर मारुन वायु (प्राण) भरला आणि तो तपस्वी गुप्त झाला.

ती ब्राह्मणी खडबडून जागी झाली. तिला प्रथम भास झाल्याचे वाटले. ही सर्व आपल्या मनाची कल्पना आहे, असा विचार करीत असताना ते प्रेत हालचाल करीत असल्याचे दिसले. ते पाहून ती भयाने भेदरुन तिला दरदरुन घाम फुटला. तिने लागलीच पतीला उठवून घाईघाईने पडलेले स्वप्न कथन केले. येव्हाना तो मुलगा उठून बसला होता. ब्राह्मण दांपत्य ते दृश्य पाहून घाबरुन गेले. कोणी भूत-पिशाच्च नाही ना, अशी शंका त्यांना येऊ लागली. तोपर्यंत ते बाळ मातेला येऊन बिलगले व आई मला भूक लागली आहे असे सांगू लागले. आता मात्र माता-पित्याची खात्री पटली की पडलेले स्वप्न सत्यच होते. श्रीगुरुंनी आपल्या पुत्राला जिवंत केले आहे. दोघांच्याही आनंदाला पारावर उरला नाही. श्रीगुरुंना दोष दिल्याबद्दल, त्यांच्यावर अविश्वास दाखविल्याबद्दल त्यांना मनोमन खंत वाटू लागली. क्षणात श्रीगुरुंच्या पादुकांवर लोळण घेऊन अपराधाची मनःपूर्वक क्षमा मागितली. श्रीकृष्णावेणी-चे गंगा पवित्र जल आणून पादुका स्वच्छ केल्या. पुत्रास ब्राह्मण दांपत्याने संगमावर स्नान करुन औदुंबराचे, श्रीगुरुंच्या पादुकांचे अतिव आनंदाने, कृतज्ञतापूर्वक उत्कट, भक्तिभावाने पूजन करुन वारंवार त्यांची क्षमा मागत, स्तुती गात औदुंबरास प्रदक्षिणा घालू लागले. इतक्यात सूर्योदय होण्यास थोडा अवधी असतानाच सारे नातेवाईक व

शेजारी आज कोणत्याही परिस्थितीत प्रेतास अग्नी द्यायचा या निश्चयाने तेथे आले. समोरील दृश्य पाहून हा भास तर नाही ना? आपण स्वप्न तर पाहत नाही ना? जे पाहतो आहे ते सत्यच आहे ना? असे एकमेकांस विचारु लागले. काही क्षणातच सर्वांना सत्यता पटली आणि अत्यानंदही झाला.

श्रीगुरुंच्या अलौकिक शक्तीची सर्वांना महती पटली. सर्वांनी श्रीगुरुंचा जयजयकार करुन आसमंत दणाणून सोडला. काही वेळातच वायुवेगाने ही बातमी सर्वत्र पसरली. शेकडोंच्या संख्येने जनसमूह तेथे गोळा झाला. मोठा आनंदोत्सव साजरा करुन औदुंबर वृक्षाची व श्रीगुरुंपादुकांची महापूजा करुन समाराधना केली गेली. सर्वांनी मन:पूर्वक मान्य केले. श्रीगुरु कोठेही गेलेले नाहीत तर नृसिंहवाडीतच आहेत आपली भक्ती पराकोटीची असेल तर श्रीगुरु आपले प्रारब्धही सहज बदलू शकतात. अशातऱ्हेने पुन्हा श्रीगुरुंची क्षमा मागत, त्यांची स्तुती गात आपला आनंद व्यक्त करीत ब्राह्मण दांपत्य आपल्या पुत्रासह घरी परतले.

## <u>श्रीकृष्णावेणीची जन्म कहाणी</u>

काळाच्या ओघात पृथ्वीवर कलीयुग सुरु झाले. सर्वत्र कळीच्या प्रभावाने सर्वत्र पापसंचार सुरु झाला. अशा या घनघोर कलियुगात माणसांच्या पापांचे निर्मलून कसे होणार? असा प्रश्न ब्रह्मदेवांनी श्रीविष्णूंना विचारला. तेही क्षणभर अस्वस्थ झाले. त्यांनी ब्रह्मदेवांना श्रीकृष्णावेणीचे महात्म्य कथन केले. कृष्णा ही सर्व तीर्थांची माता असून विकाररहित, निष्कलंक व सर्व नद्यांमध्ये श्रेष्ठ आहे. सर्वांचे कल्याण करणारी मंगलमय नदी आहे. हे ऐकून ब्रह्मदेवांना फार आनंद झाला. त्यांनी श्रीकृष्णावेणीला भूलोकी आणावे अशी श्रीविष्णूंना कळकळीची विनंती केली. श्रीविष्णू प्रसन्न होऊन त्यांनी ब्रह्मदेवांची विनंती मान्य केली व लोककल्याणार्थ श्रीकृष्णावेणीची पृथ्वीवर प्रतिष्ठापना करण्याचे ठरविले. त्याकरीता योग्य जागा शोधण्यासाठी श्रीविष्णूसह ब्रह्मदेव, इंद्र आणि इतर देवदेवता पृथ्वीकडे निघाले. मार्गामध्ये त्यांना एका पर्वतावर एक ऋषी तपश्चर्या करताना दिसले. सारे देवदेवता त्या ऋषींजवळ आले असता ब्रह्मदेवांनी विचारले, ''हे मुनीवर आपण कोण आहात? साक्षात श्रीकृष्णावेणी माता भूतलावर प्रगट होणार आहे.

आपले कोणतेही मनोरथ ती तात्काळ पूर्ण करेल!'' ब्रह्मदेवांचा संवाद ऐकून ऋषिवर्य म्हणाले, ''माझे नाव सह्याद्री! श्रीविष्णूरुपी कृष्णामाता माझ्या परिसरात प्रकट व्हावी म्हणून मी तपाचरण आरंभले आहे.'' तोच श्रीकृष्णा साक्षात तेथे अवतरली. सह्याद्रीने तिला साष्टांग दंडवत घातले. श्रीकृष्णेने प्रसन्न होऊन सह्याद्रीस म्हटले, ''मी तुझी कन्या म्हणून तुझ्या उदरी प्रकट होईन.'' सर्व देवदेवता श्रीकृष्णेच्या दर्शनासाठी तेथे उपस्थित झाल्या. सर्वांनी तिचा जयजयकार केला. सारे श्रीकृष्णेच्या प्रत्यक्ष दर्शनाने आनंदी झाले. तो भावविभोर प्रसंग पाहून श्रीविष्णू प्रसन्न होऊन त्यांनी सर्वांना सांगितले, ''मी सह्याद्रीच्या परिसरात अश्वत्थ वृक्षाच्या रुपाने नित्य वास करेन आणि माझीच काया (तनू) असलेली कृष्णा अश्वत्थाच्या मुळातून निघेल.'' त्या अश्वत्थाच्या मुळातूनच प्रकट होऊन पुण्यापावन प्रवास बनून पूर्वेकडे वाहू लागली. स्वच्छ, सुंदर, चैतन्य प्रदान करीत सकलजनांच्या कल्याणार्थ सर्व तीर्थांना आपल्या उदरी सामावून मार्गस्थ झाली.

श्रीकृष्णामातेचे अलौकिक वर्णन करताना थोरले महाराज म्हणातात, हे माते सह्यगिरीच्या पायथ्यावर तुझे मुख आहे. परमपवित्र श्रीदत्तक्षेत्र श्रीनृसिंहवाडी तुझे हृदय आहे, आंध्रप्रदेशातील कुरवपूर हे नाभीस्थान आणि पूर्वसागराला (आताच्या बंगालचा उपसागर) मिळणारे तुझे दोन प्रवाह म्हणजे तुझे ''चरणयुगल'' आहेत. मानवाच्या पापांचे त्वरीत गतेने क्षालन करण्याचे सामर्थ्य तुझ्यात आहे. म्हणूनच श्रीकृष्णामातेला विनम्र प्रार्थना करताना म्हणतात, माते, तुझ्या प्रवाहाला स्पर्श केलेला पवन मला स्पर्श करुन तुझे पवित्र तीर्थ माझ्या मुखी पडू दे. तुझ्या थंडगार प्रवाहातच माझा देह पडू दे. तुझ्या जलमय स्वरुपावर माझी दृष्टी सदा असू दे! मोहाला नष्ट करणारी तुझी मूर्ती माझ्या डोळ्यात व मनात नित्य आदराचे स्थान पक्के राहू दे.

आपल्या लहरीकाव्याची समाप्ती करताना थोरले महाराज सांगून जातात, श्रीदत्तप्रभूंनी प्रेरणा दिल्यामुळे हे श्रीकृष्णास्तोत्र रचले गेले आणि त्यामुळेच श्रीगुरु आपल्यावर प्रसन्न होतील. अशी कृपा याचना त्यांनी केली आहे.

श्रीकृष्णेच्या प्रवाहात अनेक लहान मोठ्या नद्यांचे मीलन होते. तिचा प्रवास हा जवळजवळ १२८० कि.मी. इतका होतो. महाराष्ट्रात ३०० कि.मी., कर्नाटकात २८० कि.मी. तर आंध्रप्रदेशात ७२० कि.मी. इतका प्रवास करुन श्रीकृष्णामैय्या बंगालच्या उपसागरास जाऊन मिळते. तेव्हा तिच्या पात्राची

रुंदी ७ कि.मी. एवढी विस्तृत झालेली आहे. या साऱ्या प्रवासामध्ये वेण्णा, वेरळा, वारणा, पंचगंगा, कोयना, दूधगंगा, भीमा, मलप्रभा, तुंगभद्रा, घटप्रभा इ. अनंत नद्या श्रीकृष्णेत समाविष्ट होतात. या सर्व देवतास्वरुप असल्याने त्यांचे श्रीकृष्णेशी मीलन होताच देवी सावित्रीच्या शापातून त्यांची मुक्तता होते.

याविषयी एक गोष्ट सागितली जाते; प्राचीन काळी म्हणजे पद्म कल्पामध्ये महाबल व अतिबल या दोन राक्षस बंधूंनी आपल्या पराक्रमाने तिन्ही लोक जिंकून अखिल जगताला त्यांचा भयंकर त्रास होऊ लागला. सर्व देवदेवतांनी भयभीत होऊन श्रीविष्णूंचा धावा सुरु केला. त्यावेळी श्रीविष्णूंनी महाबलाच्या धाकट्या भावाचा अतिबलाचा नाश केला. ते पाहून महाबली, महापराक्रमी महाबलाने एकाच वेळी ब्रह्मा, विष्णू-महेशांवर चढाई केली. त्याचा महापराक्रम पाहून युक्तीने त्याचा नाश करावा म्हणून तिघांनीही ''महामायेला'' आवाहन करुन तिने आपल्या मोहात पाडून त्याचे गर्वन करावे अशी विनंती केली. महामायेने आपली माया दाखवली. तिने महाबलाच्या अंतर्मनात प्रवेश करताच त्याने हातातील शस्त्रे टाकून ब्रह्मा-विष्णू-महेशांना म्हणाला, ''मीच सकळ जगाचा स्वामी असून सर्व देवदेवतांचा पराभव केल्यामुळे माझेच सामर्थ्य, पराक्रम सर्वात श्रेष्ठ आहे. तेव्हा कोणताही इच्छित वर मागून घ्या.'' तिघांनीही, ''तू आमच्या हातून मारला जावास'' असा वर मागितला. त्यानेही आनंदाने तो वर देऊन मृत्यूला तयार झाला.

महाबलाचे अचाट व अपूर्व साहस पाहून ब्रह्मा-विष्णू-महेश अतिव प्रसन्न झाले आणि त्यांनी महाबलास वर मागण्यास सांगतिले. त्याने श्रीशिवशंकरांना महाबळेश्वर नावाने लिंगरुपाने, श्रीविष्णूंनी आपल्या धाकट्या भावाच्या नावाने अतिबळेश्वर लिंगाने आणि ब्रह्मदेवाने त्यांच्या कोटी सैन्याची आठवण म्हणून कोटीश्वर लिंगरुपाने राहण्याचा वर मागितला. तसेच या ठिकाणी पंचगंगांची सदा उत्पत्ती होत राहो, असाही वर मागितला. त्रिमूर्तींनी प्रसन्नतेने महाबळास इच्छित वरदान दिले.

कालांतराने श्रीब्रह्मदेवांनी त्या स्थानावर अर्थात महाबळेश्वर, अतिबळेश्वर व कोटीश्वर या लिंगाची पूजा करुन तेथे मोठा यज्ञ करण्याचे ठरविले. मोठा यज्ञमंडप निर्माण करुन यज्ञाची पूर्ण तयारी केली. ऋषी-मुनी, यक्ष-किन्नर, सिध्द, साधू सर्व देवदेवतांना निमंत्रीत करुन यज्ञासाठी उत्तम मुहूर्त काढला. ब्रह्मदेव त्याचे मुख्य यजमान होते तर हरिहर मुख्य अतिथी! यज्ञाचे पुरोहित सावित्री देवींकडे सोपवले. यज्ञाची भव्यस्वरुपता पाहून ती हरखून गेली. यज्ञाच्या भव्य स्वरुपास साजेसा साज शृंगार करण्यात ती

गढून गेली. पुरोहितांनी आमंत्रण दिल्यावरही तिचा साज शृंगार चालूच राहिला. मुहूर्त घटिका समीप आली याचेही तिला भान राहिले नाही.

इकडे मुहूर्त घटिका जसजशी येऊ लागली तसे सारे अस्वस्थ होऊ लागले. मुहूर्त चुकवून चालणार नव्हता आणि सावित्री देवी आली नव्हती. अखेर ब्रह्मदेवांनी श्रीहरिहरांना योग्य उपाय सुचविण्याची विनंती केली. भगवंत म्हणाले, ''जेष्ठा व कनिष्ठा दोन्ही पत्न्या सुखशांतीसाठी आणि धर्मरक्षणाकरिता असतात. जेष्ठ पत्नीला जर काही कारणामुळे येता येत नसेल तर धर्मशास्त्राप्रमाणे कनिष्ठ पत्नीलाही अधिकार आहे.'' श्रीविष्णूंचा हा निर्णय सर्वांना मान्य झाला. म्हणून पुरोहितांनी ब्रह्मदेवांना गायत्रीस यज्ञाला बसविण्यास सांगून स्वास्तिवाचन उरकून यज्ञास प्रारंभ केला. सर्वत्र मंगल वाद्ये वाजून जयजयकार सुरु झाला.

इकडे सावित्री देवीचा शृंगार पूर्ण होऊन ती आमंत्रणाची प्रतिक्षा करु लागली. तोच तिला यज्ञ प्रारंभ झाल्याचा जयजयकार ऐकू आला. बाहेर येऊन पाहते तो हजारो सुवासिनी यज्ञाची ओवाळणी करुन बाहेर पडताना दिसल्या. आपल्या शिवाय यज्ञाला सुरुवात झाल्याचे पाहून सावित्री देवी संतापाने लालबूंद झाल्या. आपला अधिकार गायत्रीने हिरावून घेतला आणि त्याला सर्व देवदेवतांनी मान्यता दिली ह्याने तिला अपार दु:ख झाले. यज्ञमंडपात प्रवेश करताच तिला ब्रह्मा आणि गायत्री अग्निस्थापना करुन बाहेर येताना दिसली. तेव्हा अधिक संतापून सावित्री देवींनी शापवाणी उच्चारली, ''धर्मपत्नी असणाऱ्या मला सर्व देवदेवतांनी बाजूला सारुन हा यज्ञ केला. यांची बुध्दी भ्रष्ट झाली आहे. तेव्हा या सर्व देवदेवतांना जडरुप (पाषाणरुप) प्राप्त होवो.'' तिच्या शापवाणीने सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण झाले.

अशावेळी श्रीविष्णू सामोरे येऊन त्यांनी विनम्रपणे सावित्री देवींना शांत होण्याची विनंती करुन म्हणाले, ''देवी तूच यज्ञरुप असून यज्ञाचेही मूळ आहेस. तुझा अपमान करण्याचा आमचा कोणताही हेतू नव्हता. यज्ञ मुहूर्त चुकला असता तर सर्व सृष्टीवर भयानक संकट ओढावले असते. शिवाय तुला आमंत्रण देऊनही तू सांजशृंगारात दंग राहिलीस. केवळ मुहूर्त टळू नये व सकलजणांचे कल्याण व्हावे या हेतूने आम्ही गायत्रीला तुझा मान देऊन यज्ञास सुरुवात केली. याचा तूच विचार करुन कृपाळू होऊन सर्वांना उ:शाप दे.''

श्रीविष्णूंचे हे प्रेमळ बोलणे ऐकून सावित्री देवी शांत झाल्या आणि तिने सर्वांना उ:शाप दिला, ज्या अर्थी

ब्रह्मा-विष्णू-महेशांनी माझ्याकडे दुर्लक्ष करुन धर्माचे सहाय्य घेतले म्हणून ते जलरुप होतील. माझ्या जागी त्यांनी गायत्रीला स्थान दिले म्हणून त्यांना स्त्रीनामे प्राप्त होतील. गायत्री जरी जलरुप झाली तरीही तिचे दर्शन कुणालाही होणार नाही. त्याशिवाय यज्ञमंडपातील सर्व देव नदीरुप होतील. त्यावेळी भगवंत म्हणाले, ''यज्ञाचा मुहूर्त टळणे कदापिही योग्य नाही. हे तूला माहित असतानाही बेजाबदारपणे वागून साजशृंगार करीत राहिलीस. मुहूर्त टळायच्या बेतात होता तरीही तू यज्ञमंडपात पोहोचली नाहीस. त्यावेळी अगतिकपणे आम्ही गायत्रीस यज्ञाला बसविले. अविचाराने तू शापवाणी उच्चारलीस म्हणून तू सुध्दा जलरुप नदी होऊन पश्चिम सागराला मिळशील. तुझ्याविना जरी यज्ञ प्रारंभ झाला असला तरी यापुढील यज्ञ व यज्ञाची समाप्ती तुझ्याच हस्ते होईल.'' सावित्रीदेवी व श्रीविष्णू या दोघांनी अशाप्रकारे शापवाणी उच्चारल्यामुळे सर्वांवर धर्मसंकट ओढावले. साऱ्या देवदेवतांनी सावित्री देवींची प्रार्थना करुन उःशाप द्यावा ही विनंती केली. आता शांत झालेल्या सावित्रीदेवींनी, नदीरुप झालेल्या प्रत्येक देवाचा नदीरुपातील श्रीविष्णू भगवानाबरोबर संगम होताच त्यांना त्यांचे मूळदेवरुप प्राप्त होईल, असा उःशाप दिला.

या सर्व प्रसंगानंतर ब्रह्मदेवांनी सर्व देवदेवतांच्या समवेत सावित्री देवींना बरोबर घेऊन यज्ञ यथासांग पार पाडून यज्ञनारायणाला संतुष्ट केले. सावित्रीदेवी जवळील एका वटवृक्षामध्ये विलिन झाली आणि त्या वटवृक्षाच्या मुळातून एक जलप्रवाह बाहेर पडून पश्चिम दिशेस वाहू लागला. श्रीशंकर वेण्णा, ब्रह्मदेव कोयना व श्रीविष्णू श्रीकृष्णा नदी बनून वाहू लागले. सर्व देवदेवतांना जलरुप प्राप्त होऊन ते नदी बनून मार्गस्थ झाले. अशा तऱ्हेने सह्याद्री पर्वतावर महाबळेश्वर, अतिबळेश्वर व कोटीश्वर या तीन लिंगाची निर्मिती होऊन कृष्णा-वेण्णा, कोयना, सावित्री व गायत्री या पाच नद्यांचा (पंचगंगा) उगम झाला तो परिसर ''ब्रह्मतीर्थ'' नावाने प्रसिध्द पावला.

सावित्री नदी पश्चिमेकडे वाहात जाऊन सिंधू सागरास म्हणजे आजच्या अरबी समुद्रास जाऊन मिळते. तर श्रीकृष्णा पूर्वदिशेकडे जाऊन गंगासागराला म्हणजे आजच्या बंगालच्या उपसागरास मिळते. तिच्या प्रवाह मार्गावरच सर्व नद्या येऊन तिच्यात विलिन होतात व त्यांची सावित्रीदेवींच्या शापातून मुक्तता होते.

भगवान श्रीकृष्ण जसे निर्मळ आहेत त्याचप्रमाणे श्रीकृष्णाही निर्मळ आहे. जसे श्रीकृष्णांनी कोणालाही जवळचा, आपला, परका असा कोणताही भेदभाव न करता सर्वांचीच गीतेच्या माध्यामातून

ज्ञानजिज्ञासा शमवली, तशीच श्रीकृष्णाही कोणताच भेदभाव न करता सर्वांची तृष्णा शमवून मार्गक्रमण करीत राहते. म्हणूनच श्रीकृष्णा ही सर्व नद्यांमध्ये श्रेष्ठ ठरली आहे. तिची महती सांगणाऱ्या अनेक कथा आहेत. त्याचप्रमाणे भारतातील प्रत्येक नदीमागे कोणतीतरी कथा, तिची महती आहेच. त्या कथांमध्ये प्रत्येकावर काहीतरी कलंक लागलेला आढळून येतो.

श्रीगंगा ही भारतातील सर्वश्रेष्ठ नदी! भागिरथाने आपल्या तपश्चर्येने तिला पृथ्वीवर येण्यास भाग पाडले. परंतु भगवान शंकरांच्या जटेचा आधार घेऊन तिला अवतरण करावे लागले. महाभारतातील कथेनुसार श्रीगंगेचा शंतनू राजा बरोबर विवाह होऊन तिला अष्टवसू प्राप्त झाले. भीष्म हे गंगापुत्र होते.

स्कंद पुराण म्हणते, एकदा तिचे आणि सरस्वतीदेवींचे भांडण झाले. परिणाम त्या दोघींनाही पृथ्वीवर यावे लागले.

एकदा गोकुळामध्ये श्रीकृष्ण राधेसह वार्तालाप करीत बसले होते. काही काळाकरीता राधा दुसऱ्या कार्यास निघून गेली असता गंगा सर्व प्रकारचा साजशृंगार करुन श्रीकृष्णांजवळ येऊन बसली. तितक्यात राधा तेथे आली. दोघींची नजरानजर झाली. राधेची क्रोधीत मुद्रा पाहून गंगा भयभीत झाली आणि स्वतःच्या जलरुपात गुप्त झाली. राधेने ते जाणून आपल्या योगसामर्थ्याने गंगेला एका घोटात प्राशन केले.

गंगा कोरडी झाल्यामुळे सर्व जलचर पाण्याशिवाय कासावीस झाले. वनस्पती, प्राणी, मानव आदी कोणालाही पाणी मिळेनासे झाले. सारे श्रीकृष्ण भगवंतांना शरण गेले. त्यांनी राधेची प्रार्थना करण्याचे सुचविले. तेव्हा राधेला शरण जाऊन तिची विनंती केली, ''तू गंगेची आई आहेस. कारण तुझ्या उदरी तिला समावून घेतले आहेस. कन्या समजून तिचा स्वीकार करुन आम्हांवर कृपा कर.'' सर्व प्राणीमात्रांच्या विनंतीने राधेचा राग शांत झाल्यावर गंगा श्रीकृष्णाच्या (हरिच्या) पायाच्या अंगठ्यातून पुन्हा प्रकट झाली. म्हणून गंगेला ''विष्णूपदी'' असे म्हटले गेले आहे. यमुनानदी हिमालयात कलिंद पर्वतावर उगम पावते. श्रीहरींच्या प्रेमापोटी त्यांची पत्नी बनून त्यांच्या सेवेत राहते. तिच्या जटेत कालिया नावाचा अत्यंत विषारी नाग वास करीत होता. गोदावरीची उत्पत्ती भगवान शिवाच्या जटेपासून झाली आणि नर्मदा त्यांच्याच घर्मबिंदूतून उगम पावली. रेवा नदीने भीमसेनाबरोबर लग्न करुन संसार थाटला होता. भोगावतीला पाताळात वसलेल्या नागलोकात जावे लागले.

अशातऱ्हेने सर्व नद्यांना काही तरी कथा जोडली गेली आहे. त्यातूनच त्यांच्यावर काही कलंक असलेले आढळून येतात. परंतु या सर्व जीवनदायिंनीमध्ये फक्त श्रीकृष्णा निष्कलंक असून तिला कोणताही विकार चिकटलेला नाही. इतर नद्यांमध्ये कोठेतरी न्यूनत्व दिसून येते किंवा त्या राग, मोह, लोभ, काम आदी विकारांत गुरफटून गेलेल्या दिसतात. मात्र श्रीकृष्णेविषयी असे काही घडलेले दिसून येत नाही. कारण ती स्वत: श्रीहरींचे जलस्वरुप आहे. आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे इतर नद्यांप्रमाणे श्रीकृष्णेने आपले मूळ स्वरुप व नाव बदलले नाही. भगवान श्रीकृष्णाप्रमाणेच निळी सावळी असून नावही कृष्णाच आहे. म्हणून श्रीकृष्णेला श्रेष्ठत्व प्राप्त झाले आहे.

**थोरले महाराजांची काव्यसंपदा ''कृष्णालहरी''“**

संस्कृत साहित्यात हरि काव्याचा अगणित खजिना आहे. त्याचप्रमाणे अनेक प्रतिभावंत ईश्वरभक्तांनी लहरी काव्याची रचना केली आहे. आद्य शंकराचार्यांनी सौंदर्यलहरी, आनंदलहरी, शिवलहरी इ. रचना केली. पंडितराज जगन्नाथांनी लक्ष्मीलहरी, सुधालहरी, करुणालहरी, अमृतलहरी आणि गंगालहरी लिहिल्या. तर टेंबेस्वामींनी अर्थात थोरले महाराजांनी नर्मदालहरी, कृष्णालहरी यांची रचना केल्या. पंडितराज जगन्नाथ हे शृंगारी व्यक्तिमत्व! तर थोरले महाराज सर्वसंगपरित्याग करुन संन्यास पत्करुन दत्तभक्तीचा प्रचार करणारे सर्वश्रेष्ठ दत्तभक्त!

आद्य शंकराचार्यांनंतर प्रतिभा संपन्न व्यक्तिमत्व म्हणजे थोरले महाराज. त्याकाळी ''जगन्नाथा संस्कृतम्'' म्हणजे संस्कृत भाषा जगन्नाथापर्यंत म्हणण्याचा संस्कृत शास्त्री, पंडितांचा परिवार होता. परंतु श्रीटेंबेस्वामींच्या संस्कृत साहित्य, कृतीने शास्त्री, पंडितांना वरील विधान मागे घ्यावे लागले.

पंडितराज जगन्नाथांनी ''गंगालहरीची '' रचना गंगामैय्याच्या किनारी बसून केली. गंगाप्रवाहात अर्थात तिच्या स्तुतिसुमनात अक्षरश: आत्मसमर्पण केले अशी इतिहासाची साक्ष आहे. तर थोरले महाराजांनी भावविभोर होऊन ''नम: श्रीकृष्णते'' म्हणून गाणगापूर क्षेत्री भीमा-अमरजा संगमावर ''कृष्णालहरीची'' रचना केली आणि तंजावर म्हणजे तामीळनाडूमध्ये वास्तव्यास असताना संस्कृत

भाषेत ''कृष्णालहरी'' वर टीका लिहिली. कारण मूळ ग्रंथाचा गभितार्थ उलगडून दाखविण्यासाठी त्या ग्रंथावर टीका लिहावी लागते.

थोरले महाराज श्रीकृष्णावेणीची भक्तीभावे मुक्तकंठाने स्तुती करुन तिच्याशी तादात्म्य पावून श्रीदत्तचरणी लीन झाले. ही ऐतिहासिक सत्यता आहे.

गंगा, नर्मदा, कृष्णा, भीमा, अमरजा, पंचगंगा, यमुना, गोदावरी, वेण्णा, कावेरी, ककुदमती (कोयना), तुंगा, चंद्रभागा, क्षिप्रा, वेदवती, पिनाकिनी इ. असंख्य नद्यांना भारतातील लोकमाता म्हटलेले आहे. सर्व सार्थकतेने त्या ''जीवनदायिनी'' आहेत. या सर्व नद्यांच्या काठावर अनेक नगरी वसलेल्या आहेत. अनेक संत, सत्पुरुष त्या त्या नगरीत जन्मास आले. अनेक राजेरजवाड्यांचे उत्कर्ष व पतन या नद्यांनी पाहिलेले आहेत. म्हणूनच त्या सनातन वैदिक धर्माच्या भाष्याकार असून परमेश्वराचेच अंग आहेत. याच भावनेने, भक्तीने, श्रध्देने भारतीय धार्मिक कवींनी त्यांची मुक्त कंठाने स्तुती करुन स्तोत्र, काव्य सुमने त्यांना अर्पण केली. कारण त्या देवतास्वरुप असल्याने भारतीय संस्कृती, परंपरा आणि लोकजीवनामध्ये नद्याविषयी अत्यंत पवित्र व पुजनीय भाव हजारो वर्षांपासून जोपासला गेला आहे. त्यांच्या तीरावरच मानवी संस्कृती निर्माण झाली आणि बहरली देखील! तरीही श्रीकृष्णाची माहिती कथेद्वारे माहित पडते. कारण कृष्णा ही प्रत्यक्ष विष्णूचेच जलस्वरुप आहे. तर वेण्णा वा वेणी श्रीशंकराचे जलस्वरुप आहे. हरी-हर म्हणजे श्रीविष्णू-श्रीशिव हे एकच आहेत म्हणून कृष्णावेणी एकच आहेत.

पंडितराज जगन्नाथ यांची गंगालहरी पांडित्यपूर्ण, उपमा, उत्प्रेक्षा अनुप्राप्त इ. अलंकारांनी आणि एका उच्चस्थानावर आरुढ झालेल्या राजकवीच्या आविष्कारांनी नटलेली आहे. तर थोरले महाराजांची कृष्णालहरी म्हणजे अनन्य शरणागती, प्रतिभासंपन्न, प्रांजळ, सरळ, भोळ्याभाबड्या भक्तिभावाने सर्वांवर अधिराज्य करणारी ठरली आहे.

श्रीकृष्णावेणी मातेचं वर्णन करताना थोरले महाराज म्हणतात, चार हात असणारी, महावीर मण्याप्रमाणे निलवर्ण असणारी, विद्युलतेप्रमाणे चमकणारे, झळाळणारे वस्त्र परिधान करणारी, कांतीचा वर्षाव करणारा मुखचंद्र असलेली, भालपटावर कांतीमान कुंकूमातील चढवलेली, सेवकांचे दुःख व दुर्व्यसन दूर करणारी, स्वकीयांचे हित साध्य करुन देणारी कामादी दोषांना नष्ट करणारी सह्यगिरीची कन्या श्रीकृष्णा सर्वत्र विजयिनी आहे.

## कन्यागत महापर्वकाळ - पौराणिक महिमा

एक पौराणिक कथा सांगितली जाते, काशी क्षेत्रात दिवोदास राजाचे राज्य होते. पुरातन काळापासून काशीला सर्वांत पुण्यनगरी मानले गेले आहे. अशा या पुण्यनगरीतील राजा फार धर्मशील आणि सदाचार संपन्न होता. त्याच्या सात्विक व न्यायवृत्तीमुळे साधू, संत, ऋषी,मुनी, विद्वान, तपस्वी, योगी, आनंदाने आपापले कार्य करीत होते. सारी प्रजा गुण्यागोविंदाने नांदत होती. अचानक एक परचक्र येऊन काशीवर धडकले. हैहय कुलीन राजांनी काशीवर आक्रमण करुन राजा दिवोदासचा पराभव केला. हैहयांनी काशी बळकावून सर्वांचा छळ सुरु केला. दिवोदास राजा पळून गेला. नगरीतील धार्मिक, आध्यात्मिक गोष्टींची वाताहत झाली. यज्ञ-याग, होम-हवन, अनुष्ठाने, पूजा-अर्चा, कथा-किर्तने सारे काही बंद पडले. ज्ञानाची द्वारे उजाड झाली. काशी विश्वेश्वर मंदार पर्वतावर जाऊन राहिले. सर्व पुण्यवान, विद्वान, सत्पुरूष काशी नगरीचा त्याग करुन दक्षिण दिशेने निघाले. त्यांच्यासोबत महर्षी व्यास, श्रीदत्तात्रेय, ऋषी, मुनी, योगीही होते. सारे यात्रा करीत सह्याद्री पर्वतावरील धोम महाबळेश्वर येथे सप्तनद्यांच्या उगमस्थानी येऊन पोहोचले. तेथील नयनरम्य व मनोहारी दृश्य आणि श्रीकृष्णावेणीचा प्रवाह पाहून सर्वांचा श्रम परिहार झाला. मन प्रसन्न झाले. पवित्रपावन श्रीकृष्णावेणीचा पृथ्वीतलावरील जलौघ पाहून सर्वांना काशीनगरीतील श्रीगंगेची तीव्र आठवण झाली. तिच्या अनंत सहवासाचे स्मरण होऊन साऱ्याचे नेत्र भरुन आले. त्याचक्षणी श्रीगंगा माता येथे अवतरीत झाली तर किती बरे होईल अशी इच्छा त्यांच्या मनी उत्पन्न झाली. लागलीच सर्वांनी भगवान नारायणाची अपार प्रार्थना केली. भगवंत तेथे प्रकट झाले. सर्वांनी भक्तिभावाने त्यांना शरण जाऊन आपली इच्छा कथन केली.

आपल्या चरणकमलांतून उत्पन्न झालेली गंगा या पृथ्वीवर आणून श्रीकृष्णावेणीशी संयोग करावा. सह्याद्री पर्वत व ही दक्षिणभूमी पावन होऊन सर्वांचा उध्दार व्हावा. सर्वांची जगाच्या कल्याणासाठी केलेली मंगलमय प्रार्थना ऐकून नारायण अतिव प्रसन्न झाले आणि तात्काळ गंगेचे स्मरण करताच गंगा त्यांच्या पायाच्या अंगठ्यातून प्रगट झाली. भगवंतांनी तिला सर्वांची इच्छा सांगताच श्रीगंगा, श्रीकृष्णावेणीत विलीन झाली. प्रत्यक्ष नारायण, श्रीदत्तात्रेय आणि महर्षी व्यास यांच्यासमोर श्रीगंगा व श्रीकृष्णावेणींचे मिलन झाले. सह्याद्री, सारे ऋषी-मुनी, योगी-तपस्वी, विद्वान आनंदाने बेभान झाले.

सर्वांनी हा अद्भूत व अपूर्व प्रसंग आपल्या ह्रदयात साठवून ठेवला. त्याचवेळी सर्वांनी भगवंतांना प्रार्थना करुन त्यांच्यासमोर गंगामातेकडून वचन घेतले, दर बारा वर्षांनी गंगा याच ठिकाणी श्रीकृष्णावेणीस भेटण्यास येईल. गंगामातेनेही आनंदाने सर्वांची प्रार्थना मान्य केली. आपल्या ह्या मिलनाचा म्हणजेच श्रीकृष्णावेणीशी नित्य भेटण्याचा आणि एक वर्ष मोठ्या बहिणीसोबत राहून सर्व प्राणीमात्रांना पावन करण्याचा गंगेने नियम केला. याच वेळी नारायणांनी संपूर्ण भरतखंडातील सर्व तीर्थांना आपल्या सोबत घेऊन येण्याची गंगेला आज्ञा केली. तिही तिने मान्य केली. अशा या अत्यंत पवित्र आणि आनंदमय मिलनाला ''कन्यागत महापर्वकाळ'' म्हटले जाते.

कन्यागत महापर्वकाळ हा अत्यंत पुण्यप्रद मानला जातो. महाभारतामध्ये असा उल्लेख आहे, पांडव वनवासात असताना ११ वर्षे तीर्थाटन झाल्यावर १२ व्या वर्षी ते कृष्णातीरी माहुली व वाई या परिसरात जेथे श्रीकृष्णावेणी यांचा संगम होतो तेथे येऊन पोहोचले. त्यावेळी कन्यागत महापर्वकाळ सुरु होता. पांडव तेथे वर्षभर राहिले. संपूर्ण वर्षभरात त्यांनी तेथे अनेक धार्मिक विधी, यज्ञ-याग संपन्न केले. त्यामुळे त्यांचे कल्याण झाले.

संपूर्ण भारतात एकूण साडेतीन कोटी तीर्थे आहेत. ती सारी मानवाचे पापाक्षालन करण्याचे कार्य करतात. त्या तीर्थांना, त्यांच्यात साचलेल्या पापांपासून मुक्तता मिळावी हा ही एक मार्ग भगवंताच्या आज्ञेने खुला झाला. म्हणून श्रीगंगामाता १२ वर्षांतून एकदा सर्व तीर्थांना सोबत घेऊन एक वर्षभर श्रीकृष्णावेणीत येऊन निवास करते. गुरुचा कन्याराशीत प्रवेश झाला की महापर्वकाळ सुरु होतो. आपल्या संस्कृतीमध्ये गुरुच्या राश्यांतराला विशेष महत्व आहे. आपल्या पौराणिक ऋषी-मुनींनी गुरुचे राश्यांतर व पर्वकाळ याची योग्य सांगड घालून ठेवली आहे. गुरु हा सूर्यमालिकेतील पाचवा आणि सर्वांत मोठा ग्रह आहे. ज्ञानाचे, विद्वतेचे, हुशारीचे मूर्तीमंत रुप! ज्या मानवाचा गुरु ग्रह उत्तम स्थितीमध्ये असतो त्याच्यावर संपत्ती व विद्या म्हणजे लक्ष्मी व सरस्वती या दोघींची कृपा प्राप्त होते. लौकिक जगात गुरुंची महती अपार आहे असे ज्योतिषशास्त्र म्हणते. जीवनातील कोणतेही महत्वाचे कार्य करताना गुरुबळ कसे व किती आहे याचा प्रथम अंदाज घेतला जातो. धर्मशास्त्राने मान्यता दिल्याप्रमाणे गुरुबळ असल्याशिवाय कोणतेही नवे कार्य, वास्तूशांती, विवाह अथवा उद्घाटन करता येत नाही. विश्वातील ''सत्'' स्वरुप आणि ''चित्'' शक्ती गुरु आहे. म्हणूनच गुरु ''सच्चिदानंदरुप'' आहे. तद्वत

धर्मशास्त्राप्रमाणे गुरुबळ असेल तरच कोणत्याही कार्याची सुरुवात करता येते. जर गुरु अस्ताला गेला असेल तर शुभकार्य होत नाही. म्हणूनच गुरु हा अधिष्ठानरुपी ग्रह असून तो सुप्तपणे बल आणि सामर्थ्य बहाल करतो. विद्या, ज्ञान, देणारा मंगलकारक सजीव प्राणीमात्रांचे पोषण आणि रक्षण करणारा आहे. मानवाची उन्नती, प्रगती, उत्तम आरोग्य, मनाचा समतोलपणा, सुखी-समृध्द जीवन इत्यादी अनंत गोष्टींसाठी गुरुंचे साहाय्य मिळते. ''गुरुकृपा'' हेच मानवाच्या जीवनाचे महत्‌भाग्य आहे. गुरुकृपा ज्याच्यावर झाली, त्याला कसल्याही गोष्टींची चिंता राहात नाही.

गुरु आणि महापर्व काळ यांच्यामध्ये एक विशेष संबंध आहे. गुरु हा जलाचा अर्थात नद्यांचा स्वामी आहे. ज्या राशीमध्ये गुरु असतो तेव्हा भारतातल्या विविध परिसरात नद्यांच्या किनारी उत्सव सुरु होतात. यालाच ''महापर्वकाळ'' असे म्हणतात. जेथे ही पर्वणी चालू असते. त्या ठिकाणच्या नदीमध्ये गंगेचा प्रवेश झालेला असतो अशी दृढ श्रध्दा आहे . पूर्ण वर्षभर गंगा तेथे निवास करते. भक्तांची पापे धुवून त्यांची मनोकामना पूर्ण करते अशी महापर्वकाळाची संकल्पना रुढ झाली. या पर्वणीला ''सिंहस्थ, कुंभमेळा, पुष्कर स्नान, कन्यागत महापर्वकाळ'' अशा अनेक नावांनी ओळखले जाते.

## कशी होते कन्यागत महापर्वकाळाची सुरुवात ?

धोम महाबळेश्वर हे सह्याद्री पर्वतावर असलेले एक ठिकाण आहे. येथेच कृष्णा, वेण्णा, कोयना, सावित्री, गायत्री, गंगा आणि सरस्वती या सात नद्यांचे उगमस्थान आहे. आमलकीच्या आणि अश्वत्थ या वृक्षांच्या मूळांतून या नद्यांचा उगम होतो. म्हणजे या ठिकाणापासूनच पाण्याचे स्त्रोत सुरु होतात. हल्लीच्या काळी तेथे सात कुंडे बांधली गेली. यातील कृष्णा, वेण्णा, कोयना आणि सावित्री या चार कुंडातून नित्यनिरंतर जलप्रवाह सुरु असतो. गायत्री कुंड कोरडेच असते. साठ वर्षांतून एकदाच कपिलाषष्ठीच्या योगावर तेथे जलप्रवाह येतो. सरस्वती नदी गुप्तरुपाने वास करीत असल्याने प्रवाह दिसून येत नाही. गंगा कुंड अकरा वर्षे कोरडेच असते. गुरुचा जेव्हा कन्या राशीत प्रवेश होतो त्याक्षणी गंगा कुंडातून जलस्त्रोत सुरु होतो. गंगेचे अवतरण होते. आणि भगवंतांच्या आज्ञेप्रमाणे सर्व तीर्थांना सोबत घेऊन

श्रीकृष्णावेणीला येऊन भेटते. या मंगल व पुण्यप्रद पर्वणीच म्हणजे ''कन्यागत महापर्वकाळ !''

येथे स्वाभाविकपणे प्रश्न उभा राहतो, त्रिभूवनामध्ये सर्वश्रेष्ठ ठरलेली महानदी गंगा श्रीकृष्णेच्या भेटीस का येते? श्रीकृष्णा गंगेला भेटायला का जात नाही? पहिलं कारण सर्व देव-देवता, ऋषी-मुनी, महर्षी व्यास, श्रीदत्तात्रेय यांच्या प्रार्थनेला गंगेनेच मान्यता दिली होती. शिवाय ती भगवंतांच्या चरणांतून निर्माण झाली आहे. म्हणून तिला विष्णूपदी म्हटले गेले. तर श्रीकृष्णा-वेण्णा (वेणी) ह्या साक्षात हरिहरांचे स्वरुप व ऐक्यरुप आहेत. म्हणूनच श्रीकृष्णावेणीला जेष्ठ भगिंनीचे स्थान प्राप्त झाले. दुसरे कारण, भारतीय परंपरा व रितीरिवाजानुसार लहान बहिण-भाऊ मोठ्या बहिण-भावाला भेटावयास जातात. कारण जेष्ठांचा मान राखण्याची आदर करण्याची प्राचीन लोकपरंपरा चालत आलेली आहे. त्यामुळे अतिव प्रेमाने, अत्यानंदाने गंगा आपली जेष्ठ भगिनी श्रीकृष्णावेणीस भेटण्यास येते.

सह्याद्री पर्वतावरील धोम महाबळेश्वरला अवतरीत झालेली श्रीकृष्णावेणी महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश इ. राज्यांतील लोकजीवन समृध्द करीत प्रवास मार्गातील अनेक नद्यांना मिळत कराड येथील कोयनेशी मिलन करुन तेथून श्रीनृसिंहवाडीला, शिवा, भद्रा, भोगवती, कुंभी व सरस्वती या पंचगंगा नद्यांत येऊन सामावली. आपल्या प्रवासात श्रीकृष्णावेणीच्या अनेक काठांवर अनेक तीर्थे वसली आहेत. या सर्व तीर्थांना इतर तीर्थक्षेत्रांपेक्षा खूप महत्व आहे. यापैकी जेथ जेथे श्रीगुरुदत्तात्रेयांचा निवास झाला त्या तीर्थस्थानांना अधिकच महत्व प्राप्त झाले आहे. अशा या सप्तनदी संगमावर अत्यंत पवित्र व रम्य स्थळी औदुंबरवृक्षातळी श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराज तपश्चर्येसाठी बारा वर्षे येऊन राहिले.

श्रीकृष्णावेणी महाबळेश्वरला उगम पावते तेव्हा तिचा प्रवाह दक्षिण पूर्व असा आहे. श्रीनृसिंहवाडीपासून दोन कि.मी. अगोदर अंतरावर ती पूर्व वाहिनी होऊन वळसे घेत पंचगंगेशी येऊन मिळाल्यावर पश्चिम वाहिनी झाली आहे. पुढे पंचगंगाकडे पूर्वेला गेली आहे. जेथे श्रीकृष्णावेणी पश्चिम वाहिनी झाली आहे तेथेच ''शुक्लतीर्थ'' आहे. या ठिकाणी गंगेचे अवतरण होते. याच शुक्लतीर्थावर श्रीगुरु आपल्या भक्तांना सोबत घेऊन स्नानास जातात. अशा या मंगलदायी सप्त नद्यांच्या संगमात अष्टतीर्थे वसलेली आहेत. शुक्ल, पापविनाशी, अमर, काम्य, सिध्द, कोटी, शक्ती आणि प्रयाग! शुक्लतीर्थात स्नान केले असता अनेक जन्मांचे पाप व मनाची मलिनता दूर होते. मानव पापमुक्त होऊन त्याची आत्मोन्नती साधते.

शुक्लतीर्थापासून सुमारे एक फर्लांग अंतरावर ''पापविनाशी'' तीर्थ आहे. यात स्नान केल्यावर पापमुक्तीबरोबरच मानवी बुध्दी शुध्द होऊन पापवासनेचा पुन्हा उगम होत नाही.

औरवाडला वसलेल्या अमरेश्वर देवालयासमोर ''अमरतीर्थ'' आहे. येथील स्नानाने अमरत्व प्राप्त होते अशी श्रध्दा आहे. इतकेच नव्हे तर मानव पापमुक्त होऊन देवच बनतो असे मानले जाते.

श्रीगुरुंच्या मनोहर पादुका मंदिरासमोर ''काम्य'' व ''सिध्द'' ही दोन तीर्थे आहेत. साक्षात श्रीगुरुंचा सहवास लाभल्याने त्यांना अधिकच पावित्र्य प्राप्त झाले आहे. शिवाय श्रीगुरुंच्या गुप्त निवासाने अर्थात मनोहर पादुकांच्या समागमाने ह्या दोन तीर्थांना विशेष महत्व आहे. या तीर्थांत स्नान केल्यावर ''मानवाच्या सर्व मनोकामना'' पूर्ण होतात.

जेथे श्रीकृष्णावेणी-पंचगंगा यांचा संगम झाला तेथे कोटीतीर्थ, शक्तीर्थ व प्रयाग तीर्थ आहेत. म्हणजे मनोहर पादुकांच्या समीप आणि संगमेश्वर लिंगाच्या सान्निध्यात त्रिवेणी संगमरुपात ह्या तीन तीर्थांचे मिलन झाले आहे. येथे स्नान केल्याने माणसाला कोटीफळ व शक्तीस्त्रोत प्राप्त होऊन प्रयाग तीर्थात स्नान केल्याने जे पुण्य लाभते ते या तीन तीर्थात स्नान केल्याने मिळते असे या तीर्थांचे महत्व आहे.

श्रीकृष्णावेणी-पंचगंगा संगम स्थान हे अतिशय पवित्र मानले जाते. या स्थळी विश्वामित्र, गार्ग्य, कश्यप, वशिष्ठ व गालव या महान ऋषींनी केलेल्या महान तपस्येमुळे पंचगंगा अर्थात शिवा, भद्र, भोगवती, कुंभी व सरस्वती ह्या नद्या श्रेष्ठत्वाला पावल्या आहेत. येथे संकल्पयुक्त स्नान करुन संगमेश्वराचे पूजन केल्यास महापुण्य पदरी पडते.



## शिबिकारोहण व श्रीगुरुंचे पर्वणी स्नान

कन्यागत महापर्वकाळ महोत्सवाचे श्रीनृसिंहवाडींचे मोठे वैभव म्हणजे शिबिकारोहण! अर्थात पालखी सोहळा! पूर्व परंपरेनुसार पर्वकाळाच्या आदल्या दिवशी दुपारी २ वा. श्रीगुरुंची पंचोपचार पूजा झाली की श्रीगुरुंची उत्सव मूर्ती सुवासिक फुलांनी सजविलेल्या पालखीत विराजमान करुन मंदिरापासून पहिल्या गल्लीने वाजत गाजत शुक्लतीर्थाकडे नेली जाते. संपूर्ण मार्ग सुशोभित मांडव घालून सजविलेला असतो. श्रीगुरु ज्या मार्गाने क्रमण करतात त्याच्या दोन्ही बाजूंना असलेल्या घरांची रंगरंगोटी करुन त्यावर श्रीगुरुंच्या जयजयकाराच्या बिरुदावली लिहिल्या जातात. श्रीगुरुच्या स्वागतामध्ये कोणतीही उणीव राहू नये याची काळजी घेतली जाते. वाटेवर तेथील भक्तगण उंची वस्त्राच्या पायघड्या घालतात. पालखीसोबत असलेली सर्व ब्राह्मण मंडळी मधूर व उच्च आवाजात अष्टके, आरत्या म्हणत श्रीगुरुंसोबत हळूवारपणे त्यांच्या दुतर्फा चालत राहतात. श्रीगुरु जाणाऱ्या वाटेवर पावलोपावली नयनरम्य रांगोळ्या घातल्या जातात. एक एक रांगोळी पाहून डोळे थक्क होतात. पालखीच्या अगदी पुढे एक छोट्या गाडीवर अखंड धुपारती चालू असते. त्यामागे उत्तम तऱ्हेने सजविलेला घोडा (जीवंत) सनई चौघड्याच्या, वाद्यवृंदाच्या तालसुरात कधी पाय उंचावून, कधी शेपटी इकडे तिकडे, वरखाली करुन, कधी पाटावर उभा राहून नृत्य करीत असतो. जणू आपली ही छोटीशी सेवा तो श्रीगुरुंच्या चरणी अर्पण करतो. बँड, ढोल-ताशा यांचे तालासुरात वादन चालू असते. असा हा पालखीचा नयनमनोहर सोहळा रोमारोमांत आनंद फुलवून जातो.

श्रीगुरु मार्गस्थ असताना पावलोपावली प्रत्येक घरासमोर थांबून तेथील सुवासिनींकडून औक्षण करुन घेतात. हा दिवस सर्वांच्याच अत्यांनदाचा असतो. कारण बारा वर्षांतून एकदा श्रीगुरु महापर्वकाळाच्या निमित्ताने भक्तांना आनंद देण्यासाठी बाहेर पडलेले असतात. मग ही वेळ, तो क्षण कोण आणि कसा बरे चुकविल? श्रीगुरुंची पूजा, त्यांचे औक्षण हे फार शिस्तीने होत असते. मोठी गर्दी असूनही भक्त, सुवासिनी कसलीही घाई-गडबड, गोंधळ न करता पूजन करतात, ओवाळतात. या महापर्वकाळ सोहळ्यात अर्थात शिबिकारोहण सोहळ्यात स्त्रियांना एक विशेष मान असतो. श्रीगुरु स्नानास जाताना व परत येताना प्रत्येक घरातील सुवासिनी, माहेरवाशिनी, नात्यातील स्त्री त्यांना ओवाळून आरती करतात. आरती सुरु असताना कुटुंबातील सर्वजण श्रीगुरुंसमोर लीन होऊन प्रार्थना करतात. एका घराकडून

दुसऱ्या घराकडे म्हणजे २०-२५ पावले जाण्यासाठी किमाण १०-१५ मिनिटे जातात. अशाही स्थितीत ब्राह्मण मंडळीही काही घाई न करा सर्वांचे पूजन, ओवाळणे होईपर्यंत थांबून राहतात. क्षणोक्षणी श्रीगुरुंचे तेज वाढत चाललेले दिसते. भक्तांच्या भावभक्तीच्या, शरणागतीच्या, प्रेमाच्या कृतीने श्रीगुरु प्रसन्न होत जाऊन तेज:पूंज होतात. शुक्लतीर्थाकडे पोहचण्यास श्रीगुरुंना १०-१२ तास लागतात.

## श्रीगुरु शुक्लतीर्थावरच स्नानासाठी का जातात?

फार प्राचीन काळी अत्यंत सत्वशील आणि धार्मिक वृत्तीचा सुवृत्त नावाचा राजा होऊन गेला. तो ब्राह्मणांचा, विद्वानांचा फार आदर करीत असे. त्याच्याकडे सर्व वेदशास्त्र संपन्न असलेला, विचारवंत, अत्यंत हुशार असा एक दशग्रंथी ब्राह्मण होता. आपल्या महान विद्वत्तेमुळे तो मोठा अहंकारी झाला होता. राजदरबारात कोणी विद्वान, शास्त्री, पंडीत आला की त्याच्याशी अनेक विषयांवर वाद घालून भर दरबारात त्याचा अपमान करीत असे.

एके दिवशी महामुनी ''उत्तंक'' सुवृत्त राजाकडे आले. राजा धर्मशील असल्याने अगत्याने त्याने महामुनींचे आदरातिथ्य केले. राजाला त्यांचा अधिकार ठाऊक होता. त्यांचे पाय आपल्या राज्याला लागले म्हणून सुवृत्ताला फार धन्यता वाटली. त्यांना उत्तम सिंहासनावर बसवून पूजा केल्यानंतर अत्यंत नम्रपणे महामुनींना येण्याचे कारण विचारले. इतक्यात तो अहंकारी दशग्रंथी ब्राह्मण तेथे हजर झाला. मुनींना हरविण्याची हीच नामी संधी आहे असे समजून उर्मटपणे त्याने उत्तकांना विचारले, ''काय रे ब्राह्मणा, आतापर्यंत किती शास्त्रज्ञान मिळविले आहेस? फुकट दक्षिणा प्राप्त होईल या लालसेने येथे आला असशील तर तर ती तुला मिळायची नाही.'' त्या ब्राह्मणाचा उर्मटपणा पाहून महामुनी शांततेने हसून म्हणाले, ''अरे महामूर्खा, आतापर्यंत राजाश्रय भोगून अनेक विद्वान, पंडितांबरोबर वाद घालून त्यांचा अपमान करण्यातच आपले आयुष्य खर्च केलेस. आता मलाही जिंकण्याची मनात इच्छा बाळगतोस. तुझ्या पापाची शिक्षा म्हणून तू या क्षणी राक्षस होशील!'' उत्तंकाच्या शापाने ब्राह्मण क्षणात राक्षस झाला. त्याचक्षणी त्याचा अहंकार नष्ट होऊन त्याला अपार पश्चाताप झाला. महामुनींना अनन्यभावे

शरण जाऊन म्हणाला, ''हे महामुनी, मी अहंकारात बुडून आंधळा झालो होतो. माझ्या विद्वत्तेचा मी गैरवापर केला. आपण दयाळू आहात. कृपावंत होऊन माझी या राक्षसयोनीतून सुटका करा.'' दयाळू महामुनी उत्तंकांना त्याची दया आली. त्याला घेऊन ते कृष्णातीरी आले. स्वत: तेथे स्नान केले व श्रीकृष्णेचे पवित्र जल ओंजळीत घेऊन त्या राक्षसरुपी ब्राह्मणाच्या अंगावर शिंपडले. श्रीकृष्णेच्या पवित्र जलस्पर्शाने ब्राह्मणाची क्षणात राक्षसयोनीतून मुक्तता झाली. आचारविचारांचा कलंक नष्ट झाला. त्याची कांती शुक्ल म्हणजे तेजस्वी झाली. त्या आनंदात तो उत्तकांच्या चरणी नतमस्तक झाला. ज्या ठिकाणी त्या ब्राह्मणाचा देह (काया) शुक्ल झाला त्या स्थानाला ''शुक्लतीर्थ'' नाव पडले. जेथे श्रीकृष्णावेणी नृसिंहवाडीत प्रवेश होताना पश्चिमवाहिनी होते त्या स्थानी हे पावन ''शुक्लतीर्थ'' आहे. येथेच श्रीगुरु कन्यागत महापर्वकाळ स्नानासाठी जातात.

श्रीनृसिंहवाडीतील श्रीगुरुंचा शिबिकोत्सव सिंहस्थ आणि कुंभमेळ्यातील शाही स्नानाच्या पर्वणीप्रमाणेच असतो. जवळपास २०-२४ तास हा सोहळा चाललेला असतो. नृसिंहवाडी पंचक्रोशीतून, संपूर्ण महाराष्ट्रातून भक्तांची मांदियाळी भरली जाते. कारण अत्यंत अलौकिक, नयनरम्य आणि श्रीगुरुंचे समक्ष दर्शन इत्यादी गोष्टींनी भावविभोर होऊन सर्वांग रोमांचित करणारा हा सोहळा असतो. श्रीगुरु सर्व भक्तांसह शुक्लतीर्थावर औदुंबर वृक्षाखाली येऊन स्थिरावतात. शिरोळ, अमरेश्वर, नृसिंहवाडी या प्रमुख तीन स्थानातील पुरातन दत्त मंदिरातील मूर्तींचा शुक्लतीर्थावर संगम होतो. त्याचवेळी शिरोळ भोजनपात्रातील पालखी चार मैल अंतर चालत येऊन तेथे पोहोचते. श्रीगुरुंची पालखी तेथे येता येता अमरेश्वरची पालखी येऊन मिळते. श्रीगुरुंना प्रिय असलेली गायन व किर्तन सेवा त्यांच्या चरणी ऋजू होते. त्यावेळी एक मंगलमय आणि दैवी शक्तींनी भारलेले असे वातावरण तयार होते. जणूकाही चराचरातील साऱ्या देवदेवता, यक्ष, गंधर्व, किन्नर, अप्सरा तेथे उपस्थित राहिले आहेत अशी जाणीव होते. महापर्वकाळ मुहूर्त सुरु होताच परंपरागत पुजारी श्रीगुरुंना घेऊन शुक्लतीर्थात स्नानासाठी उतरताच, ''श्रीसद्‌गुरुराज दत्तमहाराज अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त'' अशी एकसाथ प्रचंड आवाजात बिरुदावली होऊन श्रीगुरु सर्वांसमक्ष श्रीकृष्णावेणी-पंचगंगा संगमातील शुक्लतीर्थात शाही स्नानाचा आनंद घेतात. हजारो भाविक हा नयनरम्य सोहळा आपल्या डोळ्यांमध्ये आणि हृदयामध्ये साठवून ठेवतात. भक्तिरसात डुंबून नाचू लागतात. श्रीगुरुंचे स्नान झाल्यावर असंख्य भक्त ते पवित्र जल अंगावर

घेण्यासाठी पाण्याखाली डूबकी मारतात. श्रीगुरुंच्या अंगावरील जल आपल्या अंगावर घेऊन जन्मोजन्मीचे भाग्य उजळून महान पुण्य मिळविल्याची भावना प्रत्येकाच्या मनी येते. आपले जीवन धन्य झाल्याच्या आनंदात सर्वांच्या मुखी एकच जयघोष असतो. ''अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त'' ''दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिंगबरा!'' या जयजयकाराने सारे आसमंत दुमदुमून जाते.

त्यानंतर औदुंबरवृक्षातळी पुण्याहवाचन, पूजा होऊन इतर धार्मिक विधी संपन्न झाले की श्रीगुरुंची पालखी गावातील दुसऱ्या मार्गाने मनोहर पादुका मंदिराकडे येण्यास निघते. या मार्गातील प्रत्येक घरासमोर श्रीगुरु औक्षण करुन घेतात. कारण आदल्या दिवशी मार्गातील कोणाला श्रीगुरुंची ओवाळणी, आरती करावयास मिळालेली नसते. म्हणून परतीच्या वेळी दुसऱ्या मार्गातील सर्व सुवासिनींना, भक्तमंडळींना श्रीगुरु समक्ष दर्शन देऊन संतुष्ट करतात. याही वेळेस ब्राह्मण मंडळी सतत पदे, अष्टके, आरत्या गात असतात. आदल्या दिवशीचाच साजशृंगार, सजावट, मांडव, लेझीम, ढोलताशे, वाद्यवृंद यांच्या आनंदी वातावरणात श्रीगुरुंची पालखी संथपणे मंदिरात परत येते. श्रीगुरुंच्या उत्सवमूर्तीची महापूजा श्रीनारायण स्वामींच्या मंदिरातच होते. त्यानंतर मनोहर पादुकांची पूजा होऊन धूप, आरती झाल्यावर इंदुकोटी महास्तोत्र, मंत्रपुष्पांजली, विडा, शेजारती होऊन महापर्वकाळाच्या पहिल्या दिवशी ''शिबिकारोहण सोहळा'' संपूर्ण होतो. हा दिवस म्हणजे ''कन्यागत महापर्वकाळाची'' सुरुवात होते. पुढे एक वर्ष हा उत्सव सुरु असतो. या उत्सवकाळात श्रीकृष्णेच्या कोणत्याही तीरावर स्नान व धार्मिक कार्ये करता येतात. अशा या पर्वणीची जीवनात एकदा तरी अनुभूती घ्यावी!



## प्रखर तपस्वी व तेजस्वी संतांची भूमि ''श्रीनृसिंहवाडी''

श्रीकृष्णावेणी आणि पंचगंगा अशा सात पवित्र नद्यांच्या संगमाच्या क्षेत्रात वसलेली, अनेक योगी, तपस्व्यांच्या तपश्चर्येने पवित्र पावन झालेली एक विलक्षण दैवी भूमी म्हणजे श्रीनृसिंहवाडी! अशा पुण्यस्थळी श्रीप्रभू दत्तात्रेयांचे दुसरे अवतार श्रीनृसिंह स्वामी महाराजांचे आगमन झाले. साल होते १४२२! श्रीगुरु येथे येण्यापूर्वी योगाभ्यासात अत्यंत निष्णात असे श्रीरामचंद्र योगी येथे येऊन राहिले होते. त्यांची कथा अशी आहे;

### श्रीरामचंद्र योगी महाराज :

रामचंद्र गुरुकुलात विद्यार्थीदशेत असताना आश्रमातील चुकलेल्या आईच्या शोधासाठी रानात फार दूरवर गेला. त्यावेळी एके ठिकाणी सापाच्या फुत्काराने तो मूर्च्छित पडला. तेथेच जवळपास श्रीपादश्रीवल्लभ ध्यानस्थ बसलेले होते. त्यांनी जेव्हा डोळे उघडले तेव्हा रामचंद्र त्यांच्या दृष्टीस पडला. त्यांनी आपल्या कमंडलूतील जल त्याच्यावर शिंपडताच तो शुध्दीवर आला. परंतु सापाच्या जहरी फुत्कारामुळे बाळ रामचंद्राची स्मृती गेली होती. पुढे श्रीपादश्रीवल्लभांनी रामचंद्रच्या गुरुंची भेट घेऊन त्याला गुरुंकडे हवाली करुन वस्तुस्थिती सांगताच गुरु म्हणाले, ''स्वामी, आता आपणच याचा सांभाळ करावा. आपल्या कृपेने व मार्गदर्शनाने हे बालक महान धर्मसेवक होईल.'' ही घटना घडली होती गोकर्ण महाबळेश्वर येथे.

साक्षात दत्तगुरुंनी रामचंद्राचा सांभाळ करुन विद्याभ्यास शिकवून गायत्री पुर:श्चरण करवून, आपल्यासोबत भरतखंडात यात्रा करावी, धर्म व समाज कार्यात पारंगत करावे, हे रामचंद्राच्या आयुष्याचे महत् भाग्य होते. किंबहुना श्रीगुरुंचेच ते पुढील नियोजन होते. अशा तऱ्हेने रामचंद्र मोठा होत होत महान योगी बनला. एके दिवशी श्रीगुरुंबरोबर तीर्थयात्रा करीत श्रीकृष्णावेणी-पंचगंगा स्थानी आले. तेथे काही काळ वास्तव्य करुन कुरवपुरला निघण्यापूर्वी त्यांनी श्रीरामचंद्रांना सांगितले मी हा अवतार समाप्त करुन पुन्हा अवतार घेऊन तुला येथे भेटण्यास येणार आहे. तोपर्यंत तू येथेच रहा. श्रीगुरुंच्या आज्ञेप्रमाणे

श्रीरामचंद्र योगी संगम परिसरात तपश्चर्या करीत राहिले. कारण श्रीगुरुंचा तसा शब्द होता, तुला येथे येऊन भेटेन. श्रीगुरु पुन्हा येथे येणार म्हणून श्रीरामचंद्र योगींनी अनंत वर्षे तपश्चर्या करुन संगम परिसर पवित्र-पावन केला. श्रीगुरुंनीही आपला शब्द खरा केला व योगीराजांना पुन्हादर्शन दिले.

पुढे आपले कार्य पूर्ण करीत श्रीगुरुंचे नित्य दर्शन व्हावे व चिरंतर त्यांच्या सेवेचा लाभ व्हावा यासाठी श्रीगुरुंच्याच परवानगीने श्रीकृष्णावेणी-पंचगंगा घाटावर जीवंत समाधी घेतली. आज सर्व सनदिक आणि परिवार देवतेमध्ये श्रीरामचंद्र योगींना अग्रस्थान प्राप्त झाले आहे. त्यांची पूजा प्रथम होते. शंकराची पिंडी व साळूंकीच्या स्वरुपात त्यांचे स्मारक आहे. उन्हाळ्यात भक्त मंडळी त्या पिंडीवर दहिभाताची बुत्तीपूजा बांधून शांतता प्रस्थापित करुन त्यायोगे आपली मनोकामना पूर्ण करुन घेतात. त्यांच्या समाधीला श्रीनृसिंहवाडीत एक आगळे वेगळे महत्व प्राप्त झाले आहे.

**<u>श्रीनारायण स्वामी :</u>**

सन १७७८ साली श्री. प.प. नारायण स्वामी नावाचे महान सत्पुरुष होऊन गेले. काशीस जाऊन त्यांनी सहा शास्त्रांचा परिपूर्ण अभ्यास केला होता. १२ वर्षे गुरुसेवा करुन गुरुंनी केलेल्या आज्ञेने ''कोणताही वाद करणार नाही'' असा श्रीगंगेत उदक सोडून संकल्प केला व गुरुंच्या परवानगीने कोल्हापूरास परत येऊन श्रीनृसिंहवाडीला श्रीदत्त दर्शनासाठी आले. रोमारोमांत भक्ती रुजली असल्यामुळे त्यांनी वाडीतच वास्तव्य केले. त्यांची ईश्वरनिष्ठा व कमालीची विरक्ती पाहून श्रीगुरुंनी त्यांच्यावर कृपा करुन त्यांना आपलेसे केले. श्रीकृष्णावेणी-पंचगंगा संगमावर त्यांना नेऊन तीन दिवस संगमात अवगाहन करुन संन्यास दिक्षा दिली. तीन दिवसानंतर श्रीनारायण स्वामी दंडधारी वेशात गावात आले. लोकांनी त्यांना या अवतारात पाहून त्यांच्या आश्रमाबद्दल शंका घेऊ लागले. तेव्हा श्रीगुरुंनी पुजारी मंडळींना साक्षात दृष्टान्त देऊन त्यांच्या शंकेचे निरसन केले. त्यावेळेस सर्वांना श्रीनारायण स्वामींचे महत्व कळून चुकले. त्याक्षणापासून त्यांच्या किर्तीचा दरवळ सर्वत्र पसरु लागला. अनेक त्यांचे भक्त बनू लागले. कर्नाटक प्रांतातही त्यांचे असंख्य भक्त झाले. तेथे त्यांना दान स्वरुपात अनेक जमिनीही मिळाल्या.

श्रीगुरुंचे नारायण स्वामींवर अलोट प्रेम असल्याने त्यांचे प्रतिक म्हणून आजही शिष्याची पूजा

करण्याचा प्रथम हक्क त्यांचाच आहे. त्यांची पूजा केल्यानंतर देवाची पूजा होते.

श्रीनारायण स्वामींना भजनाची फार आवड होती. भजनात ते इतके गुंग व्हायचे की कधी समाधी अवस्थेत जायचे ते त्यांचे त्यांनाच कळायचे नाही. श्रीगुरुंनी त्यांच्यावर इतकी कृपा केली की शिष्याचाच महिमा वाढवला. असा शिष्य महिमा श्रीनृसिंहवाडीतच पाहावयास मिळतो. पुढे १८०५ साली त्यांनी येथेच समाधि घेतली. अशा तऱ्हेने श्रीगुरुंचे एकनिष्ठ व श्रेष्ठ म्हणून श्रीनारायण स्वामींना श्रीनृसिंहवाडीत मानाचे स्थान मिळाले आहे.

## गुरुभक्त - विठ्ठल ढोबळे

श्रीगुरुंची अमृतवाणी सत्यात उतरुन श्रीभैरंभटांना उत्तम पुत्राची प्राप्ती होऊन त्याला पुढे चार पुत्र झाले आणि भैरंभटांचा वंश औदुंबर वृक्षाच्या फळांप्रमाणे बहरत गेला. पुढे श्रीगुरु पादुकांच्या सेवावृत्तीमुळे पुढील वंशजाना पुजारी हे आडनाव प्राप्त झाले. काळगतीप्रमाणे या घराण्यातील काहींना वेगवेगळी टोपणनावे मिलाली. पैकी हावः, खोंबारे, रुक्के, कंठराव (कंठ रव), ढोबळे इत्यादी इत्यादी! पैकी ढोबळे घराण्यातील विठ्ठल ढोबळे म्हणजेच ''गुरुभक्त'' होत.

त्यांच्याबद्दल एक कथा सांगितली जाते, विठ्ठल ढोबळे हे मतीमंद, मूढबुध्दीचे होते. आई हाच त्यांचा परिवार! बिचारी आईच ती! आपल्यानंतर या मुलास कोणीही नाही. पुढे त्याचे कसे होणार? ही चिंता तिच्या मनी सतत सलत होती. अखेर त्या माऊलीने निर्णय घेतला आणि विठ्ठलला घेऊन आत्महत्या करण्यास निघाली. कोणीतरी तिला तिच्या विचारापासून रोखले व उपाय सुचविला, येथे श्रीनारायण स्वामी आहेत. त्यांना शरण जाऊन आपली व्यथा सांगा. ते तुझी चिंता तात्काळ दूर करतील. त्या माऊलीने त्या सद्गृहस्थाचा सल्ला ऐकला आणि नारायणस्वामींजवळ येऊन नमस्कार करुन आपले दुःख त्यांच्यापाशी कथन केले. श्रीनारायण स्वामींनी श्रीगुरुंचे ध्यान करुन चिमूटभर विभूती विठ्ठलाच्या जिभेवर ठेवून मस्तकावर आपला वरदहस्त ठेवून आशिर्वाद दिला, ''आजपासून तुझ्या जीभेवर सरस्वती देवी वास करुन तुला दिव्यदृष्टी प्राप्त होईल. काव्यदेवता तुझ्यावर प्रसन्न होऊन तुझ्याकडून धर्मस्थळांची, देवदेवतांची महती काव्यातून प्रगट होईल.'' श्रीनारायण स्वामींचे वरदान सत्यात उतरले

आणि श्रीविठ्ठल ढोबळेंना कवित्वशक्ती प्राप्त झाली. ती त्यांनी श्रीगुरुंच्या चरणी व इतर देवदेवतांच्या सेवेसाठी अर्पण केली. ''गुरुभक्त'' या नाममुद्रेने त्यांनी अनंत रचना केल्या. त्यांचा जन्मकाळ आणि गमन याबद्दल निश्चितकाळ सांगता येत नाही. मात्र श्रीनारायणस्वामींचे आशिर्वाद त्यांना मिळाले याचा अर्थ त्यांचे ते समकालीन होते.

श्रीनृसिंहवाडीतील श्रीगुरुंच्या काकडारती समयी गुरुभक्तांच्या पदांना अनन्य साधारण महत्व आहे. कारण ही पदे प्रासादिक आहेत. श्रीगुरुंच्या प्रात:कालीन पूजेप्रमाणेच सायंकालीन पूजेलाही फार महत्व आहे. त्यावेळी म्हटल्या जाणाऱ्या आरत्या, श्रीगुरुंची उत्सवमूर्ती पालखीत आरुढ होऊन निघणाऱ्या पालखीसमोर गायली जाणारी पदे, शेजारती इत्यादी गुरुभक्तांच्या रचना श्रीगुरुंच्या सेवेला सिध्द असतात.

गुरुभक्तांची श्रीदत्तप्रभूंवरील अपार निष्ठा त्यांच्या आरत्या, स्तोत्रे, प्रार्थना अशा विविध कवणांतून व्यक्त होते. त्यांच्यासह पदांतील आर्तता, नादमादुर्य, समरसता व प्रासादिकपण ही सामान्य जनांनाही भावभक्तीची भावमधुरता प्रदान करते. म्हणूनच ती सारी पदे सर्वांच्याच मुखातून सहज पुटपुटली जातात. भगवंताचे नामस्मरण अशा तऱ्हेच्या कवणांतून, पदातून जिभेवर रुळणे हा ही एक भावभक्तीचा अलौकिक आनंदच आहे. हाच आनंद मन शांत, निवांत आणि प्रसन्न करतो.

## श्रीकृष्णानंद स्वामी

श्रीकृष्णानंद स्वामी हे एक श्रीनृसिंहवाडीतील परमार्थातील उच्च अधिकारी! श्रीनारायण स्वामींचे ते अत्यंत सात्विक शिष्य. याचे मूळ नाव जर्नादन उपाध्याय. ते आजन्म आपल्या सद्‌गुरुंच्या सेवेत होते. दोघांचेही एकमेकांवर निरातिशय प्रेम होते. म्हणून श्रीनारायणस्वामींनी आपल्या या लाडक्या शिष्यास ऐहिक जगाची असत्यता तत्वज्ञानातील मौलिक सिध्दान्ताद्वारे पटवून दिली. त्याचा सर्वसामान्य लोकांना बोध होऊन त्यांचे हित व्हावे म्हणून कृष्णानंद स्वामीनी ''अज्ञानतिमीर दिपक'' नावाचा सहासष्ट श्लोकांचा गुरुशिष्य संवादात्मक ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ वेदांचे रहस्य उलगडून दाखविणारा असाच आहे. यातील विषयही फार गहन असूनसुध्दा श्रीकृष्णानंद स्वामींनी शास्त्रशुध्द सोपा मार्ग दाखवून तो सामान्य

लोकांना कळून ईश्वराची ओळख पटावी असा उदात्त हेतू समजून येतो. त्याशिवाय संस्कृत व वेद या दोन विषयांवरील त्यांची भव्य विद्वत्ता आणि पांडित्य स्पष्टपणे दिसून येते.

श्रीनारायणस्वामी श्रीकृष्णातटी समाधिस्त झाल्यानंतर काही काळाने त्यांनी आपल्या या शिष्यास दृष्टान्त देऊन सांगितले, ''श्रीकृष्णावेणी-पंचगंगा संगमी श्रीब्रह्मानंद यती राहतात. त्यांचे शिष्य श्रीरामानंद स्वामी यांच्याकडून संन्यास दीक्षा घेऊन तेथेच अखंड सेवा करावी.'' त्यानुसार जनार्दनांनी श्रीनृसिंहवाडीत येऊन श्रीरामानंदांकडून संन्यास दीक्षा ग्रहण केली. गुरुंनी त्यांचे नाव श्रीकृष्णानंद स्वामी असे ठेवले. गुरुंच्या आज्ञेप्रमाणे श्रीकृष्णानंद स्वामीं (काशिकर) नित्य नारायणस्वामींच्या समाधी पूजनात व भजनात रममान झाले. त्यांच्या समाधीला लागून श्रीकृष्णानंद स्वामींची समाधी आहे.

## श्रीगोपाळ स्वामी

श्रीगोपाळ स्वामी हे एक परमयोगी आणि अवतारी पुरुष होते. श्रीकृष्णानंद स्वामींच्या समाधीला लागूनच यांची समाधी आहे. त्यांची श्रीनृसिंहवाडीतील स्वयंसंपादित जमीन त्यांनी देवस्थानाला पूजा-अर्चेसाठी व नंदादीपासाठी दान केली. श्रीकृष्णावेणीचे पश्चिमतीर म्हणजे शुक्लतीर्थ होय. हेच श्रीगुरुंचे कन्यागत महापर्वकाळातील स्नानाचे ठिकाण असल्याने तेथे काहीकाळ त्यांचे वास्तव्य होते. त्यावेळी तेथे पूजा-अर्चा, पुण्याहवाचन, शांतीसूक्तपाठ इत्यादी विधी सुरु केल्या. त्यामुळेच या जमीनीत प्रतिवर्षी अफाट पीक येते. म्हणून या जमिनीला ''समाधी'' असे नाव प्राप्त होऊन तिचे फार महत्व वाढले आहे. या समाधीची त्रिकाळ पूजा अर्चा होत असते. वर्षांतून एकदा त्याची आराधना म्हणून त्यांच्या समाधीवर लघुरुद्राभिषेक, मंत्रजागर इत्यादी कार्यक्रम होत असतात.

## श्रीमौनीस्वामी महाराज

श्रीमौनी स्वामींचा सोलापूरातील एका अतिशय पवित्र अशा देशस्थ कुळात जन्म झाला. लहानपणीच त्यांना उपरती होऊन ते घराबाहेर पडले. कडुलिंबाच्या पाल्याचा रस फक्त पित असत. हाच त्यांचा

आहार असे. त्यांनी पायीच काशी, रामेश्वर इत्यादी यात्रा केल्या. प्रभू दत्तात्रेयांच्या आज्ञेवरुन त्यांनी वयाच्या पंचवीसाव्या वर्षी संन्यासाश्रम स्वीकारला व त्यांचे प्रद्युम्नानंद सरस्वती असे नामाभिधान झाले. सतत बारा वर्षे त्यांनी कडकडीत मौनव्रत पाळल्यामुळे ते मौनीस्वामी म्हणून सर्वपरिचित झाले.

श्रीनृसिंहवाडीत आल्यानंतर श्रीनारायण पुजारी वाडीकर यांच्या घरी वास्तव्य करीत. त्यानंतर ते दत्तमंदिर परिसरातील एका ओवरीत राहू लागले. मात्र दोन्ही ठिकाणी त्यांचा मुक्काम होत असे. प्रखर तपश्चर्येमुळे त्यांना वाचासिध्दी प्राप्त झाली होती. अष्टसिध्दीही त्यांच्या पायाजवळ बसून होत्या. परंतु त्याचा उपयोग त्यांनी जनकल्याणासाठीच केला. अनेकांचा उध्दार केला. पुजारी मंडळींना ते मौलिक मार्गदर्शन करीत असत. त्यांना मौन फार प्रिय असल्याने फार थोडा त्यांचा संवाद होत असे. श्रीकृष्णावेणीचा उत्सव मौनी स्वामींनीच सुरु केला. त्यांची समाधी गोपाळ स्वामींच्या समाधीजवळच आहेत.

## श्रीब्रह्मानंद सरस्वती स्वामी

हे एक दंडी संन्यासी होते. सदाचार संपन्न, कर्मट व आदर्श संन्याशी असा त्यांचा नावलौकिक होता. नित्य श्रीदत्तचरणी जल अर्पण करणे, भजन, पूजन करणे, श्रीगुरुचरित्र पठण करणे इत्यादी सेवा त्यांची चालू असे. नावाप्रमाणेच त्यांची सदा ब्रह्मानंदी टाळी लागलेली असे. ईश्वर चिंतनाने, सगुण मूर्तिपूजनाने त्यांनी सारे काही प्राप्त करुन घेतले होते. जे कोणी त्यांच्या सहवासात आले त्या सर्वांना त्यांच्या ज्ञानाचा लाभ झाला.

श्रीमौनी स्वामींच्या समाधीलगतच त्यांची समाधी आहे.

## श्रीवासुदेवानंद सरस्वती उर्फ श्रीटेंबेस्वामी (थोरले महाराज)

सावंतवाडीतील माणगांव गावी श्री. गणेश व सौ. रमाबाई यांचे पोटी वासुदेवांचा जन्म झाला. जनक श्री. गणेश हे महान दत्तभक्त तर मातोश्री तशाच तपस्वी असल्यामुळे वासुदेव लहानपणीच तल्लख

बुध्दीचे होते. शाळेतील कोणताही विषय त्यांच्या सहज तोंडपाठ होत असे. श्री. विष्णूभट उकिडवे यांचेकडे वेदाध्ययन करुन श्रीशंभू शास्त्री यांच्याजवळ संस्कृताचा अभ्यास केला. ज्योतिषशास्त्राचेही ज्ञान प्राप्त केले. वेळेवर संध्यावंदन, एकादशीला कडकडीत उपवास करण्याचे त्यांनी कधीही सोडले नाही. परान्न कधीही घेतले नाही.

वासुदेव बोरगावी मुक्कामी असताना त्यांना एक दृष्टान्त झाला, नृसिंहवाडीला श्रीगोविंदस्वामी आहेत त्यांचे दर्शन घ्यावे. त्याप्रमाणे ते वाडीस आले. श्रीगोविंदस्वामींनी त्यांना श्रीमनोहर पादुकांवर जल अर्पण करण्यास सांगितले. श्रीकृष्णावेणी मातेचे जल श्रीगुरुंच्या चरणी अर्पण करताना वासुदेवांना अत्यंत आनंद व कृतार्थता वाटली. श्रीगोविंदस्वामी त्यांचे श्रीनृसिंहवाडीत गुरु झाले.

पुढे पत्नीचा अंत्यविधी झाल्यानंतर चौदाव्या दिवशी त्यांनी संन्यास घेतला. त्याच रात्री गोविंद स्वामींच्या स्वरुपात श्रीगुरुंनी वासुदेवांना प्रणवाचा उपदेश करुन जप करण्यास सांगितले. काही काळाने श्रीगुरुंच्या आज्ञेने वासुदेवांनी उज्जयनीतील श्रीनारायणानंद सरस्वती स्वामींकडून दंड ग्रहण केला, त्यानंतर वासुदेवानंद सरस्वती म्हणजे टेंबेस्वामी श्रीप्रभूंच्या आज्ञेनुसारच प्रत्येक गोष्ट करु लागले. त्यांनी आपल्या जीवनप्रवासात तेवीस चातुर्मास केले. शेवटचा चातुर्मास गरुडेश्वरला केला.

अशा या थोरल्या महाराजांचे श्रीनृसिंहवाडीवर अत्यंत प्रेम होते. येथील पुजाऱ्यांना त्यांनीच मार्ग घालून दिला. काही अपराध घडला असता करुणात्रिपदी व घोरकष्टोध्दरण स्तोत्र तयार करुन त्यांचा नित्य पाठ करण्यास सांगून सर्व संकटे नाहीशी केली.

श्रीआद्यशंकराचार्यांनंतर मोठी संस्कृत ग्रंथ संपदा त्यांनी निर्माण केली आहे. अंती गरुडेश्वर येथे त्यांनी समाधी घेतली. त्यांच्या पादुका ब्रह्मानंद स्वामींच्या ब्रह्मानंदमठात ठेवल्या आहेत.

## श्रीनृसिंहवाडीतील महादबा पाटील महाराज

सांगली जिल्ह्यातील तासगांव तालुक्यात वसलेल्या धुळगाव (सोनी) येथील श्रीबाबागोंडा पाटील घराण्यात महादबा पाटील महाराजांचा जन्म झाला. साल होते १९१६! बालपणापासूनच त्यांची अलौकिक विलक्षणता प्रकटू लागली. जन्मत:च स्वयंभू असल्याने वाचासिध्दी प्राप्त झाली होती. त्यांचे जनक

श्रीबाबागोंडा हे निष्ठावान दत्तभक्त! अखंड चाळीस वर्षे दर पौर्णिमेला निष्ठेने, श्रध्देने श्रीनृसिंहवाडीची पायी यात्रा करीत असत. पुढील काळात महादबा पाटील महाराजांनी आपल्या वडिलांचे व्रत अखंडपणे चालविले.

महादबा पाटील महाराज आजन्म नैष्ठिक ब्रह्मचारी होते. उपासना, साधना, तपश्चर्या करुन आत्मज्ञान आणि आत्मसामर्थ्य प्राप्त करण्याची त्यांना गरज नव्हती. जन्मत:च परिपूर्ण असे होते. ते म्हणत, ''मी सर्व काही शिकून आलोय, सर्वांना शुध्द करायला आलोय.'' भक्त आपल्या अडचणी त्यांना सांगत तेव्हा ते आपल्या डबीतील अंगारा काढून लावीत. त्यांच्या अडचणी दूर होऊन मनोरथ पूर्ण होई.

राहणी साधी, सात्विक भोजन, टापटीपपणा, अंगात धोतर, शर्ट, त्यावर उपरणे, उटनटा कोट, डोक्याला लाल रुमाल आणि हाती काठी! आत्मनंदाची लागलेली टाळी असे हे देहधारी सत्पुरुष महादबा पाटील महाराज. बोलणेही मोजकेच! धोतराचा सोगा तोंडात धरुन त्यांची आकाशाकडे सदैव दृष्टी असे. आपले महाराजपण, दैवीशक्ती त्यांनी कोणाला दिसू दिली नाही. सर्वसामान्यांप्रमाणे राहिले आणि वागले. त्यामुळे कोणालाही ते देवरुप वाटले नाहीत. आणि कोणालाही ते समजले देखिल नाहीत. यातच महाराजांचे महात्म्य दडलेले आहे. आपल्या अनेक भक्तांच्या घरी गावोगावी जाऊन आशिर्वाद, अंगारा देऊन त्यांचे कल्याण करणारे व भक्तांकडून काहीही न घेणारे श्रीमहादबा पाटील महाराज, एकमेव महापुरुष असावेत.

मुकुंदराजाच्या परंपरेतील, नांद्रे खटाव येथील प. पू. श्री. रामानंद महाराज खटावकर यांचा वरदहस्त पाटील महाराजांना लाभला. नाथपंथ-शिवोपासना-दतोपासना यांचा त्रिवेणी संगम त्यांच्यात एकवटला होता. श्रीनृसिंहवाडीबद्दल त्यांना लहानपणापासूनच आकर्षण होते. दर शुध्द एकादशी ते पौर्णिमा वाडीत येत आणि पौर्णिमा ते संकष्टीपर्यंत मिरजेत आण्णाबुवांच्या मठात असत.

अखेर सन १९८२ मध्ये जेष्ठी पौर्णिमेला स्वेच्छा समाधी घेतली. तत्पूर्वी त्यांनी स्वत: वाडीमध्ये मठ बांधला. मठाची व्यवस्था चालू राहण्यासाठी त्यांनी गादी निर्माण केली नाही व कोणास शिष्यही केले नाही. स्वत: त्यासाठी म्हणजे १९८१ साली ट्रस्ट स्थापन करुन मठाची सर्व व्यवस्था ट्रस्टकडे सुपूर्द केली.

## श्रीनृसिंहवाडी - श्रीगुरुंची नित्यसेवा

श्रीनृसिंहवाडीतील श्रीगुरुंच्या मनोहर पादुका मंदिरातील नित्य कार्यक्रम म्हणजे तेथील पुजारी मंडळींची नित्य जीवनशैली होय. अगदी ब्राह्मण मुहूर्तावर ''दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा'' नामघोष करीत पहाटफेरी निघते. सकल गाव या मंगल नामस्मरणाने जागे होते. ह्या ग्रामप्रदक्षिणेत पुजारी व इतर भक्त सामील होतात. श्रीगुरुंच्या नामघोषाने सारा परिसर मंत्रावून टाकतात. त्याचवेळी सनई-चौघड्याचे मंजूळ स्वर कानी पडतात. हक्कदार पुजारी, ज्यांची त्यादिवशी पूजा असते ते आधीच घाटावर येऊन स्नानसंध्या उरकून शुचिर्भूत होतात. नारायणस्वामी महाराजांचे व श्रीगुरुंचे पूजन करुन मुख्य मंडपात हजर होतात. तोपर्यंत पूर्वद्वाराकडे भक्तांची दाटी झालेली असते. ''उठि उठि बा दत्तात्रेया! भानु करु पाहे उदया'' अशी भूपाळी चालू होते. आचमन, संकल्प करुन श्रीगणेशाचे पूजन होऊन मंडपातील घंटेचा एक टोल वाजविला जातो. मुख्य गाभाऱ्याचे वामनद्वार तीन टाळ्या वाजवून उघडले जाताच ''प्रभो सरकार कैलासपते गिरीजाशंकर, कर्पूरगौर महाराज'' अशी प्रेमळ हाक भक्तांच्या मुखातून बाहेर पडते आणि प्रभूंचे दिवसाच्या सुरुवातीला दर्शन होते. तेव्हा ''भक्तवत्सल भक्ताभिमानी राजाधिराज दत्तराज महाराज'' असा जयघोष होतो.

काकड आरती होऊन क्षमस्वापराध म्हणून झाल्यावर श्रीगुरुंच्या पादुकांवरील फुले, वस्त्रे हळूवारपणे बाजूला काढल्यानंतर ''काषायवस्त्रं करदंडधारिणम्'' ह्या श्लोकाने ध्यान केले जाते. श्रीगुरुंचे मनी ध्यान केल्यावर मनोहर पादुकांवर श्रीकृष्णवेणीचे पवित्र जल अर्पण करण्यात येते. पुजारी वर्ग शुचिर्भूत होऊन ओलेत्यानेच श्रीगुरुंच्या चरणांवर (पादुकांवर) पाणी घालून संतुष्ट होतात. धन्य पावतात. ते पाहून जमलेल्या भक्तांच्या मनात एक विचार सहज स्पर्श करुन जात असेल, किती हे भाग्यवान पुजारी, ज्यांना श्रीगुरुंच्या चरणांना स्पर्श करण्याचे महत् भाग्य लाभले आहे. हा जलार्पणाचा सोहळा चालू असताना, ''दत्तात्रेया तवशरणम्'' हे शरणाष्टक समस्त भक्तगण आळवित असतात. जलाभिषेक पूर्ण होताच रुद्र, पुरुषसुक्त, श्रीसुक्त अशा सूक्तांचे पठण केले जाते. मग भगव्या छाटीने श्रीगुरु पादुका कोरड्या, स्वच्छ केल्या जातात. गंधलेपन करुन तुळशी, सुवासिक फुले यांचा साज चढविला जातो. पुन्हा एकदा सर्व भक्तांना श्रीगुरुपादुकांचे दर्शन होते. सर्व मनोमन सुखावले जातात. तोवर तयार असलेले लालकिनखापी

सात पानांचे वस्त्र घालून त्यावर गंधाच्या तीन रेखांनी मंडीत चमचमणारी मोठी नागप्रतिमा ठेवली जाते. त्यासमोर दोन पितळी पादुका आणि चांदीच्या दोन छोट्या समया ठेवल्या जातात. श्रीगुरुंना नैवेद्य दाखविताना पडदा सोडला जातो. धुपारतीत निखाऱ्यांवर धूप घालून पडदा वर उचलला जातो. त्यावेळी भक्तगण ''श्रीगुरुदेवदत्त'' अशी गर्जना करतात.

श्रीगुरुंचे (मनोहर पादुकांचे) पूजन झाले की पुजारी सनकादिकांची पूजा करण्यास बाहेर पडतात. पूजा साहित्य घेतलेला एक शागीर्द हर हर महादेव म्हणत पुढे असतो. श्री. रामचंद्र योगी, श्री. नारायण स्वामी, श्री. गोपाळस्वामी, श्रीकाशीकरस्वामी, श्रीमौनीस्वामी, श्रीविठोबा पंचायतन, श्रीब्रह्मानंदस्वामी, श्रीटेंबेस्वामी, श्रीकृष्णावेणी माता, श्रीसांब, श्रीरामसीता, श्रीअन्नपूर्णा, श्रीजान्हवी, श्रीगणपती अशा क्रमाने सर्व सनकादिकांचे पूजन होऊन तीर्थ अंगारा  होतो. प्रभात पूजा संपन्न होते.

सारा मंडप धुऊन स्वच्छ केला जातो. त्यानंतर म्हणजे आठ वाजल्यापासून दुपारी बारा वाजेपर्यंत पुजारी मंडळी भक्तगणांच्या इच्छेप्रमाणे, संकल्पाप्रमाणे पंचामृत, एकादशनी, लघुरुद्र इत्यादी पूजाविधी यथाशक्ती करतात. माध्यान्ह समयी श्रीगुरु पादुकांच्या महापूजेचा मंगलमय सोहळा सुरु होतो. मंदिराचे पूर्व, दक्षिण व उत्तर द्वार उघडे केल्याने तेथे भक्तगणांची श्रीगुरुंची महापूजा पाहण्यासाठी एकच गर्दी होते. कोठेही गडबड, गोंधळ होत नाही. सर्व काही शिस्तबध्द!

श्रीगुरु पादुकांना स्नान, संध्या आणि भस्मविलेपन केलेले हक्कदार पुजारी आपापले धोतर गुडघ्यापर्यंत खेचून पांढऱ्या शुभ्र उपरण्याने नाक, तोंड झाकून फक्त डोळे उघडे ठेवून वामनद्वारातून अतिशय काळजीपूर्वक आत जातात. आपल्या डाव्या हाताचा किंवा पायाचा स्पर्श होणार नाही, इतकेच काय आपला श्वासदेखील श्रीगुरु पादुकांवर पडणार नाही याची फार दक्षता घेतात. पादुकांची अर्थात श्रीगुरुंची षोडशोपचार महापूजा होते. गंधलेपन होऊन नानाविध सुवासिक फुले अपूर्ण छाट्यांनी व किनखापी वस्त्रांनी श्रीपादुका आच्छादित केल्या जातात. महापूजा संपल्यानंतर इतर सोपस्कार झाले की दुपारी दोन ते चार ही वेळ श्रींच्या मंदिर परिसरात निवांतपणा असतो. भाविक भक्तमंडळी प्रदक्षिणा करीत असतात. त्याचवेळी काही पुजारी मंडळी पवमान सूक्त पठण करीत असतात. त्यादिवशी जर दिन विशेष असेल तर काही भक्तगण भजन, किर्तन, प्रवचनाचे कार्यक्रम करतात.

सायंकाळी सात वाजता पुन्हा पाळीदार पुजारी स्नान संध्या करुन शूचिर्भूत होऊन सोवळ्याने सायं

पूजेसाठी मंडपात येऊन दाखल होतात. त्याचवेळी श्रीनारायण स्वामींच्या मंदिरात सांजदिप लावले जातात. त्यांच्या मंदिरातील श्रीगुरुंची उत्सव मूर्ती चौरंगावर घेतली जाते. किरीट-कुंडले, सुवर्णहार, मोतीपोवळे, रुद्राक्षांच्या माळा, भरजरी वस्त्रे यांनी श्रीगुरुंना पोशाख चढविला जातो. इकडे मंदिरात पाळीदार पुजाऱ्यांची पंचोपचार पूजा सुरु होते. अष्टसुगंधित धुपाच्या सुवासाने सारा परिसर दरवळून निघतो. यावेळी धुपाचे फार महत्व आहे. कोणी भूत, पिशाच्च, संबंध यांनी बाधीत असेल तर ते त्या व्यक्तीच्या अंगात संचार करुन श्रीगुरुंशी संवाद साधतात. धुपानंतर नैवेद्य दाखविला जातो. हातात पंचारती घेऊन पुजारी श्रीगुरुंना ओवाळू लागताच घंटा, झांज, सनई-चौघडे, नगारा वाजू लागतात. धुपारती चालू असताना भक्तांच्या मुखातून ''पार्वतीपते हरहर महादेव! श्रीगुरुदेव दत्त!'' अशी ललकारी निघते. आरत्या म्हणणारे प्रभूंसमोर उभे राहून प्रेमपूर्वक झांझाच्या तालावर सावकाश वार परत्वे काही रोजच्या आरत्या म्हणतात. तोवर श्रीगुरुंचा पोशाख झालेला असतो. असे हे भक्तांच्या प्रेमाने सजलेले त्रैलोक्यपती स्वामी महाराज ''भक्तवत्सल भक्ताभिमानी राजाधिराज श्रीसद्‌गुरुराज दत्तराज महाराज'' अशा उत्तुंग ललकाऱ्यात मंडपात येतात. शेवटची आरती होताच स्वामी पालखीत विराजमान होतात.

जरतारी गोंड्यांनी सजविलेल्या पालखीसंगे अबदागिरी, मोर्चळ, चवऱ्या, दिवटी, चांदिच्या काठ्या घेऊन पुजारी मंडळी शाही इतमानाने पालखी सोहळा सुरु करतात. मंदिराला तीन प्रदक्षिणा करताना चारी दिशांच्या टप्प्यावर पालखी थांबते. त्यावेळी अष्टके, करुणात्रिपदी, भक्तीगीते, अभंग यांची जणू मैफिलच झडते. ही नित्य म्हटली जाणारी पदे ''गुरुभक्त'' व ''थोरले महाराजांनी'' रचलेली आहेत. आपले संपूर्ण आयुष्य केवळ दत्तभक्तीमध्ये रमून गेलेले ''गुरुभक्त'' म्हणजे विठ्ठल आबाजी ढोबळे पुजारी होत. त्यांनी अनेक पदे, स्तोत्रे, करुणाष्टके, शरणाष्टके, आरत्या यांचा शाश्वत ठेवा श्रीगुरुंच्या चरणी अर्पण केला आहे. विशेष म्हणजे येथील पुजारी मंडळींनी मौखिक परंपरेने व निश्चयाने ''गुरुभक्तांचा'' हा ठेवा पिढ्यान पिढ्या जतन करुन ठेवला आहे. त्यांच्या साऱ्या रचना अत्यंत प्रासादिक व भावभक्तीने ओथंबलेल्या आहेत. त्यातही श्रीपादश्रीवल्लभ, श्रीनृसिंहसरस्वती, श्रीदत्तमहाराज यांच्या जयंती सोहळ्याच्या वेळी म्हटला जाणारा ''पाळणा'' आणि दसरा-दिवाळी च्या पहाटे म्हटले जाणारे ''नहाणी'' ही दोन्ही पदे अपूर्व नवलाईची वाटतात. त्यांचे श्रवण होणे हा ही एक जीवनातला अतिशय सुंदर योग आहे. आणि ईश्वरी कृपा सुध्दा! तीन प्रदक्षिणा पूर्ण होताच मंडपामध्ये देवे, तीर्थमंत्र होऊन

''घोरकष्टोध्द्‌रण'' स्तोत्राची सर्व संकट निवारणाची, लोकमांगल्य वाढवणारी प्रार्थना झाली की ''दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा'' चा गजर होऊन श्रीगुरु पुन्हा त्याच रुबाबात श्रीनारायण स्वामींच्या मंदिरात येतात. त्यावेळी वैदिक मंडळी त्यांना वेदातील ऋचा ऐकवितात. त्यानंतर विडा, अपराध क्षमा व शेजारती होऊन मंदिराचे द्वार बंद केले जाते.

असा हा दैनंदिन सोहळा हीच खरी श्रीनृसिंहवाडीची ओळख आहे. आद्य पुजारी भैरंभटाचे वंशज दररोज काकड आरती ते शेजारती आणि गुढीपाडवा ते महाशिवरात्री या दरम्यान सर्व कार्यक्रम अत्यंत उत्साहाने, भावभक्तिने, श्रीगुरुंवरील श्रध्देने व प्रेमाने साजरे करतात. यामध्ये कोठेही किंचितही बदल नसतो वा हलगर्जीपणाही नसतो. त्यातूनही काही अपराध घडलाच तर त्याचे निवारण होण्यासाठी काकड आरतीच्यावेळी ''क्षमस्वापराधम्'' आणि शेजारतीच्या आधी ''अपराधक्षमा आता केला पाहिजे'' अशी नम्र विनवणी श्रीगुरुंना करातात. खरोखरच ही सारी पुजारी मंडळी देवाची लाडकी लेकरेच आहेत. श्रीगुरु त्यांच्यावर प्रसन्न आहेत. आपल्या या भक्तांवर अनुग्रह करणे किंवा त्यांना काही सूचना द्यायच्या असतील किंवा आणखी काही सांगायचे असेल तर एखाद्या पुजाऱ्याच्या मुखातून श्रीगुरु बोलतात हा एक तेथील पुजाऱ्यांचा मोठा अनुभव आहे.



## नृसिंहवाडीतील पुजारी व इतर भक्तांची सेवा

श्रीनृसिंहवाडीतील एक उत्तुंग व्यक्तिमत्व म्हणजे वेदमूर्ती अवधूतशास्त्री बोरगावकर! स्वत:चे घर हे मंदिर समजून शेकडो मुलांना वेद अध्ययनाचे अमृत पाजून संस्कृतीची पिढी त्यांनी येथे तयार केली. आजही त्यांचे अखंड कार्य चालू आहे.

श्रीगुरुंच्या उत्सवमूर्तीसाठी विविध सुवासिक फुलांच्या माळा बनवून ही आगळी वेगळी श्रीगुरुसेवा वडिलोपार्जित रुक्के कुटुंबीय करीत आहेत. श्री. दत्तात्रेय लक्ष्मण रुक्के पुजारी यांनी ही परंपरा आजतागायत चालू ठेवली आहे. देवाला फुले फार आवडतात वा दुसऱ्या अर्थी देव फुलांचा भुकेला हे येथे सार्थ ठरण्यासारखे आहे.

त्याचप्रमाणे श्रीगुरुंच्या उत्सवमूर्तीला नटविण्याचे काम श्री. संजय पुरुषोत्तम रुक्के पुजारी यांनी अखंडपणे चालू ठेवले आहे.

येथील जेष्ठ व वयोवृध्द वय वर्षे ८०, श्री. विश्वनाथ गणेश पुजारी पहाटे श्रीकृष्णेत स्नान करुन महाराजांची सेवा करतात. इतकेच नव्हे तर आजही ते श्रीगुरुचरित्र ग्रंथाचे पारायणही करतात.

दिवंगत श्री. भानुदास कृष्ण पुजारी यांनी तीसहून अधिक वर्षे संततधार सोहळ्यात तसेच श्रीगणेशमूर्तीची व दत्त सेवा ॠजू केली आहे. आजही त्यांची आठवण कायम आहे.

श्री. दत्तात्रय गजानन रुक्के उर्फ बाळासाहेब रुक्के पुजारी नित्य सायंकाळी श्रीगुरुंच्या पालखीसमोर आपली गायन सेवा ॠजू करतात.

वेदमूर्ती विजय नारायण मणेरीकर गुरुजी, देवस्थान चलित वेदपाठशाळेत अध्यापनाचे कार्य करीत आहेत. पन्नासहून अधिक विद्यार्थी तेथे वेदाध्ययन शिक्षण घेत आहेत.

एक आगळीवेगळी सेवा म्हणजे ''मनोहर पादुकांना'' नित्य पाच लिटर दूध घालण्याचे अखंड व्रत श्री. गोपाळ कृष्ण दुग्धालयामार्फत होत असते. शिवाय येथील अनेक व्यावसायिक जे पेढे, बर्फी, करदंड तयार करतात, ते सर्व पदार्थ श्रीगुरुसेवेसाठी अर्पण करतात.

त्याचप्रमाणे एक छोटी परंतु उत्तम सेवा म्हणजे झाडलोट! येथील एक कर्मचारी सचिन झाडे व त्यांचे सर्व कुटुंबिय दिवसाचे बारा तास झाडू सेवा करतात.

## सनई चौघड्याची सेवा

श्रीनृसिंहवाडी नयनरम्य परिसर! त्यात सात बहिणी एकमेकांत समरस होऊन श्रीगुरुंच्या चरणी विसावा घेत भक्तांना आनंद देतात. पहाटे पाच साडेपाचचा सुमार. पुजारी, भक्त मंडळी संगमात स्नान करुन श्रीमनोहर पादुका मंदिरात जमा झाली आहेत. श्रीगुरुंना जागविण्यासाठी अर्चक मंडळी विनम्र प्रार्थना करीत आहेत. त्याचबरोबर मधूर, शांतपणे भूपाळीची आळवलेली धून व त्यावर धरलेला ठेका कानावर पडू लागतो आणि श्रीगुरु डोळे किलकिले करुन प्रसन्नतेने शांत झोपेतून जागृत होऊन भक्तांना दर्शन देत आहेत. सारे काही अनुपम!

ही जादू आहे पहाटेच्या वातावरणाला अधिक मंगलमय करणाऱ्या सनई-चौघड्यांच्या सुरांची! साराच आनंदी आनंद! पहाटे साडे-पाच वाजल्यापासून श्री. अनिल गणपती पोवार (साळूंखे- नगारजी) आपल्या सनईच्या मंजूळ स्वराने श्रीगुरुंना शांत-प्रसन्न मनाने जागे करण्यासाठी तत्पर असतात. त्यांना साथ करण्यासाठी त्यांचाच चिरंजीव प्रसाद (वय वर्षे सोळा) नगारा वाजविण्याचे काम करतो. समजायला लागल्यापासून तो स्वत: नगारा वाजविण्यास शिकला. दोघा पिता-पुत्राची ही स्वरताल सेवा सकाळी ७ वाजेपर्यंत अखंड सुरु असते.

श्री. अनिल पोवार यांना नगारजी हे विशेष नाव प्राप्त झाले याचे कारण त्यांचे पणजोबा गोविंद पोवार व आजोबा शंकर पोवार हे नगारखान्यामध्ये नगारा वाजविण्याचे काम करीत असत. त्यांच्या कामावरुन त्यांना ''नगारजी'' हे विशेषनाम प्राप्त झाले. त्याकाळी श्री. अनिल यांचे पणजोबा गोविंद, शामराव, चंद्रकांत, बापू आणि दत्तात्रय इत्यादी देवाकडे नगारा वाजविण्याचे काम करीत. त्यांची नेमणूक पश्चिम महाराष्ट्र देवस्थानाने केली होती. समितीतर्फे सर्वांना मिळून ५६ एकर जमीन इनाम म्हणून देण्यात आली. परंतु पुढील काळात कुळ कायद्याप्रमाणे सर्व जमीन परत घेऊन नगारजींना प्रत्येकी रु. दोनशे पगार सुरु करण्यात आला. काही काळानंतर तो ही बंद झाला. त्यामुळे पाचजणांतील चौघे नगारजी

कामकाजासाठी परगावी गेले. पण एक पणजोबा आजोबा वाडीतच राहून आपली देवासमोरची सेवा चालू ठेवली.

श्री. अनिल पोवार यांचे आजोबा शंकर यांनी क्लॅरोनेट व ट्रम्पेट ही दोन वाद्ये प्रथमच नरसोबावाडीत आणली. ते स्वत: सर्कसमध्ये क्लॅरोनेट उत्तम व सफाईदारपणे वाजवित. त्यांनी त्यांची ही सेवा सतत ४० वर्षे केली. सकाळी साडेपाच ते सात सनई आणि रात्री साडेसात ते साडेनऊ क्लॅरोनेट सेवा होत असे. त्यांच्यानंतर श्री. अनिल पोवार देवाच्या सेवेत रुजू झाले. गेली १४ वर्षे निरंतर सेवा सुरु आहे. तेही सकाळी साडेपाच ते सात सनंई आणि रात्री साडे सात ते साडे नऊ क्लॅरोनेट वादन करतात. प्रचलित रागानुसार त्यांच्या सनई व क्लॅरोनेट मधून सुरावटीचा आविष्कार होत असतो.

गेल्या चार पिढ्या त्यांची ही वादन सेवा अव्याहतपणे सुरु आहे. श्री. अनिल पोवार हे चौथ्या पिढीतील आणि उगवती म्हणजे पाचवी पिढी म्हणजे त्यांचे दोन सुपुत्र चि. प्रसाद व चि. साईनाथ हे ही श्रीगुरुंच्या सेवेत दाखल झालेले आहेत. दोघेही अनेक वाद्ये म्हणजे क्लॅरोनेट, ट्रम्पेट, एकोने, सॅक्सोफोन, ड्रम, ऑक्टोपॅड इत्यादी सफाईदारपणे वाजवितात. ही सारी कृपा श्रीदत्तप्रभूंचीच आहे असे नम्रतापूर्वक श्री. अनिल पोवार सांगतात. श्रीगुरुंच्या चरणांची सेवा पहाटेपासून करावयास मिळते हेच आमचे परमभाग्य आहे असे ते समजतात.

## श्रीगुरुंच्या पालखी समोरील दिवटीची सेवा

श्रीनृसिंहवाडितील पुजारी कुळातील पूर्वजांनी व श्रीवासुदेवानंदसरस्वती म्हणजेच थोरले महाराजांनी घालून दिलेल्या नियमानुसार श्री मनोहर पादुकांची अर्थात श्रीगुरुंची पूजा-अर्चा, दैनंदिन धार्मिक विधी, अनेक उत्सव, सेवा पिढ्यानपिढ्या अखंडपणे चालू आहे. श्रीदत्तप्रभूंच्या दिवसभरातील ज्या अनेक सेवा आहेत त्यापैकी एक म्हणजे पालखी सेवा. सायंकाळी ७.३० वा. धूपारती घालून झाली की पुजारी मंडळींची सुमधूर आरती सेवा सुरु होते. आरती संपली की श्रीगुरुंची उत्सवमूर्ती पालखीत ठेवून पालखी सोहळा सुरु होतो. समोर काठी घेतलेले चोपदार, भालदार यांची सेवा, दिवटी सेवा श्रीगुरुंसमोरील पंचारती सेवा, चवरी इ. सर्व आबालवृध्द पुजारी मंडळींकडून वंशपरंपरेने अखंड चालू आहेत. त्यातील

दिवटीची सेवा श्री. शिवराम हरि पुजारी राजोपाध्ये यांच्यापासून सुरु झाली. चाळीस वर्षे त्यांनी ही सेवा भावभक्तीने केली. त्यांची परंपरा पुढे त्यांचेच बंधू वासुदेव यांनीही जवळजवळ पासष्ट वर्षे चालू ठेवली. त्यांच्या देहावसानंतर तो वसा श्री. शिवराम हरी पुजारी यांचे पुत्र बाळकृष्ण यांचेकडे आला.

आजतोपावेतो ती दिवटीची सेवा श्री. बाळकृष्ण अत्यानंदाने करीत आलेले आहेत. हे आपले जन्मोजन्मीचे सेवाव्रत आहे ही भावना मनी ठेवून रोज सायंकाळी ७.१० ते ९.१५ या वेळेत ते श्रीगुरुंच्या चरणी नतमस्तक होतात.

दिवसभरातील ज्या काही चांगल्या वाईट घटना, चुका कळत नकळत घडतात त्या सर्वांचा श्रीगुरुंच्या सेवेने परिहार होऊन मन शांत होते. असा त्यांचा नित्याचा अनुभव आहे.

## श्रीगुरुंचे चोपदार

सायंकाळी पालखी सोहळ्यात ''राजाधिराज श्रीसद्‌गुरुराज दत्तमहाराज'' अशी ललकारी कानी पडताच लक्ष जाते ते चांदीची काठी हाती धरलेल्या चोपदाराकडे! श्रीगुरुंच्या सेवे पैकी ही एक सेवा होय.

श्री. नागेश पुजारी (चोपदार) यांच्यापासून ही सेवा सुरु झाली. त्याची कहाणी अशी, ह्या घराण्यात पूर्वी वंश नव्हता. तेव्हा श्रीप्रभूंकडे नवस केला गेला, देवा पुत्रप्राप्ती झाल्यास वंशपरंपरागत चोपदारकीची सेवा करेन. ती विनंती प्रभूंच्या दरबारी मान्य होऊन त्या घराण्यात पुत्रप्राप्ती झाली आणि वचनाप्रमाणे चोपदारकीची सेवा सुरु झाली.

श्री. नागेश पुजारी यांचे नंतर गजानन पुजारी (चोपदार) यांनी ही सेवा पुढे चालू ठेवली. पुढे श्री. गजानन यांचा मुलगा नारायण यांच्याकडे हा वारसा आला. तत्पूर्वी एक घटना घडली; नारायण यांचे शिक्षण जूनी मॅट्रीक पर्यंत झालेले. तेही इंग्रजीतून! साहजिकच इंग्रजीवर प्रभूत्व असल्याने त्यांना मुंबई हायकोर्टात स्टेनो टायपिस्टची नोकरी मिळाली. एके दिवशी सुट्टी असल्याने ते नृसिंहवाडीस आपल्या घरी आले. त्यांच्या पणजोबांनी त्यांना जवळ घेऊन म्हटले, ''नाना, तू मुंबईची नोकरी सोडून दे. येथे देवाची नोकरी कर. त्यांच्यावर दृढ विश्वास ठेव, तुझे सर्व मंगलच होईल.'' नारायणाच्या मनी ही चांगली नोकरी सोडणे जीवावर आले होते. परंतु त्याक्षणी त्यांनी निर्णय घेतला आणि नोकरीचा राजीनामा दिला.

निष्ठेने भक्तीभावाने ते चोपदार सेवा  करु लागले. काही दिवसातच त्यांना नृसिंहवाडीतच ग्राम पंचायतीमध्ये ''ग्रामसेवक'' म्हणून नोकरी मिळाली. निष्ठेचे व प्रभूसेवेचे पहिले फळ त्यांना मिळाले. इतकेच नव्हे तर ही सेवा नारायणाच्या हातून सातत्याने व्हावी म्हणून ३० वर्षे एकाच ठिकाणी त्यांची नोकरी अबाधित राहिली. ही प्रभूंची पूर्णकृपा!

एक दिवस देवाकडे जाण्यास थोडा विलंब झाला असता त्यांचे वडिल त्यांना म्हणाले, ''नाना, मलाही एकदा देवाकडे जाण्यास उशीर झाला होता. मास्तर सारखे सांगत होते, दादा लवकर देवाकडे जा; देव पोशाख करुन तयार असतील. आपण त्यांना थांबवणे योग्य नाही. परंतु मी ते न ऐकल्यासारखे केले. इतक्यात एक तेजस्वी यती हाती दंड कमंडलू घेऊन दारात उभे राहिले आणि म्हणाले, ''चोपदार, देव तयार झाले आहेत. ताबडतोब मंदिरात या.'' मी त्यांना नमस्कार करण्यासाठी पुढे गेलो तर दारात त्यावेळी कोणीही नव्हते. मी तसाच धावत पळत मंदिरात गेलो तर देव पोशाख करुन तयार होते. पुजारी दिवटी, अबदागिरी घेऊन माझी वाट पाहात होते. माझे अंत:करण भरुन आले. देवच स्वत: येऊन भक्ताला सेवेला बोलावतात, त्याने मी मनोमन भारावून गेलो व तेव्हापासून सायंकाळी ७ वाजताच मंदिरात हजर होऊ लागलो.''

आपल्या तीर्थरुपांच्या मुखातून हा जीवंत दृष्टांत ऐकून नारायणाची या चोपदार सेवेवर पूर्ण श्रध्दा बसली. त्याच श्रध्देने ६० वर्षांहून अधिक काळ ते सेवा करीत आले. मध्यंतरीच्या काळात त्यांचे शुभमंगल होऊन त्यांना चार मुले झाली परंतु सारी दीड वर्षांची होऊन मृत्यू पावली. शनिवारचा तो दिवस होता. नित्याप्रमाणे श्रीगुरु पालखीत बसताच नारायणांनी मनोमन प्रभूंची प्रार्थना केली, देवा, मी न मागता मला आपण खूप काही प्रदान केलेत. परंतु आता यापुढे चोपदार सेवा करण्यास पोटी संतान नाही. आपली सेवा ही निरंतर राहो ही एकच इच्छा आपल्या चरणी आहे. प्रभूंनी त्यांची प्रार्थना मान्य केली व नारायणांचा वंश पुढे टिकून राहिला. त्यांना दोन पुत्ररत्नांचा लाभ झाला. आज हरि व बाळकृष्ण हे दोन्ही मुलगे हाती काठी घेऊन ललकारी देतात. इतकेच नव्हे तर त्यांचा नातू छोटा सर्वेश हा देखील अतिशय आवडीने काठी घेऊन ललकारी देतो. आज नारायण चोपदार अतिशय आनंदी व समाधानी आहेत. श्रीगुरुंच्या कृपेने आर्थिक सुबत्ता आहे. घरातील वातावरणही नित्य प्रसन्न आहे.

## श्रीनृसिंहवाडीतील वर्षभरातील उत्सव

### चैत्र शुध्द प्रतिपदा - गुढीपाडवा

या शुभ दिनी पहाटे श्रीगुरुंना महापूजा, मंगलस्नान होऊन सर्व सनकादिकांची पूजा, आरती केली जाते. श्रीगुरु पादुकांवर महान्यासपूर्वक एकादशीनी, पंचांग श्रवण केले जाते. पुढील दोन मास एकादशीला पवमानसूक्त अभिषेकपूर्वक सकृत रुद्रावर्तन असा मोठा उत्सव असतो.

### चैत्रशुध्द नवमी– श्रीराम नवमी

येथील राममंदिरात नऊ दिवस ''अध्यात्म रामायण'' पुराणाचे पठण केले जाते. रामनवमी दिवशी दुपारी बारा वाजता श्रीराम जन्मोत्सव साजरा करुन प्रभू चरणी गुलाल बुक्का उधळून नैवेद्य दाखविल्यावर आरती होते.

### चैत्र पौर्णिमा - श्रीहनुमान जयंती

या दिनी पहाटे सूर्योदय समयी श्रीहनुमंताच्या जन्मकाळ मुहूर्तावर पुराण वाचण करुन प्रसाद वाटला जातो. रात्री पालखीसमोर पाळणा व खेळणा ही गुरुभक्तांची पदे गायली जातात.

### चैत्र कृष्ण अमावास्या - श्री नारायण स्वामी पुण्यतिथी

परम पुज्य श्रीनारायण स्वामींचा पुण्यतिथी उत्सव चैत्र कृष्ण षष्ठीपासून सुरु होऊन अमावास्येला त्याची सांगता होते. षष्ठीपासून सतत दहा दिवस श्रीनारायण स्वामींचे चरित्र पुराण पठण केले जाते. अमावास्येला सोळा ब्राह्मणांची आराधना होते. या कालावधीत नित्य नैवेद्य व ब्राह्मण भोजन होऊन रात्री

किर्तनाचा कार्यक्रम असतो.

## चैत्र किंवा वैशाखातील संप्रोक्षण विधी

येथील मंदिराच्या सर्व परिसराबरोबर मंदिर स्वच्छ धुऊन स्पुष्टास्पष्ट दोष निवारण होण्यासाठी पुण्याहवाचनादि, होमहवन असा जवळपास चार तासांचा विधी संपन्न होतो.

## वैशाखातील संततधार महानुष्ठान

संततधार महानुष्ठान हे श्रीगुरुंना अतिशय प्रिय असून श्रीनृसिंहवाडीत या अनुष्ठानाचे फार महत्व आहे. कोणतेही संकट या अनुष्ठानाने त्वरीत नष्ट होते. सकाळी अकरा वाजता या महानुष्ठानास सुरुवात होते. त्यासाठी अकरा धारांचे मोठे चांदिचे पात्र असते. रोज दोनशे घागरी श्रीकृष्णवेणीमातेचे जल लागते. रोज चार या प्रमाणे महान्यासपूर्वक रुद्रैकादशिन्या केल्या जातात. त्याचप्रमाणे रात्री अकरा ते पहाटे पाच पर्यंत पवमान पंचसूक्ताच्या चार आवृत्या केल्या जातात. आठवे दिवशी संततधार महानुष्ठानाची सांगता होऊन समाराधना केली जाते.

वैशाख कृष्ण द्वादशीला श्रीगोपाळ स्वामींची पुण्यतिथी साजरी केली जाते.

जेष्ठ कृष्ण चतुर्दशीला श्रीरामचंद्र योगी यांचा पुण्यतिथी उत्सव थाटामाटात साजरा होतो.

## आषढ शुक्ल प्रतिपदा - श्रीटेंबेस्वामी महाराज पुण्यतिथी

परम पुज्य श्रीटेंबे स्वामी महाराज पुण्यतिथी उत्सव सात दिवस चालतो. जेष्ठ कृष्ण नवमी पासून या उत्सवाला सुरुवात होऊन आषाढ शुक्ल प्रतिपदेला समाप्ती होते. या कालावधीत गुरुचरित्र समश्लोकी पुराणाचे पठण होते. सतत सात दिवस भजन, किर्तन सोहळा होतो. सोळा ब्राह्मणांची आराधना चालू असते. अन्नदान, गावभोजन इत्यादी कार्यक्रम होत असतात.

## आषाढ शुक्ल पौर्णिमा - व्यास पूजन.

संन्याशी लोकांचा येथून चातुर्मास सुरु होतो. पूजाविधी करिता चार तास लागतात. संन्याशी या दिवसापासून भाद्रपद शुक्ल पौर्णिमेपर्यंत इतरत्र कोठेही न जाता एके ठिकाणी वास्तव्य करतात.

## दक्षिणद्वार स्नान सोहळा

ऐन पावसाळ्यात पाऊसाच्या अतिवृष्टीमुळे श्रीकृष्णावेणीला प्रतिवर्षी पूर येतो. तिची पातळी वाढू लागते. त्याचवेळी पंचगंगेलाही पूर येतो. त्यामुळे संगमाजवळ पाण्याचा मोठा फुगवटा तयार होऊन श्रीनृसिंहवाडीचे ''मनोहर पादुका मंदिर'' पाण्याखाली बुडते. काही वेळेला औदुंबरही पाण्याखाली जातो. पाण्याची पातळी वाढत असताना एका विशिष्ट वेळी श्रीगुरुंच्या पादुका पाण्याखाली जातात.

श्रीमनोहर पादुका मंदिराच्या उत्तर दरवाजातून श्रीकृष्णावेणीमाता आतल्या गाभाऱ्यात शिरते आणि श्रीगुरुंना जलाभिषेक करुन अत्यानंदाने दक्षिणद्वारातून स्वत: पवित्र होऊन बाहेर पडते. त्याप्रसंगी तिच्या प्रवाहात स्नान करणे यालाच ''दक्षिणद्वार स्नान सोहळा '' असे म्हटले जाते.

श्रीगुरुंनी स्नान केलेल्या श्रीकृष्णावेणी प्रवाहात आपण स्नान करणे ही परमानंदाची अनुभूती मिळते. श्रीकृष्णेची पातळी वाढत चालली आहे म्हणजेच दक्षिणद्वार स्नान सोहळ्याची बातमी पंचक्रोशीत कळविली गेली की पंचक्रोशीत सारी भक्त मंडळी संगमावर गर्दी करतात आणि त्या पवित्र क्षणाचा, पर्वणीचा आनंद पदरी पाडून घेतात.

## श्रावण शुक्ल प्रतिपदा ते अमावस्या

संपूर्ण श्रावण मास श्रीप्रभू दत्तात्रेय चरणी महान्यासपूर्वक रुद्रैकादशिनी अनुष्ठान चालू असते.

## श्रावणी श्रावण पौर्णिमा

या मंगलदिनी सर्व ब्रह्मवृंद श्रावणी कर्म करतात अर्थात आपले यज्ञोपवित बदलतात. त्यानिमित्त होम-हवन इत्यादी तीन तासांचा विधी असतो.

## श्रावण कृष्ण पंचमी - श्रीटेंबेस्वामींची जयंती

या दिवशी स्वामींच्या पादुकांवर पवमानसूक्ताचा अभिषेक केला जातो. महापूजा बांधली जाते. सायंकाळी ५ वाजता जन्मकाळ साजरा होऊन पुराण पठण होऊन प्रसादाचे वितरण होते. रात्री भजन-किर्तनादी कार्यक्रम होतात.

## भाद्रपद शुक्ल चतुर्थी - श्रीपादश्रीवल्लभ जयंती.

सकाळी सूर्योदयाला श्रीपादश्रीवल्लभांची जयंती साजरी होते. त्यावेळेस पाळणा, खेळणा ही पदे गायली जातात. त्यानंतर नऊ वाजता श्रीगुरुचरणी अकरा ब्राह्मण महारुद्राभिषेक करुन महापूजा केली जाते. महापूजेनंतर समाराधना होते.

## अश्विन शुक्ल प्रतिपदा - घटस्थापना, नवरात्रारंभ

प्रतिपदेच्या पहाटे श्रीगुरुंची उत्सव मूर्ती व श्रीचरणी महापूजा, मंगलस्नान होऊन महानैवेद्याचे आयोजन असते. त्याचप्रमाणे सर्व परिवार देवतांना मंगलस्नान घालून आरत्या केल्या जातात. असा दहा दिवसांचा उत्सव साजरा होतो.

## अश्विन शुक्ल दशमी (विजया दशमी) - दसऱ्याचे शिलंगण

या सुमंगल दिनी सायंकाळी पाच वाजता श्रीगुरुंची उत्सव मूर्ती शिबिकारुढ (पालखीत) होऊन सीमोल्लंघनास निघते. गावातील सर्व स्त्रीयांना श्रीगुरुंना ओवाळण्याचा मान मिळतो. याबाबत घडलेली घटना अशी;

इसवी सन १८व्या शतकाच्या प्रारंभी श्री. राणोजी देशमुख, खोची या गावाहून श्रीनृसिंहवाडीमध्ये येऊन राहिले. हे मुळचे मुंगी पैठणचे देशमुख. परंतु चंद्रराव मोरेंनी छत्रपती शिवाजी महाराजांशी केलेला द्रोह सहन न झाल्यामुळे ते पाडळी परिसरात येऊन राहिले. पुढे त्यांना तारगावची पाटीलकी मिळाली. त्यानंतर ते खोची गावी जाऊन राहिले. त्यांचा पिंडच देवधर्माचा असल्याने त्यांनी श्रीगुरुंच्या चरणी श्रीनृसिंहवाडीत येऊन राहण्याचा निर्णय घेतला. राणोजींना सुभानजी नावाचा पुत्र होता. त्याच्या मुलाचे नाव बाजीराव! तो काळ होता इ.स. १७४० चा! बाजीरावांना पुढे बाबाजी, जोती आणि नागोजी असे तीन पुत्र झाले. हे तिघेही कर्तबगार आणि शूर असे पुत्र होते. थोरला मुलगा बाबाजीला परशुराम, दादोबा व रामचंद्र असे तीन मुलगे होते. या पाचही पिढ्यातील सर्वांचीच श्रीदत्तप्रभूंवर अपार श्रध्दा होती. इतकेच नव्हे तर वाडीमधील सर्व पुजारी व ब्राह्मणवर्गाचा त्यांना नितांत आदर होता.

परंतु म्हणतात ना, जेथे चांगले आहे तेथे वाईट देखील आहेच. समाजात सात्विक, भाविक लोकांबरोबरच, नास्तिक, विकृत आणि पाखंडी वृत्तीचीही माणसे नांदत असतात. येथील आसपासच्या परिसरातही अशी दृष्ट, पाखंडी माणसे पुजाऱ्यांच्या मनात दहशतीचे काम करीत होती. लहान-मोठ्या चोऱ्या, दंगे वारंवार घडवून वातावरण अस्थिर करण्याचे काम करीत. सणासुदीच्या काळी देवदर्शनाला येणाऱ्या स्त्रीयांची छेड काढण्यासाठी मागेपुढे पाहात नसत. एका दसऱ्याला शिलांगणाच्या दिवशी तो प्रसंग घडला किंबहूना श्रीगुरुंचीच ती लीला असावी;

संगमतीरावर शमीवृक्षाच्या पूजेची, पालखीची तयारी सुरु झाली होती. त्याचवेळी कुरुंदवाडच्या गुंडांची हल्ल्याची खबर मिळाली. पुजारी मंडळी या बातमीने अस्वस्थ झाली. तत्पूर्वी खोचरे बंधूंनाही ही कुणकुण लागली होती. श्रीबाबाजी खोचरे यांचे तीन पराक्रमी, निर्भय पुत्र गुंडांचा नि:पात करण्यास पुढे

सरसावले. त्यांनी पुजारी मंडळींना विश्वास देऊन निर्भय बनविले आणि पूजा सुरु झाली. इतक्यात कुरुंदवाडचे गुंड हाती लाठ्या, काठ्या, तलवारी घेऊन संगमतीरावर दाखल झाले. तोच एका बाजूने दादोबा व रामा खोचरेंनी त्यांच्यावर हल्ला चढविला. तर दुसऱ्या बाजूने परशुराम खोचरे आपली मजबूत काठी विजेच्या वेगाने फिरवित गुंडांवर चालून गेले. अनपेक्षित झालेल्या हल्ल्याने गुंडांची त्रेधा उडाली. त्यांनी खरपूस मार खाऊन कसाबसा पळ काढला. दहशतीचे सावट दूर झाले. शमीपूजन होऊन शिलंगणाचा कार्यक्रम आनंदाने पार पडला. पुजारी मंडळींनी अपार कृतज्ञतेने खोचरे बंधूंना श्रीगुरुंचा नारळ प्रसाद दिला.

सर्व पुजाऱ्यांच्या मनातील भीती दूर होऊन दहशतीच्या वातावरणाचे सावट कमी झाले. त्याच्या पुढील वर्षी खोचरे बंधूंनी दसऱ्याच्या चार दिवस आधी शिलंगण स्थानी साफसफाई केली. सुंदर मांडव बांधला. त्यांच्या सुवासिनींनी सडामार्जन करुन रांगोळ्या घातल्या. शिलंगण उत्तमतऱ्हेने पार पडले खोचरे बंधूंच्या तेथील वावराने गुंडांनी पाठ फिरविली. पुजाऱ्यांनी खोचरेंना नारळ प्रसाद दिले. तेथून मग एक प्रथाच सुरु झाली. विजया दशमी दिवसी शिलंगणाचे स्थान स्वच्छ करायचे, मांडव उभा करायचा, आपट्याच्या डहाळ्या आणून व्यवस्थित रचून ठेवायच्या आणि दंगाधोपा होणार नाही याची पूर्ण काळजी घ्यायची व सोने लुटण्याचा कार्यक्रम घडवायचा. खोचरे बंधूंच्या निरपेक्ष सेवेची जाणीव ठेवून शमीपूजनानंतर श्रीगुरुंना ओवाळण्याचा पहिला मान खोचरे परिवारातील सुवासिनींना मिळू लागला. त्यांना नारळ प्रसाद मिळू लागला.

आजही श्रीनृसिंहवाडीतील खोचरे पिढीतील ४०-५० कर्ते लोक राहात आहेत. दरवर्षी उत्साहाने, आनंदाने शिलंगणाची तयारी करतात. परिवारातच वर्गणी काढून मोठा वैभवशाली शामियाना उभा करतात. परगावी वास्तव्यास असलेली खोचरे मंडळी चार दिवस सुट्टी घेऊन श्रीनृसिंहवाडी गाठतात. नि:स्वार्थी बुध्दीने सेवा करतात. दसरा सण आनंदात पार पाडण्यात मोलाची मदत करतात.

त्यांच्या ह्या निरपेक्ष सेवेची श्रीगुरुंच्या दरबारी नोंद होऊन त्यांना सदासर्वदा श्रीगुरुंची कृपा प्राप्त झाली आहे.

## अश्विन कृष्ण द्वादशी - गुरुद्वादशी.

या दिनी श्रीगुरु श्रीपादश्रीवल्लभांनी निजागमन केले. या दिवशी मंदिरात मोकाशी, इनामदार इत्यादी मंडळी श्रीगुरुंजवळ महापूजा करतात. रात्री पालखी असते. त्यानंतर रात्रभर जागरण केले जाते. यावेळी श्रीगुरुंची उत्सव मूर्ती मंडपातच ठेवली जाते. सकाळी आरती नंतर उत्सवमूर्ती श्रीनारायण स्वामींच्या मंदिरात ठेवली जाऊन महापूजा होते.

## अश्विन कृष्ण पंचमी ते कार्तिक शुक्ल पंचमी - दिपावली.

या सात दिवसांत श्रीगुरुंची महापूजा, मंगलस्नान झाल्यावर सनकादिकांच्या नित्य आरत्या होतात. गावातील सर्व स्त्रीयांना श्रीगुरुंची आरती करण्यास मिळते.

## कार्तिक शुक्ल द्वादशी - तुलसी विवाह.

नृसिंहवाडीतील हा एक सुंदर सोहळा असतो. या दिवशी श्रीगुरुंचा तुळशीशी विवाह होतो. जवळजवळ तीन तासांचा, भव्य स्वरुपात हा विवाह विधी पार पाडला जातो. संपूर्ण गावातील स्त्री-पुरुष या कार्यक्रमास हजेरी लावतात.

## मार्गशीर्ष पौर्णिमा - श्रीदत्त जयंती.

मार्गशीर्ष सप्तमी ते पौर्णिमा असा दहा दिवसांचा हा उत्सव असतो. दत्त जयंती दिवशी संध्याकाळी पाच वाजता जन्मोत्सव साजरा होतो. भक्तमंडळीची या उत्सवास तोबा गर्दी उसळलेली असते. रात्री भजन, किर्तन, पुराण इत्यादी कार्यक्रम होतात. दुसरे दिवशी श्रीगुरुंना जागरण असते.

## मार्गशीर्ष एकादशी ते पौष शुक्ल द्वितिया - श्रीनृसिंहसरस्वती जन्मोत्सव.

या सप्ताहात श्रीगुरुंच्या चरणांवर महान्यासपूर्वक रुद्रैकादशिनी होते. हे नित्य सात दिवस चालते. दुपारी महापूजा होते. संध्याकाळी चार वाजता पुराण पठण होते. सायंकाळी ५ वाजता किर्तनाचा कार्यक्रम असतो आणि रात्री ९ वाजता प्रवचन होते.

पौष शु. द्वितियेला दुपारी बारा वाजता श्रीगुरुंचा जन्मोत्सव साजरा केला जातो. त्यानंतर पुराण पठण व महापूजा होऊन प्रसाद दिला जातो.

## माघ शुक्ल सप्तमी ते कृष्ण प्रतिपदा - श्रीकृष्णावेणी उत्सव.

माघ शुक्ल सप्तमी ते माघ कृष्ण प्रतिपदेपर्यंत दहा दिवस श्रीगुरुंच्या सान्निध्यात श्रीकृष्णावेणीचा उत्सव संपन्न होतो. हा उत्सव सुरु होण्यासाठी एक ऐतिहासिक घटना कारणीभूत ठरली.

शिवरायांनी तोरणा किल्ला जिंकून हिंदवी स्वराज्याचे तोरण बांधले होते. अनेक तरणेबांड शूर, पराक्रमी मावळे शिवबांच्या सोबत होते. स्वराज्य स्थापना करण्याची उमेद त्यांच्यात निर्माण झाली होती. सैन्यांची, शस्त्रांची व इतर साधनांची जुळवणूक जोरात सुरु असतानाच महाबलाढ्य अफझलखानाच्या रुपाने शिवबांवर पहिला घाला आला. त्यावेळी ते प्रतापगडावर होते.

अफझलखान महाराष्ट्रात घुसला तो थेट वाईलाच येऊन धडकला आणि तेथेच ठाण मांडून बसला. त्याने आपल्या सैन्याला हुकूम देऊन सर्वत्र जाळपोळ व लुटालुट सुरु केली. गोरगरीब, सामान्य लोकांची अफझलखानाच्या सैन्याने कत्तल सुरु केली. शिवरायांच्या हिंदवी स्वराज्यावर एक महान संकट ओढावलेले होते. सर्वसामान्यांचे जगणे मुश्कील होऊन घराबाहेर पडून कामकाज करणेही धोक्याचे ठरले होते.

त्यावेळी वाई परिसरात शेंडेशास्त्री नामक एक विद्वान व तेजस्वी पंडित वास्तव्य करुन होते. एक महान सत्पुरुष आणि अत्यंत हुशार पंडित अशी त्यांची सर्वदूर ख्याती होती. वेदमूर्ती केदारभट्ट बिन नरसिंहभट्ट शेंडे असे त्यांचे संपूर्ण नाव! खानाची बेबंदशाही त्यांच्या कानी पडली. त्याच्या अत्याचारांनी

त्यांचे मन व्याकूळ झाले. इतक्यात शिवाजीराजे व अफझलखान यांच्या भेटीची वार्ता त्यांच्या कानी पडली. या बातमीने सारी प्रजा आणखी भयभीत झाली. कोठे तो महाबलाढ्य खान आणि कोठे लहान वयातील शिवबा! सारी प्रजा चिंतातूर होऊन गेली होती. अशावेळी अत्यंत संयमाने, दृढ विश्वासाने, भक्तिभावाने शेंडेशास्त्री कृष्णातीरी एकांतात बसले आणि तिची मन:पूर्वक प्रार्थना करुन उग्र तपश्चर्येला सुरुवात केली. त्यांनी कृष्णावेणीमाईला साकडे घातले, जर आमच्या शिवबाचा विजय होऊन अफझलखान मारला गेला आणि रयतेची या घोर संकटातून मुक्तता झाली, तर हे श्रीकृष्णावेणीमाते आम्ही तुझी मनोभावे नित्य नियमाने पूजा करु. दरवर्षी तुझा उत्सव साजरा करुन तुझा योग्य सन्मान करु.

शेंडेशास्त्रींच्या तपश्चर्येला उत्तम फळ मिळाले. शिवरायांनी अफझलखानाचा कोथळा बाहेर काढला. अफझलखान मारला गेला. शिवरायांनी महान विजय मिळविला.

त्यावेळेपासून श्रीकृष्णावेणीमातेचा अर्थात तिच्या प्रवाहातील विविध तीरांवर उत्सव सुरु झाला. प्रत्येक ठिकाणी अलग अलग तिथीनुसार उत्सव साजरा होतो. वाई या स्थानी श्रीकृष्णावेणीचे सात घाट आहेत. त्या सर्वांवर वेगवेगळ्या तिथीनुसार उत्सव केला जातो. माघ शुध्द प्रतिपदा ते फाल्गुन शुक्ल द्वादशीपर्यंत म्हणजे जवळपास दीड महिना श्रीकृष्णावेणीचा उत्सव चालतो. वाईबरोबरच माहुली, कराड, औदुंबर, नरसिंगपूर, नृसिंहवाडी, अमरापूर, उगार, कुरवपूर इत्यादी अनेक तीर्थक्षेत्री या उत्सवाचे आयोजन असते. म्हणूनच याला ''श्रीकृष्णावेणी उत्सव'' म्हटले जाते.

श्रीनृसिंहवाडीत हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. माघ शुक्ल सप्तमी ते कृष्ण प्रतिपदा असा दहा दिवस श्रीगुरुंच्या सान्निध्यात हा उत्सव संपन्न होतो. श्रीनृसिंहवाडीत याचे स्वरुप अगदी विशेष आहे. माघ शुक्ल सप्तमीला उदकशांती करुन श्रीकृष्णावेणीच्या मूर्तीची स्थापना करुन तिला अनेक आभूषणांनी नटविले जाते. विविध पताकांनी, सुंगधी फुलांनी सजविलेला मोठा मंडप उभारला जातो. रांगोळ्यांनी, फुलांच्या माळांनी मोठी आरास केली जाते. सारा परिसर सुगंधीत आणि सुशोभीत होतो. रोज सकाळच्या सत्रात वेदपठण, पारायणे केली जातात. दुपारी कृष्णालहरी पुराण, गायन होते. त्यामध्ये संगीत, नृत्य, वादन होते. सायंकाळी भजन, किर्तन इत्यादी धार्मिक कार्यक्रम होतात. रोज श्रीकृष्णावेणीचे पूजन करुन आरत्या केल्या जातात. तिची खणा नारळाने ओटी भरुन तिला साडी नेसवली. जाते. शेवटच्या दिवशी श्रीकृष्णावेणी मातेची मूर्ती रथात बसवून संपूर्ण गावात मिरवणूक

काढतात व त्यानंतर विसर्जन करतात. महाप्रसाद, भंडारा घातला जातो. एक नयनरम्य, अद्‌भूत असा हा श्रीनृसिंहवाडीतील श्रीकृष्णावेणी उत्सव मन व चित्त प्रसन्न करुन आध्यात्मिक उन्नती साध्य करुन देतो.

## माघ शुक्ल पौर्णिमा ते कृष्ण पंचमी - गुरुप्रतिपदा

सहा दिवसांचा श्रीनृसिंहवाडीतील सर्वात मोठा आणि महत्वाचा हा उत्सव! या काळात श्रीगुरुपादुकांच्या मागील बाजूस श्रीउत्सव मूर्तीचे वास्तव्य असते. सहा दिवस रात्री महापूजा व पालखी असते. हे सहा दिवस श्रीगुरुंना जागरण असते. वर्षभर भक्तमंडळींनी केलेल्या कामाचा. तपशील यावेळी सादर केला जातो. पंचमी दिवशी गोपाळकाला म्हणून दहिहंडीचे आयोजन केले जाते. षष्ठीला ललीत होऊन प्रत्येकाला श्रीफळ प्रसाद म्हणून दिला जातो.

महाशिवरात्रीस श्रीनृसिंहवाडीला मोठी यात्रा भरते. फाल्गुन कृष्ण सप्तमीला श्रीकाशीकर स्वामी महाराजांची पुण्यतिथी साजरी होते. असे हे नृसिंहवाडीतील श्रीगुरुंच्या राजधानीतील वार्षिक उत्सव, कार्यक्रम आनंदाने साजरे केले जातात. दर बारा वर्षांनी कन्यागत महापर्वकाळ येतो. तो पर्वकाळ येथे एक वर्षभर साजरा केला जातो.



## सन २००४ कन्यागत महापर्वकाळ - सद्‌गुरु श्री भाऊ महाराजांचे अभ्यंग स्नान

सर्व सामान्यतः असं मानलं जाते, देह नष्ट होतो परंतु आत्मा नष्ट होत नाही. आत्म्याचं आणि मानवी जीवनावरील प्रत्येक समाधानाचं सूत्र अथवा बांधिलकी तीर्थक्षेत्रांनी केलेली असते. तिथी, वेळ, नक्षत्र आदींचा तीर्थक्षेत्रांवर होणारा समन्वय, तेथील परमेश्वरी अधिष्ठान, तेथे होऊन गेलेल्या, नांदणाऱ्या संतांच्या, सत्पुरुषांच्या, योग्यांच्या उपासनेच्या, तपश्चर्येच्या नांदत असलेल्या लहरी, पतःसामर्थ्य मानवाचे हित करुन त्याला सन्मार्गाला लावतात.

म्हणून देवतांच्या, पवित्र नद्यांच्या सहवासाने पवित्र झालेल्या तीर्थक्षेत्राला जाणे म्हणजेच आपल्या जीवनात पुण्य पदरी पाडून घेणे होय! तीर्थक्षेत्रे ही आपल्या पूर्वजांत आणि आपल्यात संपर्क साधून देतात. धर्माला अनुसरुन तेथे पूर्वजांना सद्‌गती प्राप्तीसाठी प्रार्थना केली जाते. विविध धर्मविधी केल्या जातात. मातृपितृऋण फेडले जाते. म्हणून तीर्थांचे महात्म्य तीर्थक्षेत्रावरच असतं असं म्हटलं जाते. कारण तेथील पवित्र लहरी मानवी देहातून आत्म्याकडे वाहत जातात.


कन्यागत महापर्वकाळ हा त्यासाठीच श्रेष्ठ मानला जातो आणि ही पर्वणी वर्षभरासाठी श्रीनृसिंहवाडीत श्रीकृष्णावेणी-पंचगंगा संगमावर येते. अर्थात बारा वर्षांतून एकदा, गुरुचा कन्या राशीत प्रवेश होतो तेव्हा!

अशा पुण्यपवित्र, श्रीगुरुंच्या झालेल्या वास्तव्याच्या क्षेत्री सद्‌गुरु श्री भाऊ महाराजांनी ''श्री भानुदास प्रतिष्ठान'' मठाची उभारणी केली. अर्थात फार कमी वेळात त्याचे आयोजन झाले. कारण कन्यागत महापर्वकाळ अगदी लवकरच सुरु होणार होता. त्यासाठी फक्त तळमजला अर्थात सभागृह, काही स्वच्छतागृह बांधून घेतली गेली. कन्यागत महापर्वकाळाचा योग होता २७ऑगस्टला ऑगस्ट, २००४ ला! राहण्यासाठी जागाही तशी अपुरीच होती. तरीही सद्‌गुरु भाऊ महाराजांसह शेकडो शिष्य आपल्या स्वतःच्या जागेत येऊन राहिले होते. भाऊ महाराज इतके आनंदी होते की जी काही भक्त-शिष्य मंडळी मागाहून आली त्या सर्वांचे स्वागत करण्यासाठी श्रीनृसिंहवाडीतील बस आगारात स्वतः उपस्थित राहून सर्वांना आदराने आपल्या हक्काच्या मठात घेऊन आले.

दि. २७ ऑगस्ट २००४! संपूर्ण गावात सुशोभित मंडप आणि विद्युत रोषणाई केली होती. दारोदारी अतिशय सुंदर आणि मनमोहक रांगोळ्या काढल्या होत्या. सारा परिसर झळाळून निघाला होता. कारण बारा वर्षांतून एकदा श्रीगुरु अभ्यंग स्नानास वाडी बाहेर पडत असतात. साक्षात श्रीदत्तप्रभू आपल्या दारी येणार, मग त्यांची पूजा, ओवाळणी करण्याचे भाग्य कोण बरे सोडील? सर्वांना प्रतिक्षा लागून राहिली होती ती शिबिकारोहणाची!

दुपारी चार वाजता श्रीगुरुंची स्वारी अतिव प्रसन्नतेने सुवासिक फुलांनी सजविलेल्या पालखीत आरुढ झाली. साऱ्या आसमंतात एकच नाद दुमदुमला, ''अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त.'' श्रीगुरु आपल्या भक्तांसोबत निघाले. भक्तांच्या प्रेमाने न्हाऊन निघत श्रीगुरु पहाटे पहाटे शुक्लतीर्थांवर पोहोचले. श्रीकृष्णावेणी माता प्रतिक्षा करीत होती. श्रीगुरुंच्या आगमनाने तिला आनंदाने उचंबळून आले त्याचवेळी भागिरथी गंगा आपल्यासोबत साडेतीन कोटी तीर्थांना घेऊन श्रीकृष्णावेणीत अवतरली. दोघी बहिणी एकमेकांना कडकडून भेटल्या. त्यांनी श्रीगुरुंना शरण जाऊन भक्तिभावाने ''स्नानास येण्याची नम्रपूर्वक विनंती केली.'' प्रभूंनी सर्वांना आशीर्वाद दिले आणि स्नानास उतरताच श्रीकृष्णावेणी मातेच्या प्रवाहावर पितांबर पसरल्याचा भास होत होता. दोघींनीही श्रीगुरुंना आपादमस्तक अभ्यंग स्नान घातले.

त्याचवेळी इकडे मनोहर पादुका मंदिराच्या घाटावर हजारो भाविक श्रीगुरुंच्या अभ्यंग स्नानाची प्रतिक्षा करीत असतानाच आपल्या शेकडो शिष्यांसह सद्‌गुरु श्री भाऊ महाराजांचे आगमन झाल. सर्व भक्त-शिष्य मंडळींनी श्रीगुरुंनी स्नान केलेल्या श्रीकृष्णावेणी-गंगा मातेच्या पवित्र प्रवाहात भाऊ महाराजांना अभ्यंग स्नान घातले. सर्वांचे स्नान उरकताच भाऊ महाराजांनी ते पवित्र जल एका रुपेरी कलशात घेऊन मठामध्ये परतले. सर्व शिष्यांना-भक्तांना थोडे थोडे तीर्थ प्राशन करण्यास देऊन सर्वांवर प्रोक्षण केले. राहिलेले तीर्थ दहागांव, वाशिंद येथील लहान-थोर भक्त-शिष्य मंडळींसाठी घेऊन आले. तेव्हाचा तो अभूतपूर्व सोहळा सर्वांनी आपल्या ''भक्तवत्सल'' सद्‌गुरुंसोबत अनुभवला.



## सन २०१६ - गुरुवर्य काकाश्रींसोबत भक्तांचे अभ्यंगस्नान

पुन्हा बारा वर्षांनी म्हणजे ऑगस्ट २०१६ मधील कन्यागत महापर्वकाळ सद्गुरु भाऊ महाराज शिष्य परिवाराला अत्यानंद देऊन गेला. या वर्षी १२ ऑगस्ट २०१६ ला गुरुचा कन्याराशीत प्रवेश झाला आणि कन्यागत महापर्वकाळास सुरुवात झाली. तत्पूर्वी आदल्या दिवशी दुपारी दोन वाजता श्रीगुरु पालखीत विराजमान झाले. संपूर्ण गाव विविध तऱ्हेच्या सुशोभित मांडवांनी, विद्युत रोषणाईने, सुबक, नयनरम्य रांगोळ्यांनी झळाळून गेले होते. श्रीगुरुंच्या पालखीच्या दुतर्फा पुजारी मंडळी शुचिर्भूत अवस्थेत, शुभ्र धोतर-उपरणे धारण करुन अत्यानंदात आरत्या, पदे, त्रिपदी, नामस्मरण करीत चालली होती. श्रीगुरु हळूवार प्रत्येक घरासमोर थांबून तेथील कुटुंबाकडून पूजा, ओवाळणी करुन घेत होते. कोठेही कसला गोंधळ-गडबड नाही. प्रत्येक जण शांतपणे, भक्तिभावाने श्रीगुरुंची सेवा करीत होता. श्रीगुरुंच्या वाटेवर भरजरी वस्त्रे पांघरली गेली होती. त्यापुढे धुपारतीची मोठी गाडी चालली होती. त्यातून अविरत सुगंध संपूर्ण वातावरण मंगलमय करीत होता. त्यापुढे लेझीम पथके होती. सारे आपली उत्कृष्ट कला दाखवित श्रीगुरुंच्या चरणी आपली सेवा अर्पण करीत होते. या पथकांच्या पुढे ढोलताशे निनादत होते. यातील कलाकार आनंदाने बेभान होऊन ढोलताशांचे अप्रतिम प्रात्याक्षिक श्रीगुरुंच्या चरणी सादर करीत होते. या ढोल-ताशांच्या तालावर अनेक सुवासिनी फुगड्या घालीत होत्या. सर्वत्र आनंदीआनंद भरुन उरला होता. त्याहीपुढे आणखी एक नयनरम्य दृश्य डोळ्यांना दिसत होते. एक पांढरा शुभ्र नटलेला घोडा सर्वांना आकर्षून घेत होता. त्याचा मास्तर त्याला जसा इशारा करीत होता त्याप्रमाणे तो घोडा सुंदर नृत्य करीत होता. एवढेच काय एका छोट्या पाटावर उभा राहून आपल्या नृत्याची झलक दाखवित होता. सर्व काही डोळ्यांना सुखावणारे होते. प्रत्येक भाविकाचे रोम रोम भक्तिभावाने फुलून गेले होते. कारण श्रीगुरु आपल्या सर्व भक्तांमध्ये समाविष्ट होऊन सर्वांवर कृपादृष्टी टाकीत भक्तिभावात डुंबवित परमानंद बहाल करीत होते.

हजारो भक्तांनी श्रीनृसिंहवाडी फुलून गेली होती. गुरुवर्य काकाश्री आपल्या असंख्य भक्तमंडळींसह श्रीगुरुंच्या दर्शनास गेले. श्रीरुक्के पुजारी यांच्या घरी सर्वांना श्रीगुरुंच्या दर्शनाचे आमंत्रण होते. श्रीगुरु तेथे येताच श्रीकाकाश्रींनी त्यांचे अपार भक्ती भावाने पूजन केले, ओवाळणी केली. त्यांच्यानंतर सर्वांनी

श्रीगुरुंचे दर्शन घेऊन पूजन केले. सुवासिनींनी त्यांना भावपूर्ण ओवाळले आणि सारे मठात परतले.

अशातऱ्हेने श्रीगुरु कन्यागत महापर्वकाळ सुरु होता होता शुक्लतीर्थांवर येऊन पोहोचले. त्यांच्या आगमनाने हर्षभरीत होऊन आपल्या लहान बहिणीला गंगेला सोबत घेऊन श्रीकृष्णावेणी मातेने श्रीगुरुंना अभ्यंग स्नान घातले. शुक्तीर्थाचा परिसर विविध तऱ्हेने सुशोभित केला गेला होता. सर्वत्र सुवासिक फुलांची सजावट केली होती. फुलांचा मोर तर डोळ्यात किती साठवून ठेवावा अशी गत बघणाऱ्यांची झाली होती. फुलांची गाय व वासरु हे तर विशेष आकर्षण ठरले होते. थोडक्यात जिकडे पहावे तिकडे नेत्रसुख मिळत होते. मन शांत, निवांत व प्रसन्न होत होते.

इकडे श्रीभानुदास प्रतिष्ठान, सद्‌गुरु श्री भाऊ महाराजांच्या मठात सर्व भक्त शिष्य मंडळी अभ्यंग स्नानासाठी आतुरली होती. प्रतिक्षा होती गुरुवर्य काकाश्रींची. इतक्यात काकाश्रींचे आगमन झाले. श्रीदत्तप्रभूंचा व भाऊ महाराजांचा जयघोष झाला. श्रीकाकाश्रींनी एका रुपेरी तबकात सद्‌गुरु भाऊ महाराजांच्या पादुका घेतल्या आणि आपल्या शेकडो भक्तांसोबत मनोहर पादुका संगमातीरी येऊन पोहोचले. श्रीकृष्णावेणी-गंगा मातेंना विनम्र अभिवादन करुन श्रीगुरुंनी केलेल्या स्नान प्रवाहात काकाश्रींनी भाऊ महाराजांच्या पादुकांना श्रीगंगामंत्र उच्चारुन अभ्यंग स्नान घातले. सर्वांनी सद्‌गुरुंचा जयजयकार करुन काकाश्रींना अभ्यंग स्नान घातले. सौ. काकूंनी रुपेरी कलशात श्रीकृष्णावेणी-गंगेचे पवित्र जल घेऊन तो कलश आपल्या मस्तकी ठेवून सर्व मंडळींसह मठात परतले. मठात आल्यानंतर सद्‌गुरु भाऊ महाराजांप्रमाणेच काकाश्रींनी सर्वांना तीर्थ प्राशन करण्यास देऊन प्रोक्षण केले. हा आनंदी सोहळा पार पडल्यानंतर भाऊ महाराजांच्या शिष्यांनी ( जे रुद्र शिकले आहेत) भाऊंच्या चांदीच्या पादुकांवर रुद्राभिषेक सोहळा संपन्न केला. सर्व भक्त-शिष्य मंडळींना अभिषेकाचा लाभ प्राप्त झाला. या सोहळ्यास मागील कन्यागत महापर्वकाळात सद्‌गुरु भाऊ महाराजांसोबत अभ्यंग स्नान केलेले अनेक शिष्य उपस्थित होते. त्यामुळे त्यांचाही आनंद द्विगुणीत झाला होता. त्यांनाही काकाश्रींसोबत अभ्यंग स्नानाचे भाग्य लाभले.

## कन्यागत महापर्वकाळातील धार्मिक विधी

दर बारा वर्षांनी येणारा कन्यागत महापर्वकाळ हा पुण्यप्रद आहे. याकाळात कृष्णातीरी स्नान, धार्मिक विधी करणे महापुण्यदायी आहे. त्यातही श्रीनृसिंहवाडी ही तर श्रीप्रभू दत्तात्रेयांची राजधानी! अनेक तपसव्यांची, श्रीगुरुंची तपोभूमी! श्रीकृष्णावेणी-पंचगंगेचे दैवी मिलन. अशा पुण्यपावन नगरीत आपल्या जेष्ठ बहिणीला आणि श्रीगुरुंना अभ्यंग स्नान घालण्यासाठी श्रीगंगा येते. म्हणून या पुण्यक्षेत्री स्नानादी, धार्मिक विधी करणे महत्वाचे मानले जाते. यामुळे कायिक-वाचिक व मानसिक सर्व पापांतून सुटका होते आणि पुण्यसंचयही होतो. सात्विक विचार व चैतन्य लाभून मन शुध्द होते. याचे आणखी एक कारण म्हणजे श्रीगंगा आपल्या सोबत भरतखंडातील साडेतीन कोटी तीर्थेही घेऊन आलेली असते.

## हे धार्मिक विधी कोणते?

श्रीकृष्णावेणी संगमावर मुंडन, क्षौर, हिरण्यश्राध्द इत्यादी विधी या पर्वणीत केले असता मानवाच्या पितरांचा उध्दार होतो. त्याशिवाय आपल्याला अनुकूल असे काही धार्मिक विधीही करता येतात त्याने निरोगी, उत्तम आरोग्य, पूर्णायुष्य, ऐश्वर्य आणि सर्व प्रकारचे मनोच्छित फल प्राप्त होते.

## श्रीकृष्णावेणी स्नान.

मनात शुभ संकल्प धरुन श्रीकृष्णावेणीत स्नान केल्याने सर्व कामना पूर्ण होतात. पाण्यात बुडी मारुन स्नान करावे. पाण्यावर कमरेपर्यंत येऊन पूर्वेकडे तोंड करुन तीन वेळा अर्ध्य देऊन पुन्हा स्नान करावे. स्नान करतेवेळी हर हर गंगे, हर हर कृष्णे, पांडुरंग हरी वासुदेव हरी, हर हर गंगे भागिरथी, अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त असा सतत नामघोष करावा.

## अभिषेक

श्रीकृष्णावेणीत स्नान झाल्यावर नवीन वस्त्रे परिधान करुन श्रीगुरु पादुकांवर अभिषेक करावा. अर्थात पुजारी मंडळींकडे आपले नाव, गोत्र याची माहिती दिली असता आपल्या समोर अभिषेक केला जातो. प्रसाद दिला जातो. तो श्रध्देने ग्रहण करावा.

## श्रीसत्यदत्त पूजा

साधारणतः सर्वांना सत्यनारायण पूजा ज्ञात आहे. परंतु सत्यदत्त पूजेविषेयी बरेच अज्ञान आहे. कलियुगातील सर्वश्रेष्ठ दैवत म्हणजेच श्रीप्रभू दत्तात्रेय होय. तेच एकमेव तारक असून त्यांच्या कृपेने सर्व समस्या, घोर संकटांचे त्वरित निवारण होते. प्रापंचिक, आर्थिक अडचणी, गंभीर आजार, कौटुंबिक प्रश्न इत्यादी सर्व प्रकारच्या समस्यांतून मुक्तता होण्यासाठी श्रीसत्यदत्त पूजा केली जाते.

श्रीसत्यदत्त पूजा हे एक व्रत आहे. कोणत्याही विशिष्ट हेतूने क्रमाने तीन वेळा केल्यास तात्काळ प्रचिती मिळते. ओळीने तीन पौर्णिमा व तीन गुरुवार श्रीसत्यदत्त पूजा करावी. या दिवशी सकाळी तीळ व आवळे एकत्र वाटून ते अंगाला चोळून स्नान करावे. अर्थात त्या दिवशी उपवास हा आलाच. मग शुचिर्भूत अवस्थेत ब्राह्मणाद्वारे श्रीसत्यदत्त पूजा घरी करुन घ्यावी.

कन्यागत महापर्वकाळात श्रीकृष्णावेणी तीरी पुरोहितांकडून श्रीसत्यदत्त पूजा करुन घेता येते. तेथे अवश्य करावी कारण तीर्थक्षेत्राचे महात्म्य तीर्थक्षेत्रीच असते. शिवाय ही पर्वणी बारा वर्षांतून एकदा येते म्हणूनच त्याचे महत्व अपार आहे.

## श्रीदत्तयाग

श्रीसत्यदत्त पूजेप्रमाणेच श्रीदत्तयागाला महत्व आहे. लघुरुद्र, महारुद्र, विष्णूयाग, गणेशयाग, पवमान याग, पंचायतनयाग, नवचंडियाग इत्यादी विविध याग केले जातात. सध्याच्या चालू युगात शिघ्र फल देणारा याग म्हणजे श्रीदत्तयाग होय. याठी प्रतिष्ठीत ब्राह्मणांद्वारे त्यांना घरी बोलावून वा कोणत्याही दत्त

मंदिरात वा दत्तक्षेत्री श्रीदत्तयाग करता येतो. शक्य असल्यास दरवर्षी वा तीन वर्षातून एकदा श्रीदत्तायाग करावा. जे स्वामीभक्त व दत्तभक्त आहेत त्यांनी आयुष्यात एकदा तरी श्रीदत्तयाग करावा. या यागाने श्रीदत्तप्रभूंची पूर्ण कृपा प्राप्त होऊन सर्व पीडा, संकटे दूर होतात. विशेष करुन भूत-पिशाच्च बाधा, बाहेरची बाधा व त्यातून उद्भवणारी सर्व संकटे नष्ट होऊन सर्वांगिण प्रगती साध्य होते. कन्यागत महापर्वकाळात शक्यतो श्रीदत्तयाग करावा. श्रीनृसिंहवाडी श्रीदत्तायागाचे माहेर आहे.

## श्रीगुरुचरित्र पारायण सेवा

श्रीगुरुचरित्र हे एक अलौकिक शक्तीचे रसायन आहे. त्याच्या पारायणाने कोणतीही वाईट गोष्ट शिल्लक राहात नाही. आजवर लाखो-लाखो भक्तांचे, भाविकांचे तसे रोकडे अनुभव आहेत. आपण स्वत: सर्व नियम पाळून शुचिर्भूत अवस्थेत तीन दिवसांचे, सात दिवसांचे श्रीगुरुचरित्र पारायण करु शकतो. आपल्यास शक्य नसल्यास ब्राह्मणांच्या वतीने आपल्या नावे संकल्प सोडून श्रीगुरुचरित्र पारायण करवून घेता येते.

कन्यागत महापर्वकाळात श्रकृिष्णावेणी तीरी तीन दिवसांचे किंवा सात दिवसांचे पारायण करावे. ते महत्भाग्याचे ठरते.

## महापूजा

श्रीनृसिंहवाडीत होणारी महत्वाची व विशेष पूजा म्हणजे ''महापूजा'' होय. श्रीकृष्णातीरी महापूजेचे फार महत्व आहे. ही षोडशोपचारे केली जाते. येथे संकल्प सोडून महापूजा करता येते. हा एक अतिशय आनंदाचा अनुभव असतो.

## तीर्थश्राध्दे

प्रत्येकाच्या आयुष्यात कळत नकळत, नानाविध चुका, पापकर्मे घडत असतात. काहीवेळा वाईट आचरणामुळे सुख मिळत असले तरी कधीकाळी त्याचे दुष्परिणाम हे भोगावेच लागतात. कधीतरी आपल्या स्वार्थामुळे कुणाची तरी संधी हुकली जाते. काही वेळेला आपल्या वाईट वा कडू बोलण्याने दुसऱ्याला फार त्रास भोगावा लागतो. आपल्या अशा अनंत चुकांमुळे कर्माची फळे सद्य जीवनातच नाही तर जन्मोजन्मी भोगावी लागतात. मग मुखातून निघते कुठच्या जन्माची फळं भोगतो आहे कळत नाही! ते सत्यच असते. शिवाय आपल्या पूर्वजांकडून काही पापकर्मे घडली असतील, तर त्याचेही परिणाम होतच असतात. म्हणून कन्यागत महापर्वकाळात श्रीकृष्णावेणी तीरी त्यातही श्रीनृसिंहवाडी या पुण्यक्षेत्री विधीवत स्नान, पूजा, श्राध्द कर्मांमुळे हिनकर्मांची राशी नष्ट होऊन आपले जीवन सुकर तर होतेच शिवाय पूर्वजांचीही त्यांच्या पापातून मुक्ती होऊन त्यांना सद्‌गती मिळते.

## त्रिपिंडी श्राध्दविधी

ज्या कोणाच्या घरात लहान बालक, तरुण वा वृध्द मृत्यु पावले आहेत आणि त्यांचे शास्त्रयुक्त विधी वा उत्तरकार्य झालेले नसेल अशावेळी त्या माणसाला वा त्याच्या घरात नाना प्रकारच्या अडचणी, त्रास उद्‌भवू लागतात आणि पिडा निर्माण होण्यास सुरुवात होते. अशा प्रकारची पिडा दूर होण्यासाठी धर्मशास्त्रात ''त्रिपिंडी श्राध्दविधी '' सांगितला आहे.

## नागबळी

साधारणपणे शंभर वर्षे आपण मागे गेलो तर लक्षात येईल, माणसाप्रमाणे इतर प्राणी व पशुपक्षीही मोठ्या प्रमाणात राहात होते. पुढे काळाच्या जलद गतीत विज्ञानाने मोठी प्रगती केली. विकासाच्या नावे पशुपक्षांची मोठ्या प्रमाणात कत्तल झाली. पूर्वीकाळी सर्पांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. एखादया व्यक्तीला सर्पदंश होऊन तो मृत्यू पावला असेल किंवा त्याने या जन्मी वा गतजन्मी सर्पांना मारले असेल

तर त्याचा त्रास पुढच्या पिढीला होत असतो. या त्रासातून सुटका होण्यासाठी ''नागबळी'' विधी केला जातो. कन्यागत महापर्वकाळात हा विधी केला असता ह्या त्रासातून मुक्त होता येते.

## नारायण बळी

आपल्या कुळात अर्थात मागील पिढीत कुणाला शस्त्र लागून मरण आलेले असेल, लग्न न होता मृत्यू झाला असेल, कोणाचा खून झाला असेल, कोणी स्त्री बलात्कार होऊन मृत्यू पावली असेल, कोणी अग्नीत जळून, आत्महत्या करुन, विषबाधा होऊन, गळ्यात अन्न अडकून अथवा जास्त खाऊन मृत्यू पावलेले असेल आणि त्यांचे उत्तरकार्य वा प्रेतक्रिया झालेली नसेल तर पुढील वंशजांना त्याचा त्रास होत असतो, तशी शक्यता असते. अशावेळी ''नारायण बळी'' हा विधी केला जातो.

कन्यागत महापर्वकाळात हा विधी केला असता तो अधिक पुण्यदायी ठरतो.

## दंपती पूजन.

गरजू व सात्विक, सुलक्षणी पती-पत्नी वस्त्र, साडी-चोळी व दक्षिणा अथवा सौभाग्य-वस्त्र-अलंकार देऊन पूजन करणे म्हणजे दंपती पूजन होय. हे पूजन लक्ष्मी नारायण स्वरुपात केले जाते. या पूजनाने घरात मंगल घटना घडून घरी शांतता व प्रसन्न वातावरण राहाते. तशी श्रध्दा व अनुभवही आहे.

## कन्यापूजन

भारतीय संस्कृतीत नदीला देवीस्वरुप मानले आहे. म्हणून तिला कन्या मानून तिची पूजा करण्याची प्रथा आहे. श्रीकृष्णेच्या तीरावर ''कन्यापूजन'' केले जाते. कन्यागत महापर्वकाळात तर त्याचे विशेष महत्व आहे. श्रीनृसिंहवाडीत एकाच वेळी कन्या स्वरुपात श्रीकृष्णा व श्रीगंगा यांचे पूजन होते. या दोघी जणू बहिणीच आहेत. त्यांना हळद-कुंकू वाहून मुलींना आवडणाऱ्या उपयुक्त वस्तू भेट दिल्या जातात.

त्याशिवाय मिष्ठान्नाचे जेवण अर्पण केले जाते. कन्यापूजन व कन्याभोजन हे दोन विधी म्हणजे एक विशेष आनंददायी सोहळा असतो.

## लघुरुद्र आणि महारुद्र

श्रीनृसिंहवाडीत श्रीगुरु मंदिरात आणि शिवालयात लघुरुद्र केले जातात. रुद्राच्या आवर्तना बरोबर शिवपिंडीवर अभिषेक केला जातो. रुद्राची एकशे एकवीस आवर्तने म्हणजे लघुरुद्र! असे अकरा लघुरुद्र म्हणजे रुद्राची तेराशे एकवीस आवर्तने म्हणजे महारुद्र होय. हा विधी म्हणजे एक विलक्षण अनुभूती असते.

## गायत्री पुर:श्चरण

गायत्री पुर:श्चरण हा वैयक्तिक विधी आहे. तो यम, नियम इत्यादी नियमांचे कठोर पालन करुन करावा लागतो. विधीपूर्वक संथा घेऊन, आचार-नियम पाळून, सर्वथा मौन पाळून कन्यागत महापर्वकाळात श्रीकृष्णातीरी अथवा श्रीनृसिंहवाडीतच गायत्री पुर:श्चरण करावे. हे फार भाग्याचे आणि पुण्यशील आहे. याने मानवाची सर्व प्रकारे उन्नती होऊन आयुष्य सुख-समाधानाने भरुन जाते.



**- लेखन व संकलन**
**श्री. रविंद्र ज. गावडे**

# प. पु. सद्गुरु श्री भाऊ महाराज

(आय. ए. एस., आय. आर. एस. इतिहास संशोधन)

## संस्थापित समाजोपयोगी संस्था

### सद्गुरु श्री भालचंद्र महाराज सेवा संघ (रजि.), मुंबई

रजि. नं. एफ 25978 (मुंबई)

कार्यालय : १०/७२३, म. हौ. बोर्ड, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुं. ३३. संपर्क : ९८१९२२०२०४

---

### सद्गुरु भाऊ महाराज धर्मदाय संस्था (सार्व.) रजि.

सद्गुरु भालचंद्र महाराज उपासना मठ,

देवल गाणगापूर, ता. अफजलपूर, जि. गुलबर्गा, कर्नाटक. संपर्क : 08470274374

---

### श्री भानुदास प्रतिष्ठान, नृसिंहवाडी - कोल्हापूर

(रजि. नं. एफ २२९६४)

नरसोबावाडी एस. टी. स्टॅन्ड जवळ, नरसोबावाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर. संपर्क : ०२३२२२७०२००

---

### भाऊ महाराज उपासना ट्रस्ट (रजि.)- वाशिंद.

(नोंदणी क्र.: ई ३८३२)

श्री दत्त मंदिर, देसलेपाडा, वाशिंद, दहागांव, ता. शहापूर, जि. ठाणे. दुरध्वनी : ९८६७७१७०७९

---

### श्री भानुदास सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई

नोंदणी क्र.: एम.यु.एम./डब्ल्यु.ई./आर.एस.आर(सी.आर.)/१८२१ सन १९९९-२०००)

शॉप नं. ६, श्रीकृपा बिल्डिंग, रंगारी बदक चाळ, काळाचौकी, मुंबई - ४०००३३.

चिंचपोकळी (पुर्व), मुंबई - ४०० ०१२. दुरध्वनी : ८१०८८८६२६१

# प. पु. सद्गुरु श्री भाऊ महाराज

(आय. ए. एस., आय. आर. एस. इतिहास संशोधन)

## संस्थापित समाजोपयोगी संस्था

### सद्गुरु श्री भाऊ महाराज सेवाश्रम धर्मदाय संस्था

(रजि. नं.: २५७७९)

पत्ताः मु. पो. नेरुर(भाक्राड), वाघोसे वाडी रोड, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.

संपर्क : ९२७०४५८५१७

---

### श्री भाऊ महाराज सहकारी गृहनिर्माण संकुल - वाशिंद.

दहागांव, वाशिंद, ता. शहापूर, जि. ठाणे.

प्रदुषणमुक्त वातावरणात उत्कृष्ट घरकुलांसाठी अवश्य संपर्क साधावा.

दुरध्वनी : ८९७६२९२९६०

---

### श्रीभाऊ मेडिकल ॲन्ड ऐज्युकेशन ट्रस्ट

अमरदिप - सी विंग, डी. एल. मार्ग, काळाचौकी, मुंबई - ४०० ०३३.

संपर्क - ९८२०९८१६६५.

---

### श्रीदत्त पादुका पालखी परिक्रमा चॅरीटेबल ट्रस्ट

१७/बी, उदयश्री सोसायटी, माऊली निवास, भांडूप (पुर्व).

# सद्गुरु श्री भाऊ महाराजांची वचने

गुरुसेवा ही ईश्वर सेवा.

अभिमानाने दुर्गुण येतात.

एकाग्रतेसाठी तप करावे लागते.

प्रेम मागू नका, मान मागू नका.

दैवापेक्षा देव श्रेष्ठ। प्रयत्नांती परमेश्वर

आराम भोगाने नव्हे, त्यागाने मिळतो.

स्वतंत्र राहण्याऐवजी संतआश्रयाने रहा.

पहारा कुठे ठेवाल, धनावर नाही मनावर.

आलात तर तुमच्यासह, नाहीतर तुमच्याशिवाय

निर्गुण देवाचे सगुण रुप म्हणजेच सद्गुरु होय.

दुसऱ्याने वाईट केलेले व स्वतः चांगले केलेले विसरा

आचार विचार शुद्ध ठेवा, वाणी तोलून मोजून वापरा.

दुःख स्वतः भोगतात, सुख दुसऱ्याना देतात ते सज्जन.

सद्‌गुरु श्री भाऊ महाराज शिष्य परिवारातर्फे तसेच

आमचे हितचिंतक, जाहिरातदार, देणगीदार, सेवेकरी

यापैकी दिवंगत झालेल्यांना

सद्‌गुरु श्री भालचंद्र महाराज सेवा संघ, मुंबई

श्री भानुदास प्रतिष्ठान - नृसिंहवाडी, कोल्हापूर

सद्‌गुरु भाऊ महाराज धर्मदाय संस्था (सार्व.) - देवल गाणगापूर, कर्नाटक

भाऊ महाराज उपासना ट्रस्ट, दहागांव - वाशिंद

श्री भानुदास सहकारी पतपेढी मर्यादित - मुंबई

श्री भाऊ महाराज सहकारी गृहनिर्माण संस्था, दहागांव - वाशिंद

सद्‌गुरु भाऊ महाराज सेवाश्रम धर्मादाय संस्था - कुडाळ

श्री भाऊ मेडीकल ॲन्ड एज्युकेशन ट्रस्ट - मुंबई

श्री दत्त पादुका पालखी परिक्रमा चॅरीटेबल ट्रस्ट - मुंबई

आणि गुरु महिमा परिवारातर्फे



# भावपुर्ण श्रध्दांजली



गुरु महिमा दिवाळी अंकास

प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष ज्या ज्या सर्वांचे

आम्हांस अनमोल सहकार्य लाभले,

त्या सर्वांचे गुरु महिमा परिवार आणि

सद्‌गुरु श्री भाऊ महाराज संस्थापित सर्व संस्थांतर्फे

# हार्दिक आभार



हि दिवाळी आपण सर्वांना सुख-शांती

आणि समृध्दीची जावो, हिच सद्‌गुरुचरणी प्रार्थना